रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड | रविवार । दि. २ ऑगस्ट २०२६ । अंक ५७ । पृष्ठे ८+४ । किंमत ५₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in




आतील पानात




आतील पानात

आनंद कोळगावकर

## विशेष मुलाखत...

# लाल बावट्याचा संघर्ष सुरुच राहील!



शेकाप सरचिटणीस भाई जयंत पाटील यांचा विश्वास

**सत्ता आली-गेली तरी शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठीचा शेतकरी कामगार पक्षाचा लढा कधीही थांबणार नाही. निवडणुकीतील पराभव हा विचारांचा पराभव नसून; अन्याय, भांडवलशाही आणि शोषणाविरुद्धची लढाई अधिक जोमाने सुरूच राहील, असा ठाम विश्वास शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांनी व्यक्त केला. शेतकरी कामगार पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर पक्षाची वाटचाल, निवडणुकांतील कामगिरी, बदलते राजकारण, शेतकरी-कामगारांचे प्रश्न आणि आगामी दिशा याविषयी त्यांनी दिलखुलास संवाद साधला.**

**प्रश्न : भाई, लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, नगरपालिका जवळजवळ सर्वच निवडणुकांमध्ये शेकापची पिछेहाट झालीय. कसं बघता या अपयशाकडे?**

**जयंतभाई :** बरोबर आहे. या सर्वच निवडणुकांमध्ये पक्षाला पराभव पत्करावा लागला. शेकाप हा फक्त निवडणुकांसाठी कधीच नव्हता. गेल्या कित्येक वर्षांचा इतिहास पाहिला तर आम्ही नेहमीच भांडवलशाहाच्या अन्यायाविरूद्ध लढत आलोय.

भांडवलदारी अर्थव्यवस्था असो की, वर्गवारी समाजव्यवस्था असो, आम्ही अशा व्यवस्थेविरोधातील लढा गेली अनेक वर्षे पिढ्यान् पिढ्या देत आहोत नि पुढेही चालूच ठेवणार आहोत. आम्ही केडरबेस आहोत. विचारावर आधारित असे काही मोजकेच पक्ष आज भारतात आहेत. त्यापैकी आम्ही आहोत, याचा सार्थ अभिमान आम्हाला आहे. जनाधार हा निवडणुकीच्या यशाच्या तराजूत मोजू नका. कारण, निवडणुकीतील यशाला अनेक कंगोरे असतात. सर्वात महत्त्वाचा कंगोरा म्हणजे आर्थिक पाठबळ. यात आम्ही मागे पडतो, हे खरे आहे. हल्लीच्या निवडणुका खर्चिक होत चालल्यात. शिवाय, राजकारणातील हेवेदावे, कुटील डावपेच, विश्वासघात, हेही आम्हाला जमत नाहीत. आम्ही मागे पडल्याची ही मुख्य कारणे आहेत.

लोकांचे प्रश्न धसास लावणे आणि निवडणुकीचे तंत्र या दोन गोष्टी अगदी वेगळ्या आहेत. हल्लीच्या निवडणुकीत खोटी आश्वासने, धनशक्तीचा वारेमाप वापर, शासकीय यंत्रणेचा वापर, दांडगाई, ब्लॅकमेलिंग या आणि अशा वेगवेगळ्या बेकायदेशीर क्लृप्त्या वापरल्या जातात. हे अगदी खरे आहे की, आम्ही अशा बाबतीत कमी पडतो.

परंतु, एक लक्षात ठेवावेच लागेल की, आमचे राजकारण, आमचे समाजकारण, आमची लढाई ही समाजातील गोरगरीब, दीनदुबळ्या आणि कष्टकऱ्यांसाठी आहे. समाजात जोपर्यंत या वर्गाचे शोषण होत आहे, तोपर्यंत आमचे कार्य चालूच राहणार आहे. रायगडपुरते बोलायचे तर, आम्ही दिलेला नवी मुंबईचा लढा, विमानतळाचा किंवा अगदी जेएनपीटी पोर्टचा लढा, आरसीएफविरोधातला लढा किंवा सध्या ऐरणीवर असलेला Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) असो, भातशेतीमध्ये पडलेल्या खोडकिड्याचा प्रश्न असो की मिठागरांचा प्रश्न असो, की सेझचा प्रश्न असो. आजवर फक्त आणि फक्त शेकापनेच संघर्ष करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

आज अलिबाग, पेण तालुका हा MMRDA मध्ये समाविष्ट केला गेला आहे. SEZ, NAINA, CIDCO, MMRDIA अशा वेगवेळ्या नावाने शासन शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करण्याचे कारस्थान करतेय. शेतकरी कामगार पक्षच फक्त आंदोलनाच्या मार्गाने शासनाला जेरीस आणू शकते आणि आपल्या जमिनी वाचवू शकते, असा सार्थ विश्वास शेतकऱ्यांना वाटतो, म्हणूनच आजही शेकापने एकदा लढ्याची हाक दिली की सारा बळीराजा लाल बावट्याखाली एकवटतो. याला इतिहास साक्षी आहे. आम्ही एकदा भूमिका घेतली की, न्याय मिळेपर्यंत शेवटपर्यंत आमचा पान ३ वर

# लाभार्थी रिकाम्या हाती

## राज्यशिष्टाचाराचे पालन न केल्याने खा. तटकरे नाराज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महाराजस्व समाधान शिबीर अभियान कार्यक्रमाचे आयोजन अलिबागमध्ये करण्यात आले होते. हा कार्यक्रम मोठ्या दिमाखात घेण्यात आला. मात्र, प्रशासनाकडून राज्य शिष्टाचाराचे पालन न केल्याची खंत खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केली. त्यांनी प्रशासनाच्या कारभाराबाबात तीव्र नाराजी व्यक्त केली. ही नाराजी कार्यक्रमात सुरुवातीपासूनच दिसून आली. मात्र, महसूल मंत्र्यांनी मध्यस्थीची भुमिका घेतल्यानंतर हे प्रकरण शांत झाले. रायगड जिल्ह्यातील सर्व स्तरातील घटकाला एकाच ठिकाणी योजनेचा लाभ मिळावा, यासाठी महाराजस्व अभियान राबविण्यात आले. शासकीय कार्यक्रम सुट्टीच्या दिवशी घेतला असतानादेखील रायगड जिल्ह्यासह वेगवेगळ्या जिल्ह्यातीलअधिकारी व कर्मचाऱ्यांनी हजेरी लावली. यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सभागृह भरून गेले होते. त्यावेळी काही नागरिक या कार्यक्रमात योजनेचा लाभ मिळेल, या आशेने आले होते. मात्र, उशीर झाल्याने सन्मानाचा कार्यक्रम आटोपता घेण्यात आला. त्यामुळे काही लाभार्थी व सन्मानपात्र व्यक्ती रिकाम्या हातीच गेले. दरम्यान, खासदार सुनील तटकरे कार्यक्रमाच्या ठिकाणी आल्यापासून नाराज असल्याचे सभागृहातील नागरिकांच्या निदर्शनास दिसून आले. जिल्हा प्रशासनाकडून राज्य शिष्टाचाराचे पालन केले नसल्याची खंत खासदार तटकरे यांनी व्यक्त केली. यावेळी महसूल मंत्री यांनी मध्यस्थीची भुमिका घेत आगामी काळात असे होणार नाही, असे सांगितले.

यावेळी तटकरे यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीतून नेहमीप्रमाणे उशीरा येणारे भाजपचे आ. रविंद्र पाटील तसेच पान २ वर

### आमदारांना अजित पवारांचा विसर

माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांची जयंती आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अलिबागचे आमदार भाषण करण्यास उठले. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित केल्याचे उल्लेख केला. मात्र, त्यांना माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचा नावाचा विसर पडला असल्याचे दिसून आले. त्यांनी संपुर्ण भाषणात अजित पवार यांच्या जयंतीचा साधा उल्लेखही केला नाही.

### महायुतीमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

राज्यासह रायगड जिल्ह्यामध्ये महायुतीमधील भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट या मित्र पक्षांमध्ये सर्व अलबेल असल्याचे बोलले जाते. मात्र, मागील विधानसभा निवडणूकीपासून जिल्हा परिषद निवडणूकीच्या कालावधीत शिंदे गट विरुद्ध अजित पवार गटात युद्धच सुरु होते. दळवी यांनी अनेक वेळा तटकरेंना भाषणातून अंगावर घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, अलिबागमध्ये झालेल्या या शासकीय कार्यक्रमात दळवी आणि तटकरे एकमेकांसोबत साधा एकही शब्द बोलले नाहीत. एकमेकांकडे ते बघतही नसल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आले. त्यामुळे महायुतीमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे.

# शहीद तुणतुणेंच्या स्मृतीदिनाचा अधिकाऱ्यांना विसर



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

देशसेवेसाठी अवघ्या २१व्या वर्षी शहीद झालेल्या अलिबाग तालुक्यातील सहाणगोठी येथील शहीद निलेश तुणतुणे यांच्या स्मृतीदिनानिमित्त शनिवारी (दि.१) त्यांच्यास्मृतीला अभिवादन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते शहीद तुणतुणे यांच्या पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाच्या माध्यमातून दिलेली आगळीवेगळी मानवंदना यावेळी विशेष ठरली. मात्र, ज्यांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले, त्यांच्याच स्मृतीदिनाच्या कार्यक्रमाकडे प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र दिसून आले.

या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आलेले जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक यांपैकी प्रमुख अधिकारी उपस्थित नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. पान २ वर

# नवी मुंबई विमानतळावर नवा इतिहास

## पहिल्या 'इंडिगो कार्गो' विमानाचे यशस्वी लँडिंग

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाच्या प्रवासात शनिवारी (दि.१) आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठण्यात आला. विमानतळावर पहिल्या मालवाहू विमानाचे यशस्वी लँडिंग होत अधिकृत कार्गो सेवेला प्रारंभ झाला. या कामगिरीमुळे नवी मुंबई विमानतळाने देशाच्या हवाई मालवाहतूक क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

इंडिगो एअरलाइन्सचे मालवाहू विमान बंगळुरू येथून उड्डाण करून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षितरीत्या दाखल झाले. या यशस्वी लँडिंगनंतर इंडिगो ही नवी मुंबई विमानतळावर कार्गो ऑपरेशन्स सुरू करणारी पहिली एअरलाइन ठरली आहे.



सुमारे १८ वर्षे जुने असलेले हे विमान धावपट्टीवर उतरल्यावर कार्गो टर्मिनलकडे रवाना करण्यात आले. त्यानंतर हेच विमान नवी मुंबईहून संयुक्त अरब अमिरातीतील शारजाहकडे आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीसाठी रवाना होणार असल्याचे सांगण्यात आले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर कार्गो सेवा सुरू झाल्याने महाराष्ट्रासह देशातील उद्योग, निर्यातदार आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. जलद आणि कार्यक्षम हवाई पान २ वर

# आज खालापूरमध्ये लाल वादळ धडकणार

## शेकापच्या वर्धापन दिनाकरिता कार्यकर्ते सज्ज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचा ७९ वा वर्धापन दिन रविवारी (दि.२) मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या विराट मेळाव्यात खालापूरमध्ये लाल वादळ केवळ गर्जणार नाही, तर शेकापची संघटनात्मक ताकदही दाखवणार आहे. शेकापच्या इतिहासातील आणखी एका पर्वाचे साक्षीदार होण्यासाठीखालापूरसज्जझालेआहे. रायगड जिल्ह्यातील खालापूर येथे महामार्गालगत असलेल्या मैदानात सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास भव्य मेळावा आयोजित केला आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात असून राज्यातील दिग्गज नेत्यांसह जवळपास १५ हजारहून अधिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. शेकापच्या वर्धापन दिनाचा शेळावा हा पक्षाच्या संघटनशक्तीचा ... पाटील यांनी दिली.

शेतकरी कामगार पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी भव्यदिव्य असे सभागृह उभारण्यात आले आहे. अत्याधुनिक आणि पूर्णपणे वॉटरप्रूफ सभा मंडप, भव्य व्यासपीठ, प्रशस्त बैठक व्यवस्था, अत्याधुनिक ध्वनी व्यवस्था, प्रकाशयोजना, एलईडी प्रक्षेपण व्यवस्था, वाहनतळ विविध सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. संपूर्ण परिसर आकर्षक सजावट, लाल झेंडे आणि पक्षाच्या विचारधारेचे संदेश देणाऱ्या फलकांनी सजविण्यात आले आहेत. खालापूर तालुक्यातील प्रमुख रस्ते स्वागत कमानी, बॅनर आणि झेंड्यांनी नटले आहेत. दरम्रून, मेळाव्याच्या अंतिम तयारीचा



पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष भेट दिली. विविध समित्यांशी संवाद साधत आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले. यावेळी स्थानिक पदाधिकारी आणि स्वयंसेवकांकडून सुरू असलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त करण्यात आले. या भव्य मेळाव्याच्या आयोजनासाठी खालापूर तालुका शेतकरी कामगार पक्ष, सर्व आघाड्या, सेल, पदाधिकारी, पान २ वर

### साम्या कोरडे यांच्या हस्ते झेंडावंदन

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पक्षाच्या ध्वजाचे झेंडावंदन केले जाणार आहे. झेंडावंदनाचा कार्यक्रम शेकाप पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा ॲड. साम्या कोरडे यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिली.









# पनवेल शहर पोलिसांची मोठी कारवाई

## • फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश



। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहर पोलिसांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन विक्री करून तब्बल २ कोटी २९ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला असून, या प्रकरणात पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करंजाडे येथील सर्व्हे क्रमांक ८१/२ मधील ४७ गुंठे जमीन मूळ मालक नाथन एलियाहू चिंचोलकर आणि शालोम (सलीम) एलियाहू चिंचोलकर यांच्या नावावर होती. दोघांचेही निधन झाल्यानंतर त्यांचे वारस इस्रायल आणि अमेरिकेत वास्तव्यास आहेत. या परिस्थितीचा गैरफायदा घेत मुख्य आरोपी सूरज वासुदेव शिंदे याने आपल्या वडिलांना बनावट नाथन चिंचोलकर आणि पत्नीच्या भावाला बनावट शालोम चिंचोलकर बनवून त्यांच्या नावाने खोटी ओळखपत्रे तयार केली. त्यानंतर करंजाडे येथील जमीन पनवेल येथील फिर्यादी प्रशांत प्रभाकर पाटेकर आणि त्यांचा मुलगा श्रेयस पाटेकर यांना विकून त्यांच्याकडून २ कोटी २९ लाख ५० हजार रुपये उकळण्यात आले.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी सूरज शिंदे हा पत्नी, दोन मुली, वडील आणि अन्य नातेवाईकांसह विविध राज्यांत लपून राहत होता. त्यामुळे त्याचा शोध घेणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत होते. पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे गोव्यातील थिवी येथे सापळा रचून सूरज शिंदे (३६), सतीश शिंदे (४१) आणि तेजस सुवे (२६) यांना ताब्यात घेतले. अधिक चौकशीत आणखी दोन आरोपी वासुदेव नामदेव शिंदे (५६) आणि मनीष मोरे (४४) यांचा सहभाग असल्याचे समोर आले. मनीष मोरे हा गोव्यातील अन्य एका गुन्ह्यात तुरुंगात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सर्व आरोपींना अटक करण्यात आली. यावेळी आरोपींच्या ताब्यातून मूळ जमीनमालक नाथन चिंचोलकर यांच्या नावाने बनविण्यात आलेले बनावट पॅनकार्ड आणि आधारकार्ड जप्त करण्यात आले आहेत. तसेच, सूरज शिंदे आणि तेजस सुवे यांच्याविरोधात यापूर्वीही उरण पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असण्याची शक्यता असून, पनवेल शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

# कोळी बांधवांची समुद्राकडे वाटचाल



। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

सागरी मत्स्यसंपदेचे संवर्धन आणि माशांच्या प्रजनन काळाचे संरक्षण करण्यासाठी दरवर्षी लागू करण्यात येणारी दोन महिन्यांची मासेमारी बंदी संपुष्टात आल्यानंतर पनवेलच्या कोळीवाड्यात पुन्हा एकदा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी पहाटेपासून गाढी नदी ते खाडी परिसरातून कोळी बांधवांनी आपल्या बोटी समुद्राच्या दिशेने रवाना करत नव्या हंगामाची सुरुवात केली.

गेल्या दोन महिन्यांपासून सर्व मासेमारी नौका किनाऱ्यावर उभ्या होत्या. या काळात कोळी बांधवांनी बोटींची दुरुस्ती, इंजिनांची देखभाल, जाळ्यांची बांधणी व आवश्यक साहित्याची तयारी केली होती. बंदी संपताच सर्व तयारी पूर्ण करून मच्छीमार पुन्हा समुद्रात उतरले. यावेळी पहाटेच्या सुमारास कोळीवाड्यात मोठी लगबग पाहायला मिळाली. बोटींवर जाळी, बर्फ, इंधन आणि मासेमारीचे साहित्य चढविण्यात आले. अनुभवी मच्छीमारांसह तरुणांनीही नव्या हंगामासाठी उत्साहाने सहभाग घेतला. गाढी नदीमार्गे खाडीकडे निघालेल्या अनेक बोटी दिवसभर मासेमारी करत होत्या. काही कोळी बांधवांच्या जाळ्यात विविध प्रकारची मासळी अडकल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. पहिल्याच दिवशी मिळालेल्या मासळीमुळे यंदाचा हंगाम चांगला जाईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली. मासेमारी पुन्हा सुरू झाल्याने पनवेलमधील स्थानिक मासळी बाजारातही चैतन्य निर्माण झाले आहे. ताजी मासळी उपलब्ध होण्यास सुरुवात झाल्याने ग्राहकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. मच्छीमारांनी शासनाकडून डिझेल अनुदान, आधुनिक मासेमारी सुविधा, सुरक्षित धक्के आणि खाडी परिसरातील गाळ काढण्याची मागणीही यावेळी केली. वाढता इंधन खर्च आणि बदलते हवामान ही आव्हाने कायम असली तरी नव्या हंगामाकडून मोठ्या अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले. समुद्रदेवतेचे स्मरण करून आणि सुखरूप परतण्याची प्रार्थना करत कोळी बांधवांनी समुद्राकडे प्रस्थान केले.

# रानभाजी पदार्थ स्पर्धेचे यशस्वी आयोजन



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

महाड येथील मणिरी वेस्ट मॅनेजमेंट फऊंडेशन आणि पोलादपूरच्या दिशा सांस्कृतिक ग्रुपचा संयुक्त उपक्रम असलेल्या रानभाजी पदार्थ स्पर्धेचे आयोजन येथील श्रीराम मंदिरात करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील सुमारे ३५ महिलांनी सहभागी होऊन पाककृती सादर केल्या. ''जागर वसुंधरेचा, उत्सव रानभाज्यांचा'' या संकल्पनेतून ही आगळीवेगळी स्पर्धा महिलांच्या तुडुंब प्रतिसादात यशस्वी करण्यात आली.

यावेळी दिशा सांस्कृतिक ग्रुपच्या अध्यक्षा संगीता संतोष मोरे यांच्यासह सर्व सदस्या तसेच मणेरी वेस्ट मॅनेजमेंट फाऊंडेशनच्या सदस्यांची उपस्थिती होती. यावेळी स्पर्धक महिलांनी रानभाज्यांपासून विविध पाककृती सादर केल्यानंतर आयोजकांनी त्यांचे परिक्षण केले. पदार्थाची बाह्य सजावट गटामध्ये रूपाली लवंगारे प्रथम, तर पल्लवी सागवेकर यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. पदार्थाची सजावट व संपूर्ण मांडणी गटात पूजा खोत यांना प्रथम, तर भक्ती सलागरे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. स्नेहल गायकवाड यांच्या पाककृतीची तृतीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली. चवीनुसार पारंपरिक पदार्थ गटात सखुबाई कासार प्रथम, तर प्रेमलता टोलमारे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. रानभाजीचा नाविन्यपूर्ण पदार्थ गटात पल्लवी शेठ प्रथम, तर रसिका घाडगे द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या ठरल्या. उत्कृष्ट चव गटामध्ये मधुमती जंगम यांची पाककृती प्रथम, तर प्रणिता कासार दुसऱ्या क्रमांकाच्या पाककृतीच्या मानकरी ठरल्या. यावेळी विजेत्यांसह सर्व सहभागी महिला स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

## वडाळे तलावाजवळ अश्लील कृत्य

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल येथील प्रसिद्ध वडाळे तलाव परिसरात एका व्यक्तीकडून जाहीरपणे अश्लील आणि अक्षेपार्ह कृत्य केल्याचा प्रकार समोर आला आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडाळे तलाव परिसरातील पदपथावर एका अज्ञात व्यक्तीने मुलींसमोर अश्लील कृत्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. स्थानिक नागरिकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून या प्रकाराची तक्रार नोंदवली आहे.



# खारघरमधील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर नोडमधील वाहतूक कोंडी आणि अनधिकृत अतिक्रमणांबाबत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत सिडको महामंडळाने मोठी निष्कासन मोहीम राबविली. या मोहिमेत सेक्टर ४० आणि सेक्टर ३७ परिसरातील एकूण १८ अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवून ती हटविण्यात आली.

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विभागामार्फत सेक्टर ४० येथील बागेश्री सोसायटीसमोरील तसेच नाल्यालगत उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. या ठिकाणी वाहतुकीस अडथळा ठरत असलेले ७स्टॉल्स, १ सर्व्हिस सेंटर आणि १ गॅरेज शेड निष्कासित करण्यात आले. याच मोहिमेदरम्यान खारघर सेक्टर ३७ मधील भूखंड क्र.-१ वर विनापरवानगी सुरू असलेली १ नर्सरी, ५ गॅरेज, २ फर्निचर दुकाने आणि १ ढाबा अशी एकूण ९ अनधिकृत बांधकामेही हटविण्यात आली. या कारवाईत नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विभागाचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, सिडकोचे सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी सहभाग घेतला. भविष्यातही अनधिकृत बांधकामांविरोधातील अशा कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा सिडको प्रशासनाने दिला आहे.

## विद्यार्थ्यांची सुरक्षा अद्यापही अंधारात

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिकेची स्थापना होऊन तब्बल १० वर्षे पूर्ण झाली तरीही स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य आणि सुरक्षा अद्यापही अंधारातच आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या ५१ शाळा पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून कागदावरच रेंगाळत पडला आहे. या प्रशासकीय हलगर्जीपणामुळे धोकादायक इमारतींमध्ये बसून शिक्षण घेण्याची वेळ चिमुकल्या विद्यार्थ्यांवर आली आहे. शाळांच्या हस्तांतरणावरून जिल्हा परिषद आणि पनवेल महानगरपालिका प्रशासनामध्ये एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याचा प्रकार सुरू आहे.

## बनावट पासपोर्टविरोधात दोघांवर गुन्हा

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

शाळेचे बनावट लिविंग सर्टिफिकेट तयार करून ते पासपोर्ट मिळवण्यासाठी खोटा पुरावा म्हणून सादर केल्याप्रकरणी साहिल कृष्णा पांडे (राहणार सेक्टर ११ नवीन पनवेल) आणि लक्ष्मी कृष्णा पांडे (सेक्टर ११ नवीन पनवेल) (देश नेपाळ) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात ३१ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपी हे मूळचे नेपाळ या देशाचे नागरिक असून त्यांनी भारतीय नागरिक असल्याचे भासवून फसवणुकीच्या उद्देशाने पासपोर्ट मिळवण्यासाठी त्यांची आई मीना कृष्णा पांडे यांच्या लग्नापूर्वीचे नाव गईरे मीना पारस्कर यांच्या नावाचा सरस्वती विद्यानिकेतन स्कूल, विक्रोळी पार्क साईट, मुंबई या शाळेचे बनावट लिव्हिंग सर्टिफिकेट तयार केले आणि ते पासपोर्ट मिळवण्यासाठी खांदेश्वर पोलीस ठाण्यात खोटा पुरावा म्हणून सादर केला. पोलिसांनी कागदपत्रांची छाननी केली.

# बनावट पासपोर्ट घोटाळ्याचा पर्दाफाश

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

नवीन पनवेल परिसरात वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिक असलेल्या बहीण-भावाने स्वतःला भारतीय नागरिक म्हणून सादर करण्यासाठी मुंबईतील एका नामांकित शाळेच्या नावाने बनावट शाळा सोडल्याचा दाखला तयार करून त्याचा पासपोर्ट अर्जासाठी वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पासपोर्ट पडताळणी प्रक्रियेदरम्यान हा प्रकार समोर आल्यानंतर खांदेश्वर पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधितांनी भारतीय नागरिकत्त्वाचा दावा बळकट करण्यासाठी शैक्षणिक पुरावा म्हणून बनावट शाळा सोडल्याचा दाखला तयार करून तो पासपोर्ट अर्जासोबत सादर केला होता. पडताळणीदरम्यान खांदेश्वर पोलिसांनी शाळेच्या नोंदी, दाखल्यावरील माहिती आणि संबंधित कागदपत्रांची सखोल छाननी केली. त्यावेळी सादर करण्यात आलेले लिव्हिंग सर्टिफिकेट बनावट असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधितांविरुद्ध फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे, बनावट दस्तऐवजांचा वापर करणे तसेच शासकीय यंत्रणेला चुकीची माहिती सादर करण्यासंदर्भातील कलमांनुसार गुन्हा नोंदविला आहे. याशिवाय पासपोर्ट अधिनियम तरतुदींनुसारही कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, या बनावट कागदपत्रांच्या निर्मितीमागे कोणते एजंट किंवा रॅकेट कार्यरत आहे का, अशाच प्रकारे इतर अर्ज सादर करण्यात आले आहेत का, तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास खांदेश्वर पोलीस करीत आहेत. खांदेश्वर पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार वेळेत उघडकीस आल्याने बनावट कागदपत्रांच्या आधारे पासपोर्ट मिळविण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यात यश आले आहे.



# 'साईंचे सोबती' पुस्तकाचे प्रकाशन

। पनवेल । प्रतिनिधी ।

लेखक रमेश भोळे लिखित साईंचे सोबती या लोकप्रिय पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन पनवेल येथील श्री साईबाबा मंदिरात करण्यात आले. या पुस्तकाचे प्रकाशन वेदशास्त्रसंपन्न आचार्यांच्या हस्ते विधिवत पूजन व मंत्रोच्चारात करण्यात आले. यावेळी माजी मुख्याधिकारी सुदाम धुपे, पत्रकार गणेश कोळी, दीपक महाडिक, बाळू जमलेदार, राजेश डांगळे, ॲड. गजानन करावकर, डॉ. महिंद्रकर, संपादक अनिल भोळे यांच्यासह शेकडो साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''साईंचे सोबती'' या पुस्तकामध्ये श्री साईबाबांच्या सहवासात १५ ते २० वर्षे राहून त्यांची सेवा करणाऱ्या तसेच साईकृपेचा लाभ झालेल्या ३९ साईभक्तांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. श्री साई सच्चरित्रमध्ये या भक्तांचा वारंवार उल्लेख आढळतो. त्यामुळे या भक्तांविषयीची माहिती जाणून घेतल्यास श्री साई सच्चरित्र अधिक सखोलपणे समजण्यास मोठी मदत होते. याच कारणामुळे प्रत्येक साईभक्ताच्या संग्रही हे पुस्तक असणे आवश्यक असल्याचे लेखकांनी सांगितले.

## पान १ वरून

## शहीद तुणतुणेंच्या स्मृतीदिनाचा अधिकाऱ्यांना विसर

शहीदाच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी काही मिनिटे काढणेही प्रशासनाला शक्य झाले नाही का, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित करण्यात येत आहे. शासकीय कार्यक्रमांच्या उद्घाटनासाठी वेळ काढणारे अधिकारी शहीदाच्या स्मृतीदिनासाठी मात्र वेळेअभावी गैरहजर राहतात का? अशी कुजबुज कार्यक्रमस्थळी ऐकायला मिळाली.

शहिद निलेश तुणतुणे ट्रस्ट व पंचायत समिती अलिबाग यांच्या संयुक्त विदयमाने २८ वा स्मृती दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा सैनिक अधिकारी ले. कर्नल राहूल माने, शहिद निलेश तुणतुणे ट्रस्टचे अध्यक्ष व जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती अनिल पाटील, अलिबाग पंचायत समितीच्या सदस्या अंजली ठाकूर, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा अलिबाग पंचायत समितीचे सदस्य संतोष निगडे, गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, नारायण तुणतूणे, निर्मला तुणतुणे, बेलोशीचे माजी सरपंच कृष्णा भोपी, ॲड.के.डी. पाटील आदी मान्यवरांसह, माजी सैनिक, स्काऊडचे विद्यार्थी, सहाणगोठीमधील ग्रामस्थ, महिला, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारगिल युद्धात शहिद झालेले सहाणगोठी येथील निलेश तुणतुणे यांचा स्मृतिदिन सहाणगोठी येथे भव्यदिव्य कार्यक्रमातून साजरा करण्यात आला. माजी सैनिक, राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व पोलिस विभागाकडून तसेच मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र, पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. सुरुवातीला रायगड पोलीस व स्काऊड गाईडच्यावतीने संचलन करण्यात आले. यावेळी खानाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांमधून नृत्याचे सादरीकरण केले. त्यानंतर लेझीम पथकाद्वारे मानवंदना देण्यात आली. दरम्यान, देशसेवेसाठी शहिद होणारे निलेश तुणतुणे यांच्या कार्यक्रमांचे आमंत्रण जिल्हाधिकारी जावळे यांच्यापासून पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांना दिले होते. मात्र यातील कोणीही अधिकारी या कार्यक्रमाकडे फिरकलेच नसल्याची चर्चा यावेळी दबक्या आवाजात सुरु होती. महसूल मंत्री यांच्या उपस्थितीत अलिबागमध्ये महाराजस्व अभियान राबविण्यात आला. या कार्यक्रमात साधा उल्लेखही प्रशासनाकडून करण्यात आला नाही. त्यामुळे शासकीय यंत्रणेला या कार्यक्रमाचा विसर पडल्याची चर्चा जोरदार सुरु आहे.

## लाभार्थी रिकाम्या हाती

शिंदे गटातील आमदार दळवी यांना टोला मारला. यावेळी उपस्थितांनी याचा आनंद मनमुरादपणे लुटला. दरम्यान, गोगावले भाषण करण्यास उठले. त्यांनी भाषण करण्यास सुरुवात केली. परंतु, तटकरे आणि महसूल मंत्री एकमेकांशी बोलत राहिले. त्यावेळी गोगावले यांनी तटकरेंना आवाज देत ''तुमचे आम्ही ऐकले, आता तुम्ही आमचे ऐका'', असा टोला मारल्याचा आनंद उपस्थितांनी घेतला. या शासकीय कार्यक्रमांत राजकीय टोलेबाजी दबक्या आवाजात सुरु होती. त्यामुळे राष्ट्रवादी आणि शिंदे गटातील रायगड जिल्ह्यामधील अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर दिसून आला.

**शासकीय कार्यक्रमात भाजपचा झेंडा**

महाराजस्व अभियानअंतर्गत वेगवेगळ्या योजनांचा लाभ देण्यासाठी शासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी एक व्यक्ती भाजपचा झेंडा हातात घेऊन फिरत होता. शासकीय कार्यक्रमात राजकीय झेंडा फिरत असताना पोलिसांची चांगलीच तारांबळ उडाली. अखेर अलिबाग पोलिसांनी त्या व्यक्तीला बाजूला घेतले. त्याला झेंडा काढून पिशवीत ठेवण्यास सांगितले. मात्र, पोलिसांना चकमा देत त्याने पुन्हा झेंडा बाहेर काढला. इतका बंदोबस्त असतानाही शासकीय कार्यक्रमात राजकीय झेंडा फिरविला जात असताना पोलीस बघ्याच्या भूमिकेत कसे, असा सवाल अनेकांकडून उपस्थित करण्यात आला. दरम्यान, एका पोलीस कर्मचाऱ्याला त्या व्यक्तीने ''हात लावू नको'', असे धमकावल्याचा प्रकारही जनतेसमोर दिसून आला.

## आज खालापूरमध्ये लाल वादळ धडकणार

कार्यकर्ते आणि स्वयंसेवक गेल्या अनेक दिवसांपासून अहोरात्र परिश्रम घेत आहेत. वाहतूक नियोजन, निवास, वैद्यकीय सुविधा, सुरक्षा, स्वयंसेवक नियोजन आणि शिस्तबद्ध आयोजनासाठी स्वतंत्र समित्या कार्यरत असून प्रत्येक बाबीचे बारकाईने नियोजन करण्यात आले आहे.

शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्यामध्ये काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार, आमदार सत्यजीत तांबे व आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकनाथ नाईक, प्रा. एस.व्ही. जाधव, शेकाप कार्यालयीन चिटणीस ॲड. राजेंद्र कोरडे, खजिनदार अतुल म्हात्रे, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम, शेकाप नेते संतोष जंगम, पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा ॲड. साम्या कोरडे, वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रातील पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

खालापूरमध्ये होणाऱ्या ७९ व्या वर्धापन दिनाची तयारी गेल्या महिन्याभरापासून सुरु आहे. खालापूरमध्ये होणाऱ्या वर्धापन दिनाच्या मेळाव्यासाठी शेकापने महिनाभरापासून जिल्हाभरात व्यापक जनसंपर्क मोहीम राबवली. तालुकानिहाय बैठका, गावभेटी आणि कार्यकर्ता संवादाच्या माध्यमातून मेळाव्याची तयारी करण्यात आली. त्याला महिला, तरुण आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिनाभराच्या नियोजनानंतर आता खालापूर लाल वादळाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. गावागावांत पोहोचलेल्या शेकापच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले असून, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लाल झेंड्यांनी सजलेले रस्ते, उभारलेले भव्य मंडप आणि जय्यत व्यवस्थेमुळे खालापूरमध्ये वर्धापन दिनाचा माहोल रंगला आहे. खालापूर परिसरात नाक्यानाक्यांवर लाल बावटे, स्वागत कमानी आणि फलक झळकू लागले असून, संपूर्ण परिसर शेकापमय झाला आहे. मंडप, आसनव्यवस्था, पार्किंग, वाहतूक नियोजन तसेच इतर सर्व आवश्यक सुविधांची जय्यत तयारी करण्यात आली आहे. हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत होणारा हा मेळावा पक्षाच्या संघटनशक्तीचे दर्शन घडविणारा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने विराट मेळाव्यात उपस्थित राहावे, असे आवाहन शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले आहे.

## नवी मुंबई विमानतळावर नवा इतिहास

मालवाहतुकीमुळे व्यापाराला नवी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः मुंबई महानगर प्रदेशातील औद्योगिक पट्टा, जेएनपीए बंदर, तळोजा, पनवेल, उरण आणि रायगड परिसरातील उद्योगांना या कार्गो सेवेचा मोठा लाभ मिळणार आहे. निर्यात-आयात प्रक्रिया अधिक वेगवान होण्यास मदत होणार असून जागतिक बाजारपेठेशी थेट संपर्क अधिक मजबूत होईल. यापूर्वी प्रवासी उड्डाणांच्या यशस्वी चाचण्या आणि नियमित सेवेनंतर आता कार्गो सेवेलाही प्रारंभ झाल्याने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळाली आहे. आगामी काळात देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक मालवाहू उड्डाणे येथून सुरू होण्याची शक्यता असून, नवी मुंबई विमानतळ भारतातील महत्त्वाचे कार्गो हब म्हणून उदयास येण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पुढे पडले आहे.


### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकतीपैकी त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शिरीष केशव पाटील राहणार मु. फ्लॉट नं. ११७, टॉवर बी. इमेन्सा, कल्पतरू पार्क सिटी, ठाणे, कोळशेत महाराष्ट्र ४००६०७ यांचा हिस्सा त्यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विदयमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.


**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र चौ. मी | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| मान तर्फे झिराड ता. अलिबाग | ५७/१/अ/१ | ०-९२-७० | ९२७ |

वर नमुद मिळकतीपैकी श्री शिरीष केशव पाटील यांच्या हिश्श्यांचे क्षेत्र ०-०२-७० चौ. मी. आकार २७ रू. पै. ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग,
**दिनांक- ०२/०८/२०२६**

सही/-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०



# लाल बावट्याचा संघर्ष सुरुच राहील!



पान १ वरुन

लढा चालूच ठेवतो. हेच आमचे वैशिष्ट्यं आहे. शेतकऱ्याला मध्येच वाऱ्यावर सोडून देण्याचे पाप आमच्या हातून कधीही घडणार नाही.

शेतकरी कामगार पक्षाचा कधीही उद्योगांना किंवा विकासकामांना विरोध नव्हता आणि भविष्यातही नसणार आहे. आमचा विरोध आहे तो, विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी मातीमोल किमतीत घेण्याला. ती घेताना गरीब शेतकऱ्यांना केवळ धाकदडपशाही दाखवून, सरकारी दंडेलशाही जी चालते, त्याला आमचा विरोध आहे. कारखान्याच्या नावाखाली शेतजमिनी ताब्यात घ्यायच्या आणि कुठलीही इंडस्ट्री न आणता चक्क त्या जमिनीवरचा झोन बदलून निवासी झोन करायचा आणि बिल्डर्सना करोडोंचा फायदा करून द्यायचा, याला आमचा विरोध आहे. प्रकल्पाच्या एकंदर खर्चाच्या तुलनेत अतिशय अल्प खर्च हा जमीन अधिग्रहणासाठी केला जातो, हे न पटणारे आहे.

उत्तर रायगडमधील नवी मुंबई किंवा उरणमधील आमचे लढे आठवा. आमच्या लढ्यामुळेच तेथील शेतकऱ्यांना विकसित भूखंडाचा फायदा मिळाला, हे कुणालाही नाकारता येणार नाही. आता अलिबाग-पेण परिसरात MMRDA येत आहे. अनेक महामार्ग प्रकल्प येताहेत. याकरिता शेतजमिनीचे अधिग्रहण होणार आहे. शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अल्प किमतीत घेऊन नंतर तिथे मोठ मोठे बिल्डर्स आणायचे नि त्यातून फार मोठे अर्थकारण घडवायचे, याला आमचा ठाम विरोध आहे. जमीन अधिग्रहणाच्या अगोदर शासनाने त्या जमिनीवरचा टोटल प्लॅन, एफएसआयसह जाहीर करावा. गावठाणांचा विकास हा त्या गावाची संस्कृती अबाधित राहील अशा तऱ्हेने व्हावा.

जिल्हा परिषद निवडणुकांबाबत बोलायचं झालं तर, आम्ही सर्व महापालिका निवडणुकीत व्यस्त असताना निवडणुका जाहीर झाल्या. त्यामुळे तयारीसाठी प्रत्यक्ष निवडणूक होईपर्यंत आम्हाला पुरेसा वेळ मिळाला नाही. इतर पक्षांसोबत आघाडीसाठी वाटाघाटी करून मतदारसंघ, उमेदवार ठरविणे, जात प्रमाणपत्र अशा अनेक गोष्टींसाठी बराच वेळ लागला. त्यामुळे बरेच ठिकाणी उमेदवाराला मतदारांपर्यंत पोहोचताही आले नाही. शिवाय, आमच्यासोबत राहून आतून विरोधकांना मदत करणारे अस्तनीतील निखारे यांच्याकडे केलेले दुर्लक्षही कारणीभूत ठरले, ही वस्तुस्थिती.

**प्रश्न. रायगडपुरता विचार केला तर गेली पन्नास वर्षे निर्विवाद सत्ता होती. खासदार, आमदार, जिल्हा परिषद... सर्वच निवडणुकांमध्ये शेकाप वरचढ होता. असं काय झालं आहे की, दिवसेंदिवस पक्षाची अवस्था बिकट होत चाललीय?**

**जयंतभाई :** निवडणुकीच्या राजकारणात पक्ष थोडासा मागे पडलाय, हे मान्य. परंतु तरीही, आकडेवारीच सांगते की, रायगडमध्ये आमचा जनाधार कमी झालेला नक्कीच नाही. मान्य की, एकेकाळी सर्व आमदार, खासदार, जिल्हा परिषद यामध्ये आमचे वर्चस्व होते. आज नाही. परंतु, मतदानाची आकडेवारी पाहिली तर लक्षात येते की, आजही आमचा मतदार आमच्याशी एकनिष्ठ आहे, आमच्या भूमिकेवर ठाम आहे. त्यामुळे पक्षाची अवस्था बिकट वगैरे काही नाही. आजही आम्ही पूर्वीच्याच जोशात जनतेची कामे करत आहोत. आणि, जनतेलाही माहीत आहे की, वेळप्रसंगी फक्त शेकापच धावून येईल.

**प्रश्न : नजीकच्या दोनेक वर्षात, पक्षातून आऊटगोईंग वाढलं. बिनीचे कार्यकर्ते नेतेही सोडून चाललेत. काय कारणं असावित?**

**जयंतभाई :** फक्त आणि फक्त स्वार्थ. जे गेले, ते पक्षातले सगळे कंत्राटदार गेले, असंच दुर्दैवानं म्हणावं लागतंय. आमची चूक झाली की, आम्हीच त्यांना पक्षामध्ये मोठमोठी पदे दिली. वर्षानुवर्षे ज्यांच्यावर विश्वासाने भरवसा ठेवला, त्यांनीच स्वार्थासाठी गद्दारी केली. ही गद्दारी केवळ आमच्याशीच नव्हे तर, ज्या कार्यकर्त्यांच्या बळावर ते मोठे झाले, विविध पदे भूषवली, त्या कार्यकर्त्यांशी ही गद्दारी होती. या सर्वांची वैचारिक बांधिलकी पक्षाशी नव्हतीच. केवळ पैसा आणि कंत्राटे यासाठीच या गद्दारांनी पक्षाशी बेईमानी केली. त्यांनी केलेल्या फसवणुकीमुळे, आज गावोगावचा आमचा कार्यकर्ता व्यथित आहे; परंतु निराश नाही. या गद्दारांविषयी त्याच्या मनात प्रचंड चीड आहे, राग आहे. आमचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांच्या नेतृत्वाखाली गावोगावी अत्यंत उत्साहात दौरे चालू आहेत. जनतेकडून प्रतिसादही अत्यंत चांगला मिळतोय. पक्षाचा गाव/तालुका/जिल्हा पातळीवरचा कार्यकर्ता आजही पक्षात ठाम आहे. खरं तर, मी असं म्हणेन की, जे गेले त्यामुळे शेकाप अधिक स्वच्छ झाला.

पक्षामध्ये पुरोगामी विचाराने भारलेली नवी पिढी पुढे येतेय. चित्रलेखा पाटील, सुरेश खैरे, साम्या कोरडे यांसारखे असंख्य तरूण-तरूणी लाल बावटा फडकवण्यासाठी सज्ज आहेत. पूर्वी शेकाप म्हणजे ग्रामीण भागातच वर्चस्व असलेला. परंतु, आज खालापूर-खोपोलीसारख्या भागातही तरूण रक्ताचे शिलेदार तयार होत आहेत. माझा गावागावातला, वाडीवस्तीवरचा लहान-मोठा कार्यकर्ता आज मला भेटून सांगतो की भाई, जे बेईमान गेले त्यांच्या वागणुकीमुळे पक्षाचं नुकसानच होत होतं. ते गेले हे चांगलंच झालं.

२ ऑगस्ट पक्षाचा वर्धापन दिन म्हणजे कार्यकर्त्यांचा सण, आनंदाचा सोहळा असतो. ज्याप्रमाणे आमचे शेतकरी, वारकरी खांद्यावर भागवत धर्माची पताका घेऊन, नित्यनेमाने दरवर्षी पंढरीला विठ्ठल दर्शनासाठी जातात, तसाच गावोगावचा आमचा कार्यकर्ता लाल बावटा अभिमानाने खांद्यावर घेऊन वर्धापन दिनाला उत्साहाने येतो आणि पुरोगामी विचार घेऊनच परततो. अशा या मंगलदिनी पक्ष सोडून गेलेल्या गद्दारांबद्दल जास्त न बोललेलेच बरं.

**प्रश्न : असं म्हणतात की, शेकाप सोडून गेलेले मोठे झालेत. शेकापमध्ये ठराविक पदापर्यंतच ग्रोथ आहे असं आहे का? सरळच विचारायचं तर घराणेशाहीमुळे शेकापवर ही वेळ आलीय का?**

**जयंतभाई :** आम्ही कधीही घराणेशाहीला प्रोत्साहन दिले नाही. कुणीही जनतेवर घराणेशाही लादू शकत नाही. आज रायगडमध्ये इतर पक्षांमधील असे अनेक नेते, कार्यकर्ते आहेत की ज्यांना शेकापनेच वेळोवेळी अनेक पदांवर काम करण्याची संधी दिलेली आहे. मा. यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणायचे की, शेतकरी कामगार पक्ष हा चांगले कार्यकर्ते, नेते बनविण्याचा कारखानाच आहे. पक्षात मोठमोठी पदे घ्यायची, कार्यकर्त्यांच्या कष्टाच्या जीवावर निवडून यायचं नि एके दिवशी कुठल्यातरी आमिषाला बळी पडून, स्वार्थ साधून, त्या कार्यकर्त्यांशी गद्दारी करून दुसऱ्या पक्षात जायचं. तिथे गेल्यावर शेकापला उलटसुलट बोलायचं, ही पद्धतच झालीय. किंबहुना, शेकापवर टीका केल्याशिवाय त्यांचा एकही दिवस जात नाही, यातच शेकापचे यश आहे.

इथे सर्वांनाच आपली क्षमता सिद्ध करावी लागते. तसं न झाल्यास त्यांना आपोआप बाहेर पडावे लागते. हा दुनियेचा नियमच आहे. कुणालाही सदासर्वकाळ पूर्वपुण्याईवर राहता येत नाही. स्वत:ला सिद्ध करावेच लागते. आणि, ही सिद्ध करण्याची बाब, राजकीय क्षेत्रात जास्त प्रकर्षाने आहे. कारण, त्यांचा थेट संबंध आम जनतेशी असतो. आणि हो, आमच्यावर जे घराणेशाहीचा आक्षेप घेतात, त्यांनी जरा आरशात बघावे. त्यांना आपोआप उत्तर मिळेल.

**प्रश्न : पक्षातून नाराज होऊन गेलेल्यांची घरवापसी व्हावी म्हणून काही प्रयत्न चालले आहेत का?**

**जयंतभाई :** बिल्कुल नाही. त्यांची मानसिकताच पक्षाच्या ध्येयधोरणांशी प्रामाणिक राहण्याची नाही. शेकापचा इतिहास पाहा. शेकाप नेहमीच सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करत आलाय. शेकाप सत्तेविरूद्ध नेहमीच दोन हात करणारा पक्ष आहे. जे गेले, ते सत्ता संपत्तीच्या मोहापायी गेले. आमच्यासोबत गेली अनेक वर्षे जे डाव्या विचारसरणीचे म्हणून वावरले, ते सारे डावे नव्हतेच. डावे आणि पुरोगामी असण्याचा खोटा आव आणून, बेगडी मुखवटा पांघरून ते केवळ स्वार्थापोटी पक्षात विविध पदे भूषवित होते. हे आता अत्यंत खेदाने म्हणावेसे वाटते. शेकापसारख्या डाव्या विचारसरणीतून यू-टर्न घेऊन तडक उजव्या विचारसरणीत जाणे म्हणजे वैचारिक व्यभिचारच आहे. आणि म्हणून अशा गद्दारांना पक्षाचे दरवाजे कायमचे बंद आहेत.

**प्रश्न : गेल्या काही वर्षांमध्ये पाहिलं तर शेकापचं राजकीय धोरण काहीसं धरसोडीचं वाटतं. कधी शिवसेना, कधी राष्ट्रवादी, अशा बिनभरवशाच्या धोरणामुळे पक्ष क्षीण होतंय, असं नाही वाटत?**

**जयंतभाई :** नाही! आमचे धोरण कधीही धरसोडीचे पूर्वीही नव्हते आणि भविष्यातही नसणार आहे. शेकाप हा विचारांवर आधारित ध्येयधोरण असलेला पक्ष आहे. कुठल्याही परिस्थितीत आम्ही आमचा पुरोगामी विचार कधीच सोडणार नाही. भाजपाची विचारधारा आमच्या डाव्या विचारधारेपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे त्यांचे आणि आमचे वैचारिक पातळीवर जमत नाही, हे सत्यच आहे. जेव्हा शिवसेना-भाजपा युती होती, त्यावेळी आम्ही राष्ट्रवादीसोबत होतो. नंतर ज्यावेळी राष्ट्रवादी (अजित पवार) गट वेगळा झाला, त्यावेळी आम्ही आमच्या इंडिया आघाडीतल्या शिवसेनेसोबत होतो. दोन्ही वेळा आमचा विरोध भाजपाला होता, हे लक्षात घ्या.

साधारण १९८९ नंतर राजकारणाची बैठकच बदलली. काँग्रेसच्या राज्यात छोट्या पक्षांना सन्मानाने वागवलं जायचं. काँग्रेस विरोधी विचारांचा आदर करत असे. आत्तासारखी बेकायदेशीरपणे विविध यंत्रणांना हाताशी धरून आमदार, खासदार फोडाफोडी नसायची. काँग्रेसचा कारभार बाबासाहेबांच्या संविधानानुसार चालायचा. आज राजकारण बदलले. सध्याच्या राज्यकर्त्यांना छोटे प्रादेशिक पक्षच नकोत. 'इंडिया आघाडी'चे धोरण प्रादेशिक पक्षांना त्रासदायक नाही. आघाडीत प्रामाणिकपणा दिसतोय. जागावाटपामध्ये छोट्या पक्षांना योग्य तो वाटा देतील, असं माझं व्यक्तिगत मत आहे. देशभरात सत्ताधाऱ्यांबद्दल विरोधी वातावरण आहे. अगदी ताजं उदाहरण, जंतरमंतरच्या घटनेनंतर, लोकसभेत पंतप्रधान मोदीजी उत्तर देण्यासाठी सामोरे गेलेच नाहीत. उलट, राहुल गांधी मात्र निडरपणे वाघासारखे लढले. भविष्यात इंडिया आघाडीतील राहुल गांधी, प्रियांका गांधी, सुप्रिया सुळे, रोहित पवार, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, बंटी पाटील यांच्यासारखे तरूण व धडाडीचे नेतृत्वच भारताचे भवितव्य उज्ज्वल करेल, यात शंकाच नाही.

**प्रश्न : पूर्वी कम्युनिस्ट पक्ष, शेकाप, लाल निशाण अशा अनेक डाव्या पक्षांचा दबदबा राजकारणात असायचा. हल्ली मात्र आरएसएस किंवा तत्सम उजव्या विचारसरणीची चलती आहे. जनतेला धर्म, जाती-जातीत विभागलं जाऊ लागलंय. निधर्मी भारत आता खरंच हिंदू राष्ट्र होत चाललाय का?**

**जयंतभाई :** मला नाही तसं वाटत. कम्युनिझम हा डाव्या विचारसरणीवर आधारित आहे. त्यात दोन्ही कम्युनिस्ट, शेकाप, लाल निशाण असे वेगवेगळे पक्ष येतात. समाजामध्ये जे गोरगरीब, दीनदुबळे, मागासवर्गीय आहेत, पिडलेले, नाडलेले असे जे आहेत, त्यांच्या हक्काची लढाई, संघर्ष हे डावे पक्ष आजही करतात. भांडवलशाहीचे समर्थन करणारे ते भाजपसारखे उजव्या विचारसरणीचे पक्ष. आम्ही गांधीवादी नाही; पण आम्ही नेहमीच महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांच्या समतेच्या विचारसरणीला मानणारे आहोत.

कम्युनिझममध्ये सर्वकाही सरकारच्या मालकीचे. तिथे खासगी भांडवलशाहीला थारा नाही. ब्रिटिशांनंतर काळाच्या ओघात आपण दोन्हींचा मध्य साधला आणि समाजवादी विचारसरणी अवलंबिली. ज्यामध्ये सरकारी मालकीची आणि खासगी मालकीची कारखानदारी असे दोन्हीही असतील. म्हणूनच तर तत्कालीन काँग्रेस सरकारने लोखंड, खते वगैरे पायाभूत क्षेत्रांमध्ये सरकारी कारखानेही उभारले. जेणेकरून किमतीबाबतीत योग्य नियंत्रण राहून ग्राहकांचे शोषण होणार नाही. आज मात्र विविध सरकारी क्षेत्रात भांडवलशाही घुसू पाहतेय. विविध उद्योगांचे खासगीकरणाचे धोरण जर असेच राहिले, तर कालांतराने सर्वच क्षेत्रामध्ये खासगी भांडवलदार असतील आणि मग उपभोक्त्यांचे, गोरगरीबांचे, कामगारांचे अधिकाधिक शोषण होईल. म्हणून आम्हा सर्व डाव्या पक्षांचा पायाभूत क्षेत्रांमध्ये संपूर्ण खासगी मालकीला विरोध आहे. आता हिंदू राष्ट्र या संकल्पनेबाबत. आरएसएस किंवा भाजपाला भारताला हिंदू राष्ट्र बनविणे तेवढे सोपे नाही. भारतात हिंदू बहुसंख्येने जरी असले, तरी मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध, जैन, शिख असे विविध धर्मांचे आणि पंथांचे लोक अनेक वर्षांपासून गुण्यागोविंदाने नांदत आहेत. सर्व धर्मांची शिकवण ही मानवतेच्या कल्याणासाठीच आहे. कुठलाही धर्म द्वेष, तिरस्कार शिकवत नाही. कोण कुठल्या धर्मात जन्माला येईल, हे सांगू शकत नाही. म्हणून मला तर असं वाटतं की, हिंदू राष्ट्र ही संकल्पना म्हणजे फक्त इतर धर्मियांना भीती दाखविण्याचा प्रकार असावा.

**प्रश्न : सध्याच्या भांडवलशाहीच्या धोरणांमुळे कम्युनिझम लुप्त होईल आणि त्याचबरोबर नजीकच्या काळात पुरोगामी चळवळही नामशेष होईल असं नाही वाटत?**

**जयंतभाई :** आमचा भांडवलशाहीला असलेला विरोध म्हणजे शोषणाला विरोध आहे. कुठल्याही भांडवलशाहीमध्ये गोरगरीब मजूर असो किंवा अगदी उपभोक्ता असो, शोषण हे असतेच. या शोषणाच्या विरोधात आम्ही आहोत. भांडवलशाही प्रभावी असेल तर शासनही त्याच विचारसरणीचे बनते. संपूर्ण समाजाच्या दृष्टीने हे घातकच आहे. वस्तूंची उपलब्धता, किमतीवरचे नियंत्रण, चल-अचल संपत्तीचे वाटप वगैरे सर्व आर्थिक बाबी भांडवलदार ठरवतो. समाजात आर्थिक असमानता निर्माण होते. श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब बनतो. या व्यवस्थेलाच भांडवलशाही म्हणतात. अशावेळी कम्युनिझम किंवा समाजवादी अर्थव्यवस्था हाच एक उपाय असतो. आणि म्हणूनच जोपर्यंत जगात गोरगरीब, पिडलेला, नाडलेला आहे, तोपर्यंत आम्ही डाव्या विचारसरणीचे पक्ष आणि पुरोगामी चळवळीची गरज आहे.

आज भारतात शेतकऱ्यांची काय अवस्था आहे? बेभरवशाच्या अकाली पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. अशा बिकटप्रसंगी आमच्या बळीराजाला त्वरित मदत मिळालीच पाहिजे. आजच बातमी वाचली की, बोगस बियाणांमुळे अनेक ठिकाणी बियाणे रूजलीच नाही. संबंधितांवर कठोर कारवाई व्हायला हवी. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासन उदासीन असतेच; परंतु जनतेमध्येही गैरसमज असतात. शेतीला मिळणारी सबसिडी किंवा कर्जमाफी यासंबंधी मोठे गैरसमज आहेत; विशेषत: उच्चभ्रूंमध्ये. भारतातील शेती ही बहुतांशी निसर्गावरच अवलंबून आहे. त्यामुळे बिगरमोसमी पावसाचा तडाखा, हाती आलेल्या पिकाचे होत्याचे नव्हते करून टाकतो. अशा वेळी कर्जमाफीच्या रूपाने शेतकऱ्याला मदतीची गरज असते. शेती कसण्यासाठी येणारा खर्च, बियाणे, खते यांच्या वाढत्या किमती, मजुरी आणि शेतीतून मिळणारे उत्पन्न यांचे नेहमीच व्यस्त प्रमाण असते. त्यामुळे शेती आता आतबट्ट्याची ठरू लागलीय. अशावेळी शेतकऱ्याला शेती सामुग्रीसाठी सबसिडी देणे गरजेचेच आहे.

स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे आपण अन्नधान्याची आयात करत होतो. पारंपरिक शेतीमधून येणारे अल्पसे उत्पन्न आणि वाढती लोकसंख्या याचा मेळ बसत नव्हता. त्यावेळी द्रष्ट्या पं. नेहरूंनी यावर हरित क्रांतीची योजना आणली आणि आता तर आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहोत. जरा विचार करा, शेतकऱ्यांनी शेती नुकसानीत जाते म्हणून, शेती कसायचीच बंद केली तर? भारताची अर्थव्यवस्थाच ठप्प होईल. शेतकऱ्यांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी आणि त्यांची बाजारपेठेतील पिळवणूक थांबवण्यासाठी डाव्या विचारसरणीचे पुरोगामी पक्षच शेतकऱ्यांच्या पाठीशी राहतात. जे शेतकऱ्यांच्या बाबतीत, तेच कामगार व कष्टकऱ्यांच्या बाबतीत. वेतन हे कामाचे स्वरूप, कामाचे तास यावर आधारित असावे. कामाठिकाणी योग्य त्या सोयी-सुविधा असायलाच हव्यात. भांडवलदारी विचारसरणीचे मालक हे नेहमीच कामगारांचे याबाबतीत शोषण करत असतात. ते थांबवण्यासाठी कामगार एकजूट असणे गरजेचे असते.

भांडवलदार मानसिकता ही जात, धर्म, पंथ या गोष्टीचा बागुलबुवा उभा करून समाजात नेहमी फूट पाडते, तेढ निर्माण करते. समाज एकवटू नये म्हणून कायम दुही निर्माण करते. जेणेकरून शोषणाचे कार्य निर्विघ्न पार पाडता येईल. दुर्दैवाने आज आपल्या देशात तशीच परिस्थिती निर्माण होतेय. त्यामुळे मला नक्की विश्वास वाटतो की, नजीकच्या काळात डाव्या विचारसरणीची पुरोगामी चळवळ अधिक जोमाने वाढेल. सध्याच्या काळात अशा चळवळीचीच जास्त गरज आहे.

**प्रश्न : गतकाळात काँग्रेसच्या चुकांमुळे जनतेचा हा बुद्धीभ्रंश झालाय का? भ्रष्ट काँग्रेस नको म्हणून जनतेने भाजपची निवड केली. पण, 'रोगापेक्षा औषध भयंकर' अशी अवस्था खरोखरच आहे की नुसतेच मीडियाने रंगवलेले चित्र आहे?**

**जयंतभाई :** अगदी बरोबर. आमचाही काँग्रेसला पिढीजात विरोध होता. शेकापची स्थापनाच मुळी काँग्रेसला विरोध म्हणून झालीय. काँग्रेस शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दुर्लक्ष करते, शेतमालाला बाजारभाव, खते-बियाणे यांच्या किमती, अशा अनेक गोष्टींमुळे नाराज होऊन आमच्या नेतेमंडळींनी शेकाप स्थापन केला. सरकारविरूद्ध आमचा कायम संघर्ष असायचा; महाराष्ट्रात रोजगार हमी योजना, शेतमाल एकाधिकार पद्धत वगैरे शेतकऱ्यांच्या हिताच्या गोष्टींसाठी लढा देऊन आम्ही सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडलं.

हे मान्य की, काँग्रेसमुळे देशात काही चांगल्या गोष्टीही झाल्या. काही चुकाही झाल्या. परंतु, अलीकडच्या काळात काँग्रेसबद्दल अतिशय विपरीत आणि विखारी अपप्रचार झाला. 'खोटे बोल, पण रेटून बोल' अशा अपप्रचाराला खोडून काढून जनतेला खरे चित्र दाखवण्यात काँग्रेस कमी पडली. इलेक्ट्रॉनिक माध्यमामधून झालेला हा गोबेल्स धरतीचा अपप्रचार जनतेला खराच वाटू लागला नि काँग्रेसला त्याची किंमत मोजावी लागली.

प्रत्येकाला १५ लाख रू., ४०० रू. गॅस सिलिंडर, ३५ रू. पेट्रोल अशा खोट्या आश्वासनाला सामान्य जनता भुलली, हे सत्यच आहे. सोशल मीडियाद्वारे जनतेला गुमराह केले, शिवाय अँन्टी इन्कम्बन्सीचा परिणाम म्हणूनही काँग्रेसला फटका बसला.

**प्रश्न : कामगारांच्या प्रश्नांकडे आपण कसं बघता?**

**जयंतभाई :** मोठ्या उद्योगातील कामगार हा संघटित असतो. त्यांच्या मागण्यांसाठी भांडवलदाराशी संघटितपणे लढतो, युनियनद्वारे वाटाघाटी करून आपल्या मागण्या पदरात पाडून घेतो. परंतु, खरा प्रश्न आहे तो असंघटित कामगारांचा. कामाच्या ठिकाणी सोयीसुविधा नसणे, कामाचे तास, तटपुंजे वेतन, वर्षानुवर्षे काम करूनही भविष्याची चिंता, शासनाची उदासीनता असे अनेक प्रश्न आज कंत्राटी कामगारांपुढे आहेत. काही वर्षांपूर्वी आम्ही आरसीएफमधील कंत्राटी कामगारांचा लढा दिला आणि तो यशस्वी केला. जवळपास पाच-सहाशे कामगारांना कमी करण्याचे धोरण कंपनीचे होते. कामगारांसाठी नोकरीची कुठलीही शाश्वती नव्हती. मॅनेजमेंटची मनमानी चालू होती. एवढेच काय, अनेक वर्षे कामगारांचे पीएफचे पैसेही भरलेले नव्हते. कामगार त्रस्त आणि निराश झालेला होता. अशावेळी फक्त शेकाप त्यांच्या पाठीशी राहिला नि त्यांचे वेतन, इतर सुविधा आणि भविष्य शेकापने सुरक्षित केले. यानिमित्ताने आमची मागणी आहे की, आज महाराष्ट्रात जसं माथाडी बोर्ड आहे, त्याचप्रमाणे कंत्राटी कामगारांची सुरक्षा आणि हित जपणारे कंत्राटी कामगार बोर्ड असावे.

**प्रश्न : सध्याच्या बहुचर्चित जंतरमंतरच्या घटनेबद्दल काय वाटतं?**

**जयंतभाई :** नवी पिढी म्हणजे मोबाईलमध्ये मग्न असणारी, सामाजिक भान नसणारी, स्वत:मध्येच गर्क असणारी... असा एक समज होता. परंतु, जंतरमंतरच्या घटनेने तो समज पार खोटा ठरवला. या पिढीने जे घडवलं, ते सारंच अद्भुत होतं. आमची पारंपरिक आंदोलने म्हणजे ठराविक साच्याची. पायी मोर्चा निघणार, झिंदाबाद, हम तुम्हारे साथ है वगैरे घोषणा. नंतर नेत्यांची भाषणे... झालं. पण, जंतरमंतरवर या GenZ ने नेटाने रात्रंदिवस ठिय्या मांडून केंद्र सरकारला झुकवलं, ते सारंच आमच्या आकलनापलीकडचं होतं. दिल्लीच नाही, तर हे लोण सर्व भारतभर पसरले. अवघ्या भारतभर ही तरूणाई अत्यंत शिस्तबद्धपणे रस्त्यावर आली. लाखो विद्यार्थी पाहून सरकारही हडबडले आणि चक्क सरकारने विद्यार्थ्यांपुढे शरणागती पत्करली.

विशेष म्हणजे, मुलांएवढ्याच मुलीही तिथे असूनही कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. पोलिसांच्या लाठ्याकाठ्या खाल्ल्या तरी मागे हटले नाही. दुसऱ्या दिवशी वर ....''पोलीस अंकल'' अशी हाक मारून त्यांना चॉकलेट, पाणीही विचारलं... अरे काय ही पिढी! मी व्यक्तीश: तर या पिढीच्या प्रेमातच पडलोय. भविष्यात जे काही राजकारण करेन, ते या पिढीला डोळ्यासमोर ठेवूनच करेन... एवढा प्रेमात पडलोय. हे सारं पाहून एक खात्री मात्र नक्की झाली की, या पिढीच्या हातात भारताचे भविष्य नक्कीच उज्ज्वल आणि सुरक्षित आहे. हॅट्स ऑफ टू GenZ!

**प्रश्न : वर्धापन दिनानिमित्त आपण दिलखुलास व्यक्त झालात. आता शेवटचा प्रश्न. अजून वीसेक वर्षे आपण नक्कीच कार्यरत राहणार. पक्षाच्या आगामी काळातील काही योजना?**

**जयंतभाई :** अनेक योजना आहेत. पक्षबांधणीमध्ये नवीन तरूणांना वाव देणार, सत्ता नसली म्हणून काय झालं, रस्त्यावरची लढाई, संघर्ष करून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणार. एवढी पडझड झाली, अपयश आलं तरी मी आणि माझे गावोगावचे कार्यकर्ते अजिबात खचलेलो नाही. नाऊमेद झालेलो नाही. डाव्या विचारांनी भारलेले आम्ही सर्व, सर्वसामान्यांसाठी, शेतकरी, कष्टकरी, कामगारांसाठी संघर्ष करायला पुन्हा एकदा सज्ज आहोत. आम्ही पुन्हा भरारी मारू. राजसत्ता असो की धनशक्ती, आम्ही कुणापुढेही झुकणार नाही. अन्यायाविरूद्ध, दडपशाहीविरूद्ध, भांडवलशाहीविरूद्ध आमचा लढा चालूच राहील.

आम्ही थकणार नाही.

आम्ही घाबरणार नाही.

आम्ही कसल्याही आमिषाला बळी पडणार नाही.

वाडवडिलांनी कष्टाने जोपासलेली नीतीमत्ता आणि वैचारिकता आम्ही प्राणपणाने जोपासू.

आमचा लाल बावटा नेहमी असाच दिमाखाने खांद्यावर घेऊन जुलमी सत्तेविरूद्ध लढा देऊ.

हाच आमचा निर्धार, हाच आमचा एल्गार!

**लाल बावटेकी जय! लाल सलाम!**



# लोकमान्य टिळक, अण्णा भाऊ साठेंना अभिवादन



। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय, अलिबाग आणि प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचातर्फे रामनारायण सभागृहात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्ताने प्रतिमेला अभिवादन शनिवारी (दि.१) रोजी करण्यात आले. याप्रसंगी कोमसापचे जिल्हा प्रतिनिधी तसेच अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव नंदु तळकर, तसेच शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त नागेश कुळकर्णी, अलिबाग शाखेच्या कोमसापच्या सहकार्यवाह दिप्ती कुळकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागेश कुळकर्णी यांनी केले. तर आभार ग्रंथालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी मानले. यावेळी वाचनालयाच्या झेबा कुरेशी तसेच वाचक वर्ग उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्रीमती.लक्ष्मी नारायण अडखळे रा.कळमशेत, ता.तळा, जि.रायगड, २) श्रीमती.विजया विजय साळवी रा.अडनाळे, ता.तळा, जि.रायगड ३) श्री. तुकाराम धोंडू साळवी रा. अडनाळे, ता.तळा, जि.रायगड, ४) श्री. रामचंद्र धोंडू साळवी रा.तळाशेत, इंदापूर, ता.माणगांव, जि. रायगड, ५) श्री.श्रीराम धोंडू साळवी रा.पोस्ट ऑफीस जवळ, ३/३१ भागिर्थी निवास, स्वदेशी मिल रोड, चाफेगल्ली, चुनाभट्टी, मुंबई-४०००२२, ६) श्री. विनायक विजय साळवी रा. अडनाळे, ता.तळा, जि.रायगड, ७) विशाखा विजय साळवी रा.अडनाळे, ता.तळा, जि.रायगड, ८) निशा नामदेव बाईत रा.कळमशेत, ता.तळा, जि.रायगड व ९) प्रतिक्षा प्रकाश कुळे रा.भानंग, ता.तळा, जि.रायगड यांच्या वडिलोपार्जित अविभक्त हिश्श्याच्या मौजे अडनाळे, ता.तळा, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या कुळ कायद्यांतर्गत संपादित केलेल्या मिळकती आहेत. परंतु ७/१२ दप्तरी सरकारी पडीत अशी नोंद आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| अडनाळे, ता.तळा, जि.रायगड | ६९/१ | १०-४८-०० <br> ०२-८२-०० <br> एकुण १३-३०-०० | ६.०० |
| अडनाळे, ता.तळा, जि.रायगड | ६९/२ | ५-१६-०० <br> ०-७४-०० <br> एकुण ५-९०-०० | ३.०० |

सदरहू मिळकतींसंबंधी दि. २१/०५/२०२५ रोजी दस्त क्र.१५२१/२०२५ ने व दि. २६/०५/२०२५ रोजी दस्त क्र.१५७८/२०२५ ने आमच्या अशिलांकडून, श्री.चंद्रकांत परशुराम तेलंगे रा.रासल, ता.सुधागड, जि.रायगड यांनी अनाधिकाराने व बेकायदेशरपणे फसवून आमच्या अशिलांच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा घेवून अखत्यारपत्रे नोंदणीकृत करुन घेतलेली आहेत. त्यानंतर सदरहू दोनही दस्त आमचे अशिलांनी दि. ३१/१०/२०२५ रोजी दैनिक कृषीवल व दैनिक रत्नागिरी रायगड टाइम्स व दैनिक सागर या वृत्तपत्रांमध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन रद्द केलेले आहेत.

आमच्या अशिलांनी दि. २१/०५/२०२५ रोजीचे दस्त क्र.१५२१/२०२५ व दि. २६/०५/२०२५ रोजीचे दस्त क्र. १५७८/२०२५ हे दस्त रद्द केल्यानंतर माणगांव येथील सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर मुकदमा नं. ६/२०२६ व रेग्युलर मुकदमा नं.७/२०२६ ने अखत्यारपत्रे रद्द करण्यासाठी दावे दाखल केलेले आहेत, दोनही दावे प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहेत.

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे अडनाळे, ता. तळा, जि.रायगड येथील गट नं. ६९/१ व गट नं. ६९/२ या मिळकतींसदर्भात कुणीही कोणत्याही प्रकारची श्री. चंद्रकांत परशुराम तेलंगे यांचेबरोबर कामे अथवा व्यवहार करु नयेत याची नोंद घ्यावी.

अलिबाग. सही/-
दिनांक : ०१/०८/२०२६.
**ॲड. सुनिल के.वाकडे**
डी-१, तळमजला
हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे कवठेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मारूती राघो कवठे वै ७ यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कवठेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार( रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३२ | ३ | १-९८-०० पैकी ०-६०-०० | १-१९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०२/०८/२०२६
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| बेलोशी ता.अलिबाग | २६२ | ०-१७-२० | ०.८९ |

वर वर्णन केलेली मिळकत हि या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल , साठेकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधाचा लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्या कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांचे आत आणून दयावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. मागाहुन येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग. सही/-
दिनांक : ०१/०८/२०२६
ॲडव्होकेट
**ॲड.निखिल राजाराम पाटील**
ॲकॉन क्लासिक, फ्लॅट नं. १०६
जिल्हा न्यायालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९१४५५८७२००

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) कलायसेल्वी श्रीनिवासा रामानुजर, २) आरिया रामानुजर व ३) काविया रामानुजर सर्व रा. प्लॉट नं. ४६७/ए, वोरा भुवन, फ्लॅट नं.३०३, ३रा मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, महेश्वरी उद्यान समोर, माटुंगा (पुर्व), मुंबई-४०००१९ यांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. प्रदीप कुमार केदारनाथ अग्रवाल, २) श्रीमती मधु प्रदीप कुमार अग्रवाल, ३) कामाक्षी प्रदीप कुमार अग्रवाल, ४) श्री.अभिषेक प्रदीप कुमार अग्रवाल, ५)मिनाक्षी प्रदीप कुमार अग्रवाल क्र. १ ते ५ रा. बंगलो नं.३, श्रीनिक पार्क को. ऑप.हौ.सोसायटी, सिडको गेस्ट हाऊस जवळ, किल्ले गावठाण, नवी मुंबई, जि.ठाणे-४०६१४ यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत व साठेकरारसुद्धा केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड. | २१९/१ | ०-७७-८० <br> ०-०६-४० <br> एकूण ०-८४-२० | २.०३ |

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग. सही/-
दिनांक : ०१/०८/२०२६.
**ॲड सुनिल के.वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक १) उषा अशोक जोहरी व २) प्रसूनअशोक जोहरी यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८५ | २ | ०-२८-०० | ०-२८ |
| ८५ | ४ | ०-१८-०० | ०-१९ |

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेल्या मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील वर्णनाच्या मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०२/०८/२०२६
**ॲड. सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड- ४१०२०१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मोठे वेणगाव ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील यांनी १) पंढरीनाथ रघुनाथ पालकर २) माणिक वामन खंडागळे ३) कुंदा सुदाम घरत ४) बेबी लक्ष्मण बडेकर या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १०२/१/अ | १-१०-०० गुंठे | १८-९८ |
| १०२/१/ब | ०-२८-०० गुंठे | ०-३४ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
०२/०८/२०२६
मो. नं ९२८४६७७५१६
आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु.पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

जा.क्र.१४१३/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारुती मंदिराजवळ,
मु.पो.चेंढरे, आलबाग जि.रायगड
दि.३१/०७/२०२६.

**चौकशीची जाहीर नोटीस**
नियम ७ अ प्रमाणे

अर्ज क्रमांक : २४७/२०२६
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- **ADV. ANKIT BANGERA WELFARE TRUST** ..बाबत.

Mr.Ankit Shrinivas Bangera .अर्जदार
Near Maruti Naka, Shardul Housing Society,
E-Wing, Alibag
Tal. Alibag, Dist. Raigad

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

(२)खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम- २०००/-रुपये

(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ३१.०७.२०१६ रोजी दिली.

**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.गुणवंत धर्मराज झोपे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक सौ.साधना अशोक भोळे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. देवपाडा, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| ७ | ३/ब/१ | ०-७०-०० | ०-५० |

यापैकी सौ.साधना अशोक भोळे यांचे मालकीची व हिश्याची ०-३५-०० हे.आर.क्षेत्राची मिळकत देणेचे ठरले आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि.०१/०८/२०२६
**ॲड.नरेश रामदास आहीर**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत जि.रायगड-४१०१०१
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील प्रमुख जिल्हा न्यायाधीश रायगड यांचे कोर्टात,**

नि.६०/ ड
दिवाणी अपील क्रमांक २४४/२००७
पुढील तारीख १८/०८/२०२६

अनंत घारपुरे वगैरे. ....... अपेलंट
विरुद्ध
मंजुळाबाई पानसरे वगैरे. ....... रेस्पॉडंट

अपेलंट यांनी सदरील अपील अलिबाग येथील दिवाणी कोर्टाने रेग्युलर मुकदमा १४६/१९९२ या कामामध्ये दिलेल्या निर्णयाविरुद्ध दाखल केले आहे.

सदर अपिलातील प्रस्तावित रेस्पॉडेंट क्रमांक २/१ समता अमित पानसरे आणि प्रस्तावित रेस्पोंडेंट क्रमांक २/३ संचित अजित पानसरे यांस शिवम् सोसायटी, ब्राहमण आळी, येथे नोटीस पाठविली असता बजावणी झालेली नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित रेस्पोंडेंट क्रमांक २/२ श्वेता मिलिंद राऊत यांत श्रीवर्धन येथे नोटीस पाठविली असता बजावणी झालेली नाही व त्या मुंबई येथे रहात असल्याबाबत बेलिफ रिपोर्ट आला आहे.

तरी सदर प्रस्तावित रेस्पॉडेंट यांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येत आहे की, या अपिलाची पुढील तारीख १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या कोर्टात स्वतः अथवा प्राधिकृत व्यक्तीमार्फत त्यांनी हजर व्हावे व आपले म्हणणे दाखल करावे. त्याचप्रमाणे बजावणीकरिता स्वतःचा पत्ता दाखल करावा.

सदर तारखेस हजर होण्यास म्हणणे देण्यास व पत्ता दाखल करण्यास कसूरी केल्यास सदर प्रस्तावित रेस्पॉडेंट यांचे नांव अपिलाने कामी रेस्पॉडेंट क्रमांक २ यांचे वारस म्हणून समाविष्ट केले जाईल आणि/अथवा अन्य योग्य तो हुकुम करणेत येईल याची नोद घ्यावी.

आज तारीख १५/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने दिले.

**लिपीक** **अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय,** कोर्टाचा शिक्का **जिल्हा न्यायालय,**
**अलिबाग-रायगड** **अलिबाग-रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक रेखा अवधुत म्हात्रे, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| गुंजिस ता.अलिबाग | ३७/२/अ | ०-१६-७० <br> पो.ख. ०-०१-०० <br> एकुण क्षेत्र ०-१७-०० | ०.३३ |

वर नमुद मिळकतीमधील रेखा अवधुत म्हात्रे यांचा असलेल्या अविभाज्य हिश्याबाबत

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/०८/२०२६
**ॲड. विनित जितेंद्र वर्तक**
रा.बुरुमखाण, वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बागायत जमिन मिळकतीपैकी ०-०६-०० (हे.आर), बागायत जमिन मिळकत श्री. गजानन पांडुरंग वर्तक व सौ. वैशाली गजानन वर्तक, राहणार चौल-बेलाई, ता. अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. गजानन पांडुरंग वर्तक व सौ. वैशाली गजानन वर्तक यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, सदर जमिन मालकांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग. | १९८६ | ०-१६-०० <br> ०-००-२० पो.ख. <br> ०-१६-२० एकूण | ३-७५ |

अलिबाग,
सदरील बागायत जमिन मिळकतीपैकी श्री.गजानन पांडुरंग वर्तक व सौ.वैशाली गजानन वर्तक यांच्या मालकीची ०-०६-०० आर्स बागायत जमिन मिळकत.

दिनांक : ०१/०८/२०२६. सही/
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल रिता चेतन सोळंकी यांनी त्या मिळकतीचे मालक श्री. पंढरीनाथ नानू आगिवला उर्फ आगिवले व इतर सह हिस्सेदार यांचे कडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे पिंगळस, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १७ | १/अ | १.२४.०० पैकी ४० गुंठे क्षेत्राची मिळकत तंदगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा | १.१२ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा-कबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकितदान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ३१-०७-२०२६
**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं - ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सहाण, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाचे जमीन मिळकती पैकी क्षेत्र ०-१६-२० हे. आर श्री. शशांक दामोदर म्हात्रे रा. गोदरेज वन जवळ, पिरोजशा नगर विक्रोळी ईस्ट मुंबई यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड | २६ | ०-७९-४० <br> पो.ख. ०-०७-९० <br> एकूण ०-८७-३० | २०.४३ |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी श्री. शशांक दामोदर म्हात्रे यांचे मालकीचे क्षेत्र ०-१६-२० हे. आर आकार ४.१७ रु.पैसे (खाते क्र.१०११) जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दिनांक : ०१/०८/२०२६
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा.नवेदर बेली, ता.अलिबाग
जि.रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कातळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती पैकी ००-१५-५० (हे. आर) शेतजमिन मिळकत श्री. कैलास सखाराम पाटील, राहणार कातळपाडा, ता. अलिबाग, यांच्या हिश्याची व निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. कैलास सखाराम पाटील यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**


| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| कातळपाडा ता.अलिबाग. | २४ | १-०५-०० <br> ०-१९-४० पो.ख. <br> १-२४-४० एकूण | १८-८३ |

**सदरील शेतजमिन मिळकतीपैकी श्री.कैलास सखाराम पाटील यांच्या हिश्याची ०-१५-५० (हे. आर) शेतजमिन मिळकत.**

अलिबाग,
दिनांक : ०१/०८/२०२६. सही/
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# शार्लोट लेकचे पाणी सोडण्यावरून वाद

## ठेकेदाराला वाचवण्यासाठी माथेरान नगरपरिषद धडपडतेय? सत्ताधारी गटातूनच आरोप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शार्लोट लेकचे संपूर्ण पाणी ३ ऑगस्ट रोजी सोडण्याच्या नगरपरिषदेच्या निर्णयावरून वाद निर्माण झाला आहे. तलावातील गाळ पाण्यासोबत बाहेर काढण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे पालिकेचे म्हणणे असले, तरी ठेकेदाराला वाचवण्यासाठीच हा खटाटोप सुरू असल्याचा थेट आरोप माजी नगराध्यक्ष तथा सत्ताधारी गटाचे स्वीकृत नगरसेवक आणि शिवसेना शहरप्रमुख मनोज खेडकर यांनी केला आहे.



शार्लोट लेकमधील गाळ गेल्या १२ वर्षांपासून काढण्यात आलेला नाही. गाळ काढण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आंदोलन व उपोषणही केले होते. दरम्यान, अमृत-२ योजनेतून सुमारे पाच कोटी रुपयांचे तलाव संवर्धनाचे काम सुरू असून, ठेकेदाराला सुमारे २६०० ट्रक गाळ काढणे अपेक्षित असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यासाठी सुमारे तीन कोटी रुपयांची तरतूद असल्याचे सांगितले जात आहे.

मात्र, गाळ काढण्याचे काम झाले नसतानाही ठेकेदाराला बिल अदा करण्यात आल्याचा आरोप खेडकर यांनी केला आहे. आता तलाव तुडुंब भरलेला असताना पाणी सोडल्यास गाळही वाहून जाईल आणि ठेकेदाराच्या कामातील त्रुटी झाकल्या जातील, असा आरोप त्यांनी केला आहे. ठेकेदाराला वाचवण्यासाठी आणि निधीचा अपव्यय करण्यासाठीच पाणी सोडले जात आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

मनोज खेडकर यांनी समाजमाध्यमांवर घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे शार्लोट लेकच्या संवर्धनाच्या कामावरून सुरू असलेल्या वादाला आता वेगळे वळण मिळाले आहे.

### मोरबे धरणाचे अधिकारी आता कुठे?

**शार्लोट लेकमधील पाणी तीन वर्षांपूर्वी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी नवी मुंबई महापालिकेने आक्षेप घेतला होता. मग आता पाणी सोडण्यापूर्वी नवी मुंबई महापालिकेची परवानगी घेण्यात आली आहे का? तसेच मोरबे धरणाशी संबंधित अधिकाऱ्यांची याबाबत भूमिका काय आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. पाणी सोडण्याच्या निर्णयापूर्वी सर्व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधला आहे का, याचा खुलासा पालिकेने करावा, अशी मागणी होत आहे.**



## आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी संस्कार शिक्षण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात वैजनाथ येथे असलेल्या जीवनविद्या मिशनमध्ये आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी संस्कार शिक्षण आणि मूल्यजागृती यांचे शिक्षण देणाऱ्या कार्यशाळेत सहभाग घेतला.

घोडेगाव येथील शासकीय आश्रमशाळेतील १०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी एकदिवसीय संस्कार शिबिरात सहभागी होते. वामनराव पै यांचे संस्कार अंगिकारण्याचा प्रयत्न केला. मुलांमध्ये संस्कार शिक्षण व मूल्यजागृती करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी कर्जत येथील जीवनविद्या मिशनमध्ये आले होते.

या उपक्रमासाठी अपर आयुक्त गोपीचंद कदम यांची प्रेरणा घेऊन प्रकल्प अधिकारी गणेश इवनाते यांचे मार्गदर्शन नुसार हे कार्यशाळा यशस्वी झाले.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**डॉ.श्री. संजीव चन्नपा शेटकर, वाढदिवस अलिबाग**



**रोहन गेडाम, स्मरणार्थ अलिबाग**

**श्री. सिद्धार्थ हेमंत ठाकूर, पेढांबे, अलिबाग**

## चेन हिसकावून चोर पसार

**पनवेल** : दहा ग्राम वजनाची सोन्याची चैन गळ्यातून हिसकावून चोरटे पळून गेले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत. बारवई पुलाजवळ पुणे मुंबई जुना हायवे येथे फिर्यादी उभे असताना मोटरसायकलवरून आलेल्या दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील चेन हिसकावून ते पळून गेले.

# मासेमारी बंदीची नुकसानभरपाई द्या!

## ●कोकण किनारा मच्छिमार संघटनेचे अप्पर विभागीय आयुक्तांना निवेदन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगडच्या समुद्रकिनाऱ्यावर पिढ्यान्पिढ्या मासेमारी करून संसाराचा गाडा हाकणाऱ्या पारंपरिक मच्छिमारांवर मासेमारी बंदीच्या काळात आर्थिक संकट ओढवते. त्यामुळे १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या बंदी कालावधीची नुकसानभरपाई तातडीने द्यावी, अशी मागणी कोकण किनारा मच्छिमार संघटनेने केली आहे. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अप्पर कोकण विभागीय आयुक्त इंद्रा यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.




(छायाचित्र : धम्मशील सावंत)

उरण, पनवेल, पेण, अलिबाग, रोहा, मुरुड, म्हसळा आणि श्रीवर्धन या समुद्रकिनारी व खाडी परिसरात मोठ्या प्रमाणात पारंपरिक पद्धतीने मासेमारी केली जाते. मात्र, वाढते औद्योगिकीकरण, विविध विकास प्रकल्प, प्रदूषण आणि सागरी वाहतुकीमुळे मासळीचे उत्पादन घटत असून, मच्छिमारांच्या उपजीविकेवर त्याचा मोठा परिणाम होत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

मासेमारी बंदीच्या काळात हजारो मच्छिमार कुटुंबांचा रोजगार ठप्प होतो. त्यामुळे बंदी कालावधीतील आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी शासनाने तातडीने अनुदान द्यावे. तसेच १ ते १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आलेली मासेमारी बंदी रद्द करून मासेमारीस परवानगी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

मच्छिमारांना मोफत बायोमेट्रिक स्मार्टकार्ड देण्यासाठी गावोगावी विशेष शिबीरे आयोजित करावीत, विकास प्रकल्प व प्रदूषणामुळे बाधित मच्छिमारांना नुकसानभरपाई द्यावी, बंदीच्या काळात बोटींचे कर्जहप्ते स्थगित करावेत, मच्छिमार व त्यांच्या कुटुंबियांना मोफत वैद्यकीय व शैक्षणिक सुविधा द्याव्यात, प्रत्येक मच्छिमाराला किमान पाच लाख रुपयांचा विमा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.


याशिवाय प्रत्येक तालुक्यात आधुनिक मच्छिमार बाजारपेठ उभारावी, खाडी व समुद्रातील प्रदूषण रोखावे, करंजा, मोरा, मांडवा, रेवस या स्थानिक बंदरांचा विकास करावा, तसेच उरणमधील ओएनजीसी तेलगळती, पेणमधील जेएसडब्ल्यू प्रकल्प आणि नागोठणे येथील रिलायन्स प्रकल्पामुळे बाधित मच्छिमारांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

मच्छिमारांच्या न्याय्य मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा संघटनेने दिला आहे. निवेदनावेळी अध्यक्ष संदीप पाटील, भूषण पाटील, सुरेश कोळी, काशीनाथ पाटील, गणेश गावंड, सुरेश गावंड, एच. यू. म्हात्रे, जयवंत तांडेल, एस. बी. माळी, अनुराग ठाकूर,संजय डांगर उपस्थित होते.

## सवतकडा,खारअंबोलीवर बंदीमुळे पर्यटक नाराज

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यात संततधार पावसामुळे तालुक्यातील धरणे -धबधबे ओरफ्लो होऊन वाहु लागले आहेत. त्यामधील पर्यटकांना आकर्षित करणारा अंबोली धरण व सवतकडा धबधबा ओरफ्लो झाल्याने या ठिकाणी पर्यटकांनी गर्दी पाहायला मिळालते. परंतु, शासनाने बंदी घातली असल्याने पर्यटक नाराज आहेत



मुरुडपासून ४ किमी अंतरावर असलेला सवतकडा धबधबा व मुरुड शहरापासून ५ किलोमिटर अंतरावर अंबोली धरण या धरणांमधून पंचक्रोशी भागासह मुरुड शहरातील नागरिकांना करिता पिण्याकरिता पाणी वापरले जाते. तो अंबोली धरण डोंगर, कपारी, कातळावर साठलेले पावसाचे पाणी एकत्र येऊन पुढे मोठा प्रवाह होतो. या प्रवाहात पोहण्यासाठी व आनंद घेण्यासाठी स्थानिक व पर्यटक येत असतात. हा प्रवाह जेव्हा खाली कोसळतो तेव्हा जणु पांढऱ्या शुभ्र दुधाचा घट कोसळतोय की काय असा भास होतो.

धबधब्याच्या वरच्या बाजूला अत्यंत संथ वाहणारे पाणी जेव्हा मोठ्या खडकावरुन खाली कोसळतो तेव्हा ते चित्र मनाच्या आतील कप्प्यात कायमस्वरूपी बंद करून ठेवण्या इतपत सुंदर आणि नेत्रदीपक आहे.

त्याबरोबर धरणाच्या आजुबाजुला गर्द वनराई त्यावर पसरलेल्या हिरव्या वेली, रंगबेरंगी फुले, त्यावर बागडणारी फुलपाखरे, पक्षाचा किलबिलाट, आणि अंगाला झोंबणारा गार वारा या सर्व निसर्ग सौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी हजेरी लावतात.

निसर्गाने मांडलेला एक मनमोहक डाव, पर्यटकांस भुरळ पाडणारे असे अंबोली धरण निसर्ग हे कोकणाला मिळालेले सर्वात मोठे वरदान आहे.

ईश्वराने या निसर्गाची रचना अत्यंत चांगल्या प्रकारे केली आहे. बंदी हा उपाय नसून नियोजन करणायची गरज आहे असे पर्यटकांमधुन बोलले जात आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २ ऑगस्ट ते ०८ ऑगस्ट २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### गैरसमजापासून दूर राहा

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता एकूण वातावरण चांगले राहिल्याने आपणास आनंद घेता येईल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास गैरसमजापासून दूर राहू शकाल. गोड बोलून आपला कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारणे योग्य राहील. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते कसोशीने पाळा. प्रकृती जपा. विशेषता खाण्या पिण्याबाबत काळजी घेणे गरजेचे आहे. नोकरदारांना दिलासा मिळेल. त्यामुळे यावेळी मनाप्रमाणे बदलीसाठी प्रयत्न करण्यास हरकत नाही. आपण कार्यक्षेत्राबाबत दुसऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वतः जातीने लक्ष घातल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. कामाचा उत्साह वाढला तरी आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नाहीतर होणारे काम बिघडण्याची शक्यता आहे. मित्रमंडळी व आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. प्रवासाचे योग संभवतात. **महिलांना :** खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आर्थिक बाजू ठीक राहील. जोडीदाराची साथ मिळेल. जोडीदाराकडून काहीतरी भेटवस्तू मिळण्याची संधी आहे. **शुभ दिनांक :** ०२, ०३.

### बुद्धिचातुर्याचा उपयोग करा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहात खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः मोसमी आजारापासून, उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष दिल्यास ते हितकारक ठरू शकेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. नोकरदारांना दिलासा मिळेल. **महिलांना :** बोलण्यावर मात्र, नियंत्रण ठेवा, म्हणजे गैरसमज होणार नाहीत. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. **शुभ दिनांक :** ०५,०६.

### व्यवहारात सावधगिरी बाळगा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहात आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. आपण प्रकृतीस्वास्थ्यासाठी तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. सरकारी नियम कटाक्षाने पाळावेत. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका. सरळ मार्ग अवलंबा. नोकरदारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. **शुभ दिनांक :** ०७,०८.

### साहसी कृत्ये टाळा

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीबाबत जागरूक राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व मोसमी आजारापासून सावध राहा. सरकारी नियमांचे पालन करा. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळा. मुलांकडे अधिक लक्ष द्या. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्ट दरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा. आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. **महिलांना :** वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक :** २,०५.

### कामात झोकून द्या

**सिंह :** राशीसाठी आपले या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. नको त्या प्रलोभनात अडकू नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. नोकरदारांना दिलासा मिळेल. व्यापाराला चालना मिळेल. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच्या कामात झोकून द्या. प्रकृतीबाबत अधिक जागरूक राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. **महिलांना :** महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. प्रकृती जपा. **शुभ दिनांक :** ०४,०६.

### प्रलोभनात अडकू नका

**कन्या :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. नोकरदारांना दिलासा मिळेल. व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील. प्रकृतीची काळजी घ्या, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आर्थिक बाजू ठीक राहील. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. या सप्ताहात आपण सर्वांशी सकारात्मक दृष्टीने वागल्यास आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकाल. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल. नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. **महिलांना :** हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल, विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या कला क्षेत्रात अधिक वाव मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा. **शुभ दिनांक :** ७, ८.

### बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**तुळ :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता या आठवड्यात आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा 'इगो' दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. सरकारी देणी त्वरित भरा. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारापासून सावध राहा. जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. राशिस्थानी मंगळाचे वास्तव्य असल्याने कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल, पण त्याचबरोबर आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. **महिलांना :** कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. **शुभ दिनांक :** ०२,०३.

### शुभकार्य होण्याची शक्यता

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाच्या सुरुवातीत स्थिती चढ उताराने भरलेली राहील म्हणूनच ताण न घेता तब्बेतीची काळजी घेणे गरजेचे आहे. प्रेम जीवनात कठीण प्रसंग येऊ शकतात परंतु, तुमचे प्रेम मजबूत असल्याने कितीही कठीण आव्हाने आली तरी तुम्ही दोघे चांगल्या प्रकारे परिस्थितीचा सामना करू शकाल. प्रेम विवाहाची इच्छा ठेवणाऱ्या लोकांना जास्त रिस्क घ्यावी लागेल आणि खूप प्रयत्न करावे लागतील. वैवाहिक जीवन हे आनंदी राहील आणि कुठलीही मोठी समस्या येणार नाही. सासरच्या पक्षाकडून कुठल्याही प्रकारचे वाद वाढू देऊ नका हेच तुमच्यासाठी उत्तम असेल. तुमची मुले बरीच प्रगती करतील ज्यामुळे तुमचे मन आनंदित राहील. कौटुंबिक जीवनात ऊन सावलीची स्थिती राहील तसेच, वडिलांच्या आरोग्य विषयक समस्या येऊ शकतात त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. तुमच्या घरामध्ये बदल होऊ शकतात. **महिलांना :** तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभकार्य होण्याची ही शक्यता आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल. **शुभ दिनांक :** ०४,०५.

### क्रोधाला बळी पडू नका

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात तुम्हाला काम आणि आराम यामध्ये संतुलन ठेवण्याची आवश्यकता असेल कारण, तुम्हाला शारीरिक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. प्रेम जीवनासाठी वर्ष अनुकूल राहील आणि तुमचे प्रेम जीवन उत्तम होईल. विवाहित व्यक्तींसाठी या साप्ताहाची सुरुवात अधिक चांगली नाही ते जोडीदाराच्या क्रोधाला बळी पडण्याची शक्यता आहे. मुलांसाठी हा काळ सामान्य राहील. त्यांचे स्वास्थ्य प्रभावित राहू शकते. आठवड्याचा पूर्वार्ध कौटुंबिक जीवनासाठी अनुकूल नाही आणि आई वडिलांचे आरोग्य ही प्रभावित राहील, परंतु उत्तरार्धात स्थिती बऱ्या पैकी अनुकूल होईल. विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा अनुकूल असेल आणि त्यांना परदेशातील यूनिवर्सिटीमध्ये ॲडमिशन मिळू शकते. तुमची आर्थिक स्थिती काही आव्हानात्मक राहील आणि तुम्हाला बरेच सांभाळून चालावे लागेल अन्यथा वित्तीय संकटाचा सामना करावा लागू शकतो. **महिलांना :** करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल. **शुभ दिनांक :**०६,०७.

### खर्चात वृद्धी होईल

**मकर :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान तुम्हाला आपल्या तब्बेतीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे आणि संतुलित दिनचर्येचे पालन केले पाहिजे. तुम्हाला पित्त संबंधित शारीरिक समस्या होण्याची शक्यता आहे. प्रेम जीवनात काही दीर्घकालीन बदल होऊ शकतात, ज्यामुळे तुम्ही एक आदर्शवादी प्रेमीच्या रूपात आपली ओळख बनवाल. या गोष्टीची तुम्हाला काळजी घावी लागेल की, आपली बदनामी होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. दाम्पत्य जीवनात ऊन सावली चालू राहील. थोड्या आव्हानां सोबत तुमचे दांपत्य जीवन पुढे चालेल. तुम्हाला तुमच्या जीवनसाथी सोबत खांद्याला खांदा लावून पुढे चालले पाहिजे. तसेच कौटुंबिक जीवनात ही अडथळे येऊ शकतात. आईचे स्वाथ्य प्रभावित राहू शकते. हे दिवस विद्यार्थ्यांसाठी कठीण मेहनत करण्याचे संकेत देत आहे. तुम्हाला तुमच्या धैयाला प्राप्त करण्यासाठी एकाग्र होऊन प्रयत्न करावे लागतील. **महिलांना :** वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल, तथापि आपल्या बचतीवर लक्ष द्या आणि धन संबंधित गुंतवणूक विचार पूर्वक करा. **शुभ दिनांक-** ०३,०७.

### विचारपूर्वक निर्णय घ्या

**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान तुम्हाला आरोग्याची प्राप्ती होईल आणि उत्तम स्वास्थ्याचा तुम्ही आनंद घ्याल. तुम्हाला या गोष्टीची काळजी घ्यायची आहे की, वेळेनुसार ध्यान आणि योग करत राहा. प्रेम जीवनात बदल येऊ शकतात आणि काही नाते संपण्याच्या मार्गावर ही येऊ शकतात. खूप विचार पूर्वक निर्णय घ्या कारण, बरेच निर्णय तुमच्या जीवनाचे कठीण निर्णय असतील. जर तुम्ही विवाहित आहेत तर दांपत्य जीवनात तणाव राहू शकतो. दांपत्य जीवनात होणारे गैरसमज दूर करा आणि एकमेकांसोबत सामान्य व्यवहार करा हेच तुमच्यासाठी लाभदायक असेल. संततीसाठी हा आठवडा बराच चांगला राहील. प्रत्येक कार्यात प्रगती करतील. त्यांच्या संस्कारात वृद्धी होईल आणि ते मोठ्यांचा सन्मान करतील. कौटुंबिक दृष्टीकोनाची गोष्ट केली तर, वेळ आव्हानात्मक राहील. **महिलांना :** जर तुम्हाला कुटुंब जोडून ठेवायचे असेल तर, तुम्हाला काही समझोता करावा लागेल. तुम्हाला तुमचे आर्थिक जीवन बदलण्याची आवश्यकता आहे. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. **शुभ दिनांक :**०२,०६.

### आरामदायी क्षणांचा आनंद घ्या

**मीन :** राशीसाठी आपले या सप्ताहातील ग्रहमाना प्रमाणे तुम्ही स्वास्थ्य बाबतीत बरेच भाग्यशाली असाल आणि उत्तम स्वास्थ्याचा आनंद घ्याल. फक्त तुम्हाला तुमची दिनचर्या नियमित ठेवावी लागेल. या साप्ताहात आपले प्रेम आयुष्य उत्तम असेल आणि तुम्ही तुमच्या जोडीदाराच्या प्रति अधिक निष्ठावान बनाल. तुमच्या प्रेमात स्थिरता येईल आणि प्रियतम सोबत आरामदायी क्षणांचा आनंद घ्याल. जर तुम्ही विवाहित आहेत तर वैवाहिक लोकांसाठी हा आठवडा संधींनी भरलेला राहू शकतो. तुमच्या जीवनसाथीला त्यांच्या कार्य क्षेत्रात काही मोठे यश प्राप्त होऊ शकते. काही वेळेसाठी एकमेकांपासून दूर राहावे लागू शकते परंतु याने तुमच्या नात्यामध्ये घनिष्टता येईल आणि संबंध मधुर होतील. संतानसाठी वेळ बरीच चांगली राहील. कौटुंबिक जीवनासाठी हा आठवडा बराचसा अनुकूल सिद्ध होईल. **महिलांना :** कुटुंबातील ताळमेळ एकमेकांच्या मदतीने पुढे जाईल ज्यामुळे तुमच्या परिवाराला सामाजिक रूपात सन्मान आणि संपन्नता प्राप्त होईल. संततीला प्रथित यश मिळेल. **शुभ दिनांक :** ०७,०८.

# स्मशानभूमीच नाही, दहन कुठे करायचे?

## ■ निवडून आल्यावर लोकप्रतिनिधींची पाठ ■ दगडांवर अंत्यसंस्कार करण्याची वेळ

| गौसखान पठाण |
| सुधागड-पाली |

देशाला स्वातंत्र्य मिळून तब्बल ७९ वर्षे झाली. तरी देखील सुधागड तालुक्यातील कोंडी धनगरवाडी-नागशेत हे गाव मात्र, आजही एका मूलभूत प्रश्नाशी झुंज देत आहे. येथे स्मशानभूमीच नसल्याने मृत व्यक्तींवर दगड रचून अंत्यसंस्कार करण्याची वेळ ग्रामस्थांवर येत आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात गावोगावी विकासाच्या घोषणा, आश्वासनांचा वर्षाव आणि जनतेच्या दारात येणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर मात्र, गावाचा रस्ता विसरतात, अशी संतप्त प्रतिक्रीया ग्रामस्थांमधून उमटत आहेत.



देश स्वतंत्र होऊन आज तब्बल ७९ वर्षे उलटली. तरी देखील काही ग्रामीण भागांत मूलभूत सुविधांची वानवा आहे. सुधागड तालुक्यातील कोंडी धनगरवाडी-नागशेत हे गाव मात्र आजही एका मूलभूत प्रश्नाशी झुंज देत आहे. येथे स्मशानभूमीच नसल्याने मृत व्यक्तींवर दगड रचून अंत्यसंस्कार करण्याची वेळ ग्रामस्थांवर येत आहे. त्यामुळे जिवंत माणसाला घर नसेल तर सरकार योजना दाखवते; परंतु, मेल्यानंतर दोन हात जागाही मिळू नये, यापेक्षा मोठी शोकांतिका कोणती? निवडणुकीच्या काळात गावोगावी विकासाच्या घोषणा, आश्वासनांचा वर्षाव आणि जनतेच्या दारात येणारे लोकप्रतिनिधी, निवडून आल्यानंतर मात्र, या गावाचा रस्ता विसरतात, अशी संतप्त भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. काम संपले की आश्वासनही संपते, अशी उपरोधिक प्रतिक्रिया देखील नागरिक देत आहेत.

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. संबंधित विभाग, ग्रामपंचायत आणि लोकप्रतिनिधींकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न आजतागायत प्रलंबित आहे. परिणामी मृत व्यक्तींच्या अंत्यविधीसाठी दगडांची रचना करून तात्पुरती व्यवस्था करावी लागते. हे दृश्य केवळ प्रशासनाच्या उदासीनतेचे नव्हे, तर विकासाच्या दाव्यांवरील प्रश्नचिन्ह आहे. आज देश अमृतकाळाच्या घोषणा करीत आहे; मात्र, सुधागडच्या या वाडीतील नागरिक विचारत आहेत, आमच्या गावात माणसाला सन्मानाने जगण्याचा आणि मरण्याचाही अधिकार कधी मिळणार? जनतेला आश्वासनांचे पेढे वाटणे सोपे असते; परंतु, प्रत्यक्ष काम करण्यासाठी इच्छाशक्ती लागते. आज कोंडी धनगरवाडी-नागशेतची परिस्थिती पाहिली तर ही ओळ अक्षरशः खरी वाटते. विकासाच्या भाषणांनी स्मशानभूमी उभी राहत नाही; त्यासाठी निर्णय, निधी आणि संवेदनशीलता लागते. दरम्यान, स्मशानभूमीचा प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.

# कारवाईनंतरही गुटखा विक्री सुरूच

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |



गुटखा आणि सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही पनवेल शहरासह तालुक्यात, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा परिसरात अनेक ठिकाणी गुटख्याची जास्त दराने खुलेआम विक्री सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. अन्न औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंडे विराजमान झाल्यापासून अनेक ठिकाणी सहजपणे उपलब्ध होत असलेला गुटखा काही ठिकाणी बंद झाला. पोलिसांकडून वेळोवेळी छापेमारी करून लाखो रुपयांचा गुटखा जप्त केला जात असला, तरी काही दिवसांतच पुन्हा विक्री सुरू होत असल्याने प्रशासनाच्या कारवाईच्या परिणाम कारकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र, कारवाई थंड झाल्यानंतर पुन्हा एकदा शहरातील काही पानटपऱ्या, किराणा दुकाने आणि इतर ठिकाणी गुटखा सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. विशेष म्हणजे भांगेच्या गोळ्या, इलेक्ट्रिक सिग-रेट आणि इतर अमली पदार्थ देखील टपऱ्यांवर सहज उपलब्ध होत असल्याचे समोर आले आहे. अल्पवयीन युवकांपर्यंतही या पदार्थांची सहज पोहोच होत असल्याची चिंता पालकांनी व्यक्त केली आहे.

अन्न, औषध प्रशासन आणि पोलीस यांनी याविरोधात वारंवार कारवाई करणे गरजेचे आहे, मात्र एखाद दुसरी कारवाई वगळता त्यांच्याकडून पुन्हा कारवाई केली जात नाही. गुटखा विक्री थांबत नसल्याने या अवैध व्यवसायामागील सूत्रधारांवर कठोर कारवाई कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# तळा तालुक्यातील शेतकऱ्यांना मत्स्यबीजांचे वितरण

| तळा | प्रतिनिधी |



कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कृषी संलग्न प्रात्यक्षिक कार्यक्रमाअंतर्गत तळा तालुक्यातील १५ शेतकऱ्यांना रोहु, कटला व सायप्रिन या जातींच्या मत्स्यबीजांचे वितरण करण्यात आले. प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्यास एक हंडी या प्रमाणे मत्स्यबीजांचे वाटप करण्यात आले.मत्स्यबीजांचे वितरण तळा तालुका पंचायत समितीचे सभापती नथुराम मुकण यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, मंडळ कृषी अधिकारी संजय घालमे, सहाय्यक कृषी अधिकारी संदीप साळुंखे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) सचिन लोखंडे तसेच तालुक्यातील लाभार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मत्स्यपालन हा शेतीला पूरक, कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने मत्स्यपालन करून शेततळे, सिंचन तलाव व इतर जलस्रोतांचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन मत्स्यपालन व्यवसायाचा विस्तार करण्याचेही आवाहन करण्यात आले होते.

मत्स्यपालनामुळे शेतीबरोबरच अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध होतो. कृषी व मत्स्यपालन यांचा समन्वय साधल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते तसेच ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात, असे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

# तहसिल कार्यालयाच्या आवारात खड्डे

**कोर्लई :** गेल्या अनेक दिवसांपासून मुरुडच्या तहसिल कार्यालयाच्या आवारात खड्ड्यांचे साम्राज्य असून याकडे संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबद्दल नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. तहसील कार्यालया लगतच सेतू, मंडळ अधिकारी, तलाठी, वनविभागाचे कार्यालय, न्यायालय, पोष्ट ऑफिस असल्याने मुरुडसह तालुक्यातील विविध ठिकाणांहून आपल्या कामांसाठी नागरिकांची येथे वर्दळ असते. शासनाच्या संबंधित खात्याने यात लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

# पतसंस्था ही एक महत्त्वाची व्यवस्था - ॲड.दिपक पटवर्धन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

ग्रामीण भागापासून शहरापर्यंत पतसंस्थांचे जाळे खेडोपाडी पसरले आहे. त्यामुळे सर्वसामान्य व गरजू नागरिकांना तातडीचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पतसंस्था करत आहेत. सहकारामध्ये पतसंस्था ही एक अत्यंत महत्त्वाची व्यवस्था असल्याचे मत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दिपक पटवर्धन यांनी केले.

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्यादित, अलिबाग, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला. अलिबागमधील जेएसएम महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आलेल्या या प्रशिक्षण वर्गामध्ये जिल्ह्यातील विविध सहकारी पतसंस्थांचे सुमारे ११० प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी सहभागी झाले होते. शुक्रवारी (दि.३१) या वर्गाचा समारोप झाला.

यावेळी ॲड. पटवर्धन म्हणाले की, पतसंस्थांच्या ठेवींना त्यांच्या वर्गवारीनुसार आवश्यक संरक्षण मिळावे यासाठी राज्य पतसंस्था फेडरेशनकडून आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील. नाममात्र सभासदांना सोनेतारण कर्जवाटप करण्याची तरतूद सहकार कायद्यात दुरुस्ती करण्यात आली असली, तरी या तरतुदीत अधिक व्यवहार्य सुधारणा होण्याची आवश्यकता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्य पतसंस्था फेडरेशनचा अध्यक्ष म्हणून कार्य करताना जिल्हा पतसंस्था महासंघांचे सक्रिय सहकार्य अपेक्षित असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी महासंघाचे सचिव योगेश मगर, पदाधिकारी संचालक गणेश म्हात्रे, अशोक प्रधान, प्रमोद पाटील, ॲड. के. एस. पाटील, ॲड. अच्युत पाटील, चंद्रशेखर जोशी, उषा चांदगावकर उपस्थित होते.

### महासंघ, पतसंस्था ठामपणे पाठीशी - ॲड. जे. टी पाटील

जिल्हा पतसंस्था महासंघाचे सहकार्य अपेक्षीत असल्याचे आवाहन फेडरेशनचे अध्यक्ष पटवर्धन यांनी केले. त्यावेळी रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील यांनी, रायगड जिल्हा पतसंस्था महासंघ आणि जिल्ह्यातील सर्व पतसंस्था आपल्या पाठीशी ठाम पणे उभ्या राहतील, अशी ग्वाही दिली. अध्यक्षीय भाषणात ॲड. जे. टी. पाटील यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत संचालक, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने ज्ञान अद्ययावत ठेवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

# बावीस वर्षीय तरुणीला मारहाण

**नवीन पनवेल :** २२ वर्षीय तरुणीला घरातील अतिरिक्त घरकाम लावून घराबाहेर पडण्यास अटकाव केला आणि मारहाण केली. तसेच एकाने अश्लील शिवीगाळ केला. या प्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील २२ वर्षीय तरुणी कोलकत्ता येथील असून ती गोरेगाव येथे राहते. आरोपी जाफर शेख यांनी शिवीगाळ केला होता.






# पनवेल डेपोसमोरील बसथांब्यावर वाहतूक कोंडी

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |



पनवेल एसटी डेपोसमोरील उड्डाणपुलाखाली असलेल्या नवी मुंबई महानगर परिवहन (एनएमएमटी) बसथांब्यावर दररोज सकाळी ९ ते दुपारी १२ आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवासी हैराण झाले आहेत. या बसथांब्यावरून वाशी, कल्याणसह विविध मार्गांवर प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी वर्दळ असते.

एसटी डेपोमध्ये ये-जा करणाऱ्या बस, रस्त्याच्या कडेला उभ्या राहणाऱ्या रिक्षा, दुचाकी व चारचाकी वाहनांमुळे वाहतुकीचा वेग मंदावतो. त्यातच लाईन आळीच्या दिशेने ये-जा करणाऱ्या वाहनांची सततची वर्दळ असल्याने बसथांब्यावर उभ्या असलेल्या प्रवाशांना रस्ता ओलांडताना जीव धोक्यात घालावा लागत आहे.

भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघाताची भीती व्यक्त केली जात असून, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि लहान मुलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल डेपोसमोरील बसथांब्यावर वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नेहा भोसले यांचा सुधागड दौरा



| पाली | प्रतिनिधी |

राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सुधागड तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी सुधागड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत महागावला भेट देऊन विकासकामांची पाहणी केली आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा आढावा घेतला.

याप्रसंगी नेहा भोसले यांच्यासोबत रायगड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, गटविकास अधिकारी लता मोहिते, सहाय्यक गटविकास अधिकारी महादेव शिंदे, विस्तार अधिकारी सुनील आहिरे उपस्थित होते. दौऱ्यादरम्यान भोसले यांनी गावातील महिला बचत गटांच्या व्यवसायांना भेट देऊन त्यांच्या कामाचा आढावा घेतला आणि त्यांना प्रोत्साहन दिले.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- शुभमुहुर्त विवाहमंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरु. ४६ शाखा, वेबसाईट, ॲप्लीकेशन नावनोंदणीसाठी - ९२२६७६६१२९.
- जन्मकुंडली-हस्तरेखा-टॅरोकार्ड-अंकशास्त्र यावरुन ज्योतिषविषयक मार्गदर्शन व उपाय श्री म्हात्रे- ९२२६७६६१२९
- अलिबागमधील एका नामांकित हॉस्पिटलमध्ये नर्स पाहिजे. (ANM, GNM) मो.८७८८७३१६०८
- कामासाठी मुलगा किंवा मुलगी पाहिजे. टॅली व संगणक ज्ञान आवश्यक मोबाईल नं. ९८५०२९५७५५/८७९६८५५५५५
- O' NEST Group of Hotels येथे हाउसकिपर, वेटर? रेस्टॉरन्ट मॅनेजर तसेच गार्डन व किचन कामासाठी १ जोडपे तातडीने हवे. ठिकाण अलिबाग/रत्नागिरी संपर्क- ९९७५५१६१२३.

we are hiring -kokan estate project-mango-folks (premium UHDP mango project) land surveyor-1, field supervisor (land development)-4, field supervisor (agriculture)-3, Security guards-6, Labour Contraction. Contact-9325437216. Location-mangaon-Raigad.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## निवडक



# म्हसळा-दिघी पोलीस चौकीजवळ खड्डे

**म्हसळा :** म्हसळा शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी रस्ते विकासाची कामे पूर्ण झाली असली, तरी शहराच्या प्रवेशद्वारावरील म्हसळा-दिघी नाका पोलीस चौकीजवळील रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. या ठिकाणी चार ते पाच मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. हा म्हसळा शहरातील सर्वाधिक वर्दळीचा असून येथे सतत वाहनांची ये-जा सुरू असते. याच मार्गावरून श्रीवर्धन, बोर्ली-दिघी तसेच परिसरातील अनेक गावांकडे जाणारी वाहतूक होत असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात हलकी व जड वाहने या रस्त्यावरून प्रवास करतात. मात्र, पोलीस चौकीलगत पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना वाहने सांभाळत मार्ग काढावा लागत असून अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. म्हसळा एस. टी. स्थानकापासून श्रीवर्धन व बोर्ली-दिघीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण व डांबरीकरण करण्यात आले आहे. या विकसित रस्त्याच्या सुरुवातीचा सुमारे ५० मीटरचा भाग अद्यापही दुरुस्तीपासून वंचित राहिल्याने तेथे मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. परिणामी वाहने जोरात आपटून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. तसेच भरधाव वाहनांमुळे खड्ड्यांतील साचलेले पाणी रस्त्याने जाणाऱ्या पादचाऱ्यांच्या अंगावर उडत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# चंपाबाई थळी यांचे निधन



**उरण :** सिडको, जेएनपीए बंदर आणि ओएनजीसी प्रकल्पग्रस्तांच्या न्याय हक्कासाठी उभारलेल्या गेलेल्या आंदोलनात लोकनेते दि.बा.पाटील, माजी मंत्री मिनाक्षीताई पाटील यांच्या मागे खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या नागाव गावातील लढवय्या महिला नेत्या चंपाबाई भास्कर थळी यांचे शुक्रवारी (दि.३१) निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. शेकापक्षाचे युवा नेते तथा कामगार नेते भारतराज थळी यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्यावर नागाव गावातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



# सुकेळी खिंडीत दरडींचा धोका

**कोलाड :** मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील सुकेळी खिंडीत संततधार पावसामुळे दरड कोसळण्याचा धोका वाढला असुन या महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून सुकेळी खिंडीतील दोन्ही बाजूला संरक्षण भिंत बांधण्यात यावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे. महामार्गावरील सुकेळी खिंड हे निर्जन ठिकाण असून महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे सुकेली खिंडीतील दोन्ही बाजूचे डोंगर कापले गेले आहेत. यामुळे येथील डोंगराची माती सैल झाली आहे. यामुळे पावसाळ्यात येथे दरड कोसळण्याचा मोठा धोका असतो. तर अतिवृष्टीच्या काळात सुकेली खिंडीत पाणी साचणे, दरड कोसळणे यामुळे अनेक तास वाहतूक कोंडी निर्माण होऊन वाहतूक ठप्प होण्याच्या घटना अनेक वेळा घडल्या आहेत. महामार्ग ६६ वरील एक प्रमुख व आव्हानात्मक ठिकाण असून या मार्गांवरून विविध प्रकारच्या वाहनाची सतत वर्दळ सुरु असते. या महामार्गाला असणारी वेडी वाकडी वळणे व चढ उतारामुळे कोणत्याही परिस्थितीचा अंदाज येत नाही अशा वेळी अचानक दरड कोसळली तर कोणाचा नाहक बळी जाऊ शकतो. त्यामुळे अशा घटना टाळण्यासाठी संरक्षण भिंत बांधण्यात यावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.

# विद्युत डिपी बदलण्याची मागणी

**आगरदांडा :** मुरूड शहरातील काही ठिकाणी खराब झालेल्या रस्तावरील विद्युत पुरवठा करणारी डिपी बदलव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी उपकार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मुरूड यांना निवेदन व्दारे मागणी करण्यात आले आहे. शहरातील परेश नाका व मच्छी मार्केट जवळील रस्तावर रोजच्या रोज नागरिकांची वर्दळ सुरू असते आणि याच ठिकाणच्या मच्छी मार्केट रस्तावरील विद्युत महामंडळाच्या विद्युत पुरवठा करणारी अंडरग्राऊंड डिपीची अवस्था अत्यंत वाईट आहे. तसेच परेश नाक्या जवळील विद्युत डिपीचा दरवाजा पडुन आहे. तरी या खराब झालेल्या विद्युत पुरवठा करणारी डिपीपासून नागरिकांच्या जीवाला धोका होऊ शकतो. तरी मुरूड विद्युत महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी करून लवकरात लवकर रस्त्यावरील विद्युत डिपी बदलव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष गायकर यांनी केली आहे.

# दुकानातील कपड्यांची चोरी

**पनवेल :** कामोठे येथील दुकानातील कपडे चोरून नेल्याप्रकरणी दोन अनोळखी महिलांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रोशन गामोट यांचे कामोठे सेक्टर ३४ या ठिकाणी क्युट लवली ब्युटीक सेंटरचे दुकान आहे. त्यांच्या स्टॉलवर लेडीज कपडे खरेदी करण्यासाठी दोन अनोळखी महिला आल्या होत्या. त्यातील एका महिलेने कपडे खरेदी करण्याचा बहाणा केला आणि कपडे दाखवण्यात गुंतवून दुसऱ्या महिलेने दहा हजार पाचशे रुपयांचे तीस टॉपने भरलेली पिशवी चोरून नेली.

## चौकी केवळ तीन लोखंडी खांबांच्या आधार | खाडीच्या पाण्यामुळे जमिनीची मोठी धूप

# बागमांडला-वेश्वी पोलीस चौकीची दुरावस्था

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

बागमांडला ते वेश्वी दरम्यान, चालणाऱ्या फेरी बोट सेवेच्या जेटीवर उभारलेली पोलीस चौकी सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेली ही चौकी कोणत्याही क्षणी खाडीत कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. चौकीच्या खाली असलेला विटांचा भराव पूर्णपणे कोसळल्याने, चौकी केवळ तीन लोखंडी खांबांच्या आधारावर उभी आहे.



बागमांडला ते वेश्वी हा भाग कोकणातील एक महत्त्वाचा जलमार्ग आहे. येथून दररोज हजारो प्रवासी आणि शेकडो वाहने फेरी बोटीने प्रवास करतात. या प्रवाशांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी शासनाने काही दिवसांपूर्वी येथे एक कंटेनर पध्दतीची पोलीस चौकी उभारली होती. सुरुवातीला ही चौकी सुस्थितीत होती. मात्र, खाडीच्या पाण्याचा मारा सतत होत असल्याने चौकी खालील जमिनीची मोठी धूप झाली आहे. कंटेनर चौकी खालील विटांचा आणि रेचग्याचा भराव पूर्णपणे वाहून गेल्याने चौकीचा एक भाग आता अधांतरी आहे.

या पोलीस चौकीची तातडीने दुरुस्ती करणे किंवा सुरक्षित ठिकाणी हलवणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी उभारलेली ही चौकी पोलीसांना जीवघेणी ठरू नये, यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि श्रीवर्धन पोलिसांनी या गंभीर विषयाकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड कडे जेटीच्या देखभालीची जबाबदारी असते, तर पोलीस चौकीच्या देखभालीची जबाबदारी श्रीवर्धन पोलीस किंवा रायगड पोलीस प्रशासनाची असते. या दोन्ही विभागांपैकी नक्की कोणाच्या अखत्यारीत हे येते आणि कोण चौकीची दखल घेणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

# क्रिकेटचा अष्टपैलू सम्राट

क्रिकेटच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ अष्टपैलू खेळाडू कोण, या प्रश्नावर जाणकारांचे पहिले उत्तर गॅरी सोबर्स हेच असते. त्यांच्या कामगिरीची तुलना केवळ आकडेवारीने होत नाही, तर त्यांच्या प्रभावाने, शैलीने आणि क्रिकेटला दिलेल्या नव्या उंचीने होते. आजही जगातील 'सर्वोत्तम अष्टपैलू' क्रिकेटवीर शोधला जातो, तेव्हा स्पर्धा केवळ दुसऱ्या क्रमांकासाठी असते; कारण पहिल्या क्रमांकावर सोबर्स यांचे नाव कोरलेले राहील.



**महेश जोशी**

क्रिकेटच्या इतिहासात अनेक महान फलंदाज, गोलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू होऊन गेले. प्रत्येक युगात एखाद्या खेळाडूने आपल्या कौशल्याने क्रिकेटला नवी दिशा दिली; परंतु एक असा खेळाडू झाला, ज्याने क्रिकेटमधील प्रत्येक कौशल्यावर जणू आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. फलंदाजी, वेगवान गोलंदाजी, स्पिन, क्षेत्ररक्षण, नेतृत्व आणि सामन्याचा प्रवाह बदलण्याची विलक्षण क्षमता या सर्वांचा संगम म्हणजे सर गारफिल्ड सेंट ऑब्रन सोबर्स, जगभरात ज्यांना सर गॅरी सोबर्स म्हणून ओळखले जाते. २८ जुलै १९३६ रोजी वेस्ट इंडिजमधील बार्बाडोस येथे गॅरी सोबर्स यांचा जन्म झाला. आर्थिकदृष्ट्या साधारण कुटुंबात वाढलेल्या या मुलाच्या हातात लहानपणीच बॅट आणि चेंडू आले. परिसरातील मैदानांवर क्रिकेट खेळताना त्यांच्यातील नैसर्गिक प्रतिभा सर्वांच्या नजरेत भरली. अवघ्या १७ व्या वर्षी त्यांनी वेस्ट इंडिज संघाकडून कसोटी पदार्पण केले. विशेष म्हणजे सुरुवातीला त्यांची ओळख डावखुऱ्या स्पिन गोलंदाजाची होती.

पुढे त्यांनी फलंदाजीमध्ये एवढी प्रगती केली की जगातील सर्वोत्तम फलंदाजांमध्ये त्यांची गणना होऊ लागली. त्याचबरोबर त्यांनी मध्यमगती गोलंदाजी आणि मनगटी स्पिन गोलंदाजीही तितक्याच प्रभावीपणे केली. एका खेळाडूकडे इतकी विविध कौशल्ये असणे हा त्या काळात जवळपास चमत्कारच होता. १९५८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध किंग्स्टन येथे गॅरी सोबर्स यांनी नाबाद ३६५ धावांचा विक्रम केला. त्यावेळी हा कसोटी क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा जागतिक विक्रम होता. या डावात केवळ धावांचा पाऊस नव्हता, तर संयम, तंत्र, आक्रमकता आणि मानसिक ताकदीचा उत्कृष्ट मिलाफ होता. विशेष म्हणजे हा त्यांचा पहिलाच कसोटी शतकाचा डाव होता आणि तो थेट जागतिक विक्रम ठरला.

हा विक्रम जवळपास ३६ वर्षे अबाधित राहिला. नंतर ब्रायन लाराने तो मोडला; पण सोबर्स यांच्या ३६५ धावांनी क्रिकेटला एका नव्या युगाची सुरुवात करून दिली. आज अष्टपैलू खेळाडू म्हटले, की बेन स्टोक्स, जॅक कॅलिस, कपिल देव, इमरान खान, इयान बॉथम किंवा रिचर्ड हॅडली यांची नावे घेतली जातात; पण या सर्वांच्या आधी अष्टपैलुत्वाचा खरा अर्थ गॅरी सोबर्स यांनीच जगाला दाखवून दिला. ते डावखुरे फलंदाज होते. गोलंदाजीमध्ये ते डावखुरी जलद-मध्यमगती, डावखुरी पारंपरिक स्पिन आणि मनगटी 'चायनामन' स्पिन अशा तीन वेगवेगळ्या शैलींमध्ये गोलंदाजी करू शकत. सामन्याच्या परिस्थितीनुसार ते गोलंदाजीची शैली बदलत. एका डावात वेगवान गोलंदाजी, तर दुसऱ्या सत्रात स्पिन अशी त्यांची क्षमता प्रतिस्पर्ध्यांसाठी मोठे आव्हान ठरत असे. आजच्या क्रिकेटमध्ये असा खेळाडू जवळजवळ अशक्य वाटतो. गॅरी सोबर्स यांच्या फलंदाजीचे वर्णन अनेक क्रिकेट समीक्षकांनी 'कवितेसारखी' असे केले आहे. फलंदाजीत तंत्र होते; पण ते तंत्राच्या बंधनात अडकलेले नव्हते. त्यांच्या प्रत्येक फटक्यात आत्मविश्वास दिसत असे. ऑफ ड्राइव्ह, कव्हर ड्राइव्ह, पुल, हुक, स्ट्रेट ड्राइव्ह किंवा स्पिनविरुद्ध पुढे येऊन खेळलेले फटके, प्रत्येक शॉट सहजतेने खेळला जाई. त्यांच्या खेळातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे परिस्थितीनुसार स्वतःला बदलण्याची क्षमता. संघाला बचावाची गरज असेल तर ते तासन्तास विकेटवर उभे राहत. जलद धावांची आवश्यकता असेल तर ते गोलंदाजांवर तुटून पडत. गॅरी सोबर्स यांनी कसोटी क्रिकेटमध्ये २३५ विकेट घेतल्या. आजच्या निकषानुसार हा आकडा मोठा वाटणार नाही; पण त्या काळात ते संघातील मुख्य फलंदाज होते. त्याच वेळी गरज पडल्यास ते प्रमुख गोलंदाजाची भूमिकाही निभावत. नवीन चेंडूने स्विंग, जुन्या चेंडूने स्पिन आणि शेवटच्या टप्प्यात मनगटी फिरकी अशा तिन्ही भूमिका ते समर्थपणे बजावत. त्यांनी अनेक सामने फलंदाजीबरोबर गोलंदाजीनेही जिंकून दिले. सोबर्स हे केवळ फलंदाज आणि गोलंदाज नव्हते, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षकही होते. त्यांनी स्लिपमध्ये घेतलेले अप्रतिम झेल आजही क्रिकेटच्या इतिहासात आदर्श मानले जातात. त्यांनी कसोटी क्रिकेटमध्ये १०९ झेल घेतले. त्यांच्या हातात चेंडू गेला, की फलंदाज बाद झालाच, अशीच भावना प्रतिस्पर्ध्यांच्या मनात असे. १९६८ मध्ये इंग्लंडमधील प्रथम श्रेणी सामन्यात गॅरी सोबर्स यांनी माल्कम नॅश यांच्या एका षटकातील सहाही चेंडूंवर सहा षटकार ठोकले. आज टी-२० क्रिकेटमध्ये अशा घटना घडतात; पण त्या काळात ही गोष्ट अविश्वसनीय मानली जात होती. सोबर्स यांनी त्या दिवशी क्रिकेटच्या कल्पनाशक्तीची मर्यादाच बदलून टाकली. नंतर रवी शास्त्री, हर्शल गिब्स, युवराज सिंग आणि किरोन पोलार्ड यांनीही हा पराक्रम केला; पण अशा कामगिरीचा इतिहासातील पहिला मान सोबर्स यांच्याकडेच राहिला. फ्रँक वॉरेल यांच्या नेतृत्वानंतर वेस्ट इंडिज क्रिकेटला नवा चेहरा देण्याचे काम गॅरी सोबर्स यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडिज संघाने जगभरात प्रभावी कामगिरी केली. त्यांच्या नेतृत्वशैलीत आक्रमकता होती; पण ती बेफिकीर नव्हती.

प्रतिस्पर्ध्यावर मानसिक दबाव निर्माण करण्याची कला सोबर्स यांना अवगत होती. त्यांनी वेस्ट इंडिज क्रिकेटमध्ये आत्मविश्वासाची नवी संस्कृती निर्माण केली. त्यांच्या कसोटी कारकिर्दीतील आकडे आजही प्रभावी आहेत. त्यांनी ९३ कसोटी सामने खेळले, ८,०३२ धावा केल्या, ५७.७८ ची सरासरी राखली, २६ शतके आणि ३० अर्धशतके झळकावली, २३५ विकेट घेतल्या आणि १०९ झेल टिपले. आजच्या काळात एवढी सरासरी राखणारा फलंदाज स्वतंत्रपणे महान मानला जातो. २३५ विकेट घेणारा गोलंदाजही उल्लेखनीय ठरतो; पण या दोन्ही गोष्टी एकाच खेळाडूने करणे हीच त्यांची खरी महानता आहे. आजच्या आधुनिक क्रिकेटमध्ये खेळाडू विशिष्ट प्रकारात तज्ज्ञ बनतात. फलंदाज फलंदाजच राहतो, गोलंदाज गोलंदाजच राहतो; परंतु सोबर्स यांनी क्रिकेट ही केवळ भूमिका नसून सर्वांगीण कौशल्याची कला आहे, हे दाखवून दिले. कपिल देव, इमरान खान, इयान बॉथम, जॅक कॅलिस, जॅक्स कॅलिस, बेन स्टोक्स यांसारख्या महान अष्टपैलूंनी अनेकदा सोबर्स यांच्या प्रभावाचा उल्लेख केला आहे. क्रिकेटमध्ये अष्टपैलुत्वाची जी व्याख्या आज स्वीकारली जाते, तिचा पाया सोबर्स यांच्या कारकिर्दीने घातला. जगभरात प्रसिद्धी मिळूनही सोबर्स यांनी साधेपणा कधी सोडला नाही. क्रिकेटच्या प्रत्येक पिढीतील खेळाडूंना ते मार्गदर्शन करत राहिले. विविध देशांमधील क्रिकेट मंडळांनी त्यांचा सन्मान केला. त्यांना 'सर' हा किताब बहाल करण्यात आला; पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अहंकाराचा लवलेशही नव्हता.

गॅरी सोबर्स हे नाव आजही क्रिकेटच्या चर्चांमध्ये आदराने उद्धृत केले जातात. क्रिकेटच्या इतिहासात अनेक विक्रम मोडले गेले, अनेक महान खेळाडू आले आणि गेले; परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांची तुलना कोणाशीच करता येत नाही. सोबर्स हे त्यापैकी एक. त्यांनी केवळ सामने जिंकले नाहीत, तर क्रिकेटला नवे सौंदर्य दिले. त्यांनी अष्टपैलुत्वाला प्रतिष्ठा मिळवून दिली. जगाला दाखवून दिले, की एकाच खेळाडूकडे अमर्याद कौशल्य असू शकते आणि ते संघाच्या प्रत्येक गरजेला न्याय देऊ शकते. आज टी-२०च्या झगमगाटात क्रिकेटचा वेग बदलला असला, तरी संपूर्ण खेळावर अधिराज्य गाजवणाऱ्या खेळाडूचा आदर्श शोधायचा झाला, तर तो सोबर्स यांच्या रूपानेच दिसतो. म्हणूनच क्रिकेटच्या इतिहासात त्यांचे स्थान केवळ महान खेळाडू म्हणून नाही, तर 'क्रिकेटचा सर्वकालीन अष्टपैलू सम्राट' म्हणून कायम अढळ राहील. सोबर्स हे केवळ वेस्ट इंडीजचे नव्हते, तर संपूर्ण जगाचे होते. त्यांनी क्रिकेटला श्रीमंत केले. त्यांच्या निवृत्तीनंतर अनेक महान अष्टपैलू खेळाडू आले. त्यात कपिल देव, इम्रान खान, सर रिचर्ड हॅडली, जॅक कॅलिस आणि बेन स्टोक्स यांचा समावेश होता. या सर्वांनी आपापल्या काळात अफाट कामगिरी केली, यात शंका नाही; परंतु 'सर्वोत्तम अष्टपैलू' शोधला जातो, तेव्हा स्पर्धा केवळ दुसऱ्या क्रमांकासाठी असते; कारण पहिल्या क्रमांकावर सोबर्स यांचे नाव विश्वाच्या अंतापर्यंत कोरलेले राहील. ●

# स्वस्त झालेलं मरण आणि हरवत चाललेलं आयुष्य!



**धनंजय शेटये**

हल्ली प्रत्येक सकाळ वर्तमानपत्राच्या पानांवर किंवा मोबाईलच्या पडद्यावर एखाद्या काळजाचा ठोका चुकवणाऱ्या दुःखद बातमीनेच उगवते. कुठे रस्त्यावरील भीषण अपघात, कुठे कौटुंबिक कलहाची धग, कुठे मानापमानाच्या जखमा, तर कुठे नैराश्याच्या अंधारात हरवलेले कोवळे जीव... गेल्या काही दिवसांत सिंधुदुर्गातील कुडाळ, वेंगुर्ले आणि सावंतवाडी परिसरात घडलेल्या तरुणांच्या मृत्यूच्या घटना मन सुन्न करून टाकणाऱ्या आहेत. आयुष्याची स्वप्ने डोळ्यांत साठवलेली, भविष्याची असंख्य रंगीत चित्रे मनात रेखाटलेली ही कोवळी फुले उमलण्याआधीच नियतीने निर्दयीपणे खुडून नेली. अशा प्रत्येक घटनेनंतर मनात एकच प्रश्न ठाण मांडून बसतो. खरोखरच आज मरण इतकं स्वस्त झालं आहे का?

पूर्वी मृत्यू ही दुर्मिळ घटना वाटायची; आज तो रोजच्या बातम्यांमधील एक आकडा बनत चालला आहे. रस्त्यावरून बाहेर पडताना आपण कितीही नियम पाळणारे, संयमी आणि दक्ष चालक असलो, तरी समोरून येणाऱ्या एखाद्याच्या क्षणिक बेफिकिरीची किंमत आपल्याला आयुष्यभरासाठी मोजावी लागू शकते. एका क्षणाचा निष्काळजीपणा एका संपूर्ण कुटुंबाचा संसार उद्ध्वस्त करून जातो. अपघातात फक्त एक व्यक्ती मरत नाही, तर त्याच्यासोबत अनेक स्वप्ने, अनेक आशा आणि अनेक नातीही कायमची मरण पावतात.

तंत्रज्ञानाने जगाला एका क्लिकवर आणले, पण दुर्दैवाने माणसामाणसांतील मनांचे अंतर मात्र वाढवले. पूर्वी घरात हसण्याचे, गप्पांचे आणि एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचे वातावरण असायचे. आज त्याच घरात प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे; पण एकमेकांसाठी वेळ नाही. संवाद हरवला, नजरा दूर गेल्या आणि मनांमध्ये संशयाची भिंत उभी राहिली. मोबाईल हा संवादाचे साधन राहिला नाही; तो अनेकदा अविश्वासाचा, गैरसमजांचा आणि नात्यांमधील दुराव्याचा स्रोत बनला आहे. ज्या घरात प्रेमाची ऊब असायला हवी, तिथे आज शांततेच्या नावाखाली भावनिक दुष्काळ पडताना दिसतो.

समाजाची नैतिक मूल्येही दिवसेंदिवस ढासळत आहेत. कमी कष्टात अधिक पैसा, झटपट यश आणि दिखाऊ श्रीमंतीच्या हव्यासाने अनेकांना चुकीच्या मार्गावर ढकलले आहे. प्रामाणिकपणा, सचोटी आणि माणुसकी यांसारखी मूल्ये मागे पडत चालली आहेत. स्वार्थाच्या अंध स्पर्धेत नाती, भावना आणि विश्वास यांचे मोल कमी होत आहे. गुन्हेगारीचे स्वरूपही बदलत आहे. कपट, फसवणूक, षडयंत्र आणि विश्वासघात यांचे प्रमाण वाढत असून, स्त्री असो वा पुरुष अनैतिकतेच्या वाटेवर चालताना लिंगभेद उरलेला नाही. ही वस्तुस्थिती समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत चिंताजनक आहे.

याहून अधिक वेदनादायी बाब म्हणजे संकट आले की संघर्ष करण्याऐवजी आयुष्यच संपवण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. प्रेमभंग, आर्थिक अडचणी, अपयश, कौटुंबिक तणाव किंवा मानसिक नैराश्य यामुळे काही तरुण क्षणिक आवेशात स्वतःच्या आयुष्याचा शेवट करण्याचा निर्णय घेतात. परंतु कोणतीही अडचण ही आयुष्यापेक्षा मोठी नसते. आत्महत्या ही समस्येचे उत्तर नसते; ती तर समस्यांपासून केलेली कायमची पळवाट असते. त्या एका निर्णयामुळे मागे राहणाऱ्या आई-वडिलांच्या आयुष्यात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण होते. आयुष्यभर सोबत राहण्याची शपथ घेतलेल्या जोडीदाराचे जग उद्ध्वस्त होते. निष्पाप लेकरांच्या डोळ्यांतून वडिलांचे किंवा आईचे अस्तित्व कायमचे हरवते. अश्रूंनी भिजलेल्या त्या घरातील प्रत्येक भिंत आयुष्यभर एकच प्रश्न विचारत राहते.

''आमच्यासाठी थोडंसं जगता आलं नसतं का?''

आई-वडील हे आपल्या आयुष्याचे पहिले देव असतात. आपल्या लेकरांच्या सुखासाठी ते स्वतःची स्वप्ने, इच्छा, आराम आणि संपूर्ण आयुष्य आनंदाने अर्पण करतात. मुलांच्या शिक्षणासाठी, भविष्यासाठी आणि सुखासाठी ते आयुष्यभर कष्टाची पराकाष्ठा करतात. पण आजच्या भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या पिढीला त्यांच्या त्यागाचे मोल समजेनासे झाले आहे. अनेकांना आई-वडिलांचे कष्ट हे केवळ त्यांचे 'कर्तव्य' वाटते; पण प्रेमाला कर्तव्याच्या तराजूत तोलता येत नाही. त्यांच्या ऋणाची परतफेड कधीच पूर्ण होऊ शकत नाही. ज्यांनी आपल्याला चालायला शिकवले, त्यांच्यासाठी दोन पावले चालण्यातच खरी माणुसकी आहे.

सहज मिळणाऱ्या गोष्टींची किंमत माणसाला अनेकदा कळत नाही. आईच्या हातचा घास, वडिलांच्या कष्टाने उभे राहिलेले घर, कुटुंबाचा आधार, नात्यांमधील विश्वास आणि प्रेमाची सावली हे सर्व आपल्याला सहज लाभले म्हणून त्यांचे मोल कमी होत नाही. उलट, हेच जीवनातील सर्वात मोठे वैभव असते. पैसा पुन्हा मिळवता येतो, संपत्ती पुन्हा उभी करता येते; पण तुटलेली नाती, हरवलेला विश्वास आणि निसटलेला जीव कधीच परत मिळत नाही.

मानवी जीवन हे परमेश्वराने दिलेले सर्वात दुर्मिळ आणि अनमोल वरदान आहे. प्रत्येक संकट तात्पुरते असते; पण जीवन कायमचे असते. म्हणून प्रसारमाध्यमांच्या चकाकीत, सोशल मीडियाच्या आभासी दुनियेत आणि क्षणिक मोहांच्या आहारी जाऊन आपल्या आयुष्याची, नात्यांची आणि कुटुंबाच्या सुखाची राखरांगोळी करू नका. संवाद जपा, विश्वास जपा, प्रेम जपा. संकटांशी खंबीरपणे दोन हात करा, एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून उभे रहा आणि दुःख वाटून घेण्याची संवेदनशीलता जिवंत ठेवा. कारण आयुष्य सुंदर बनवणारी गोष्ट संपत्ती नसते; ती असते माणसामाणसांतील माया, विश्वास आणि जिव्हाळा.

आज गरज आहे ती रस्त्यांवर वेग कमी करण्याची, मनातला अहंकार कमी करण्याची, नात्यांमधील दुरावा कमी करण्याची आणि संवाद वाढवण्याची. पैसा, प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी यापेक्षा माणूस मोठा आहे, हे पुन्हा एकदा समाजाने लक्षात ठेवण्याची वेळ आली आहे. कारण जीवन जगण्यासाठी मिळते, संपवण्यासाठी नाही. आपल्या माणसांसाठी, आपल्या स्वप्नांसाठी आणि आपल्या जन्मदात्यांच्या डोळ्यांतील आनंदासाठी प्रत्येक दिवस नव्या आशेने जगूया. जिवंत राहण्यातच खरा विजय आहे, आणि माणुसकी जपण्यातच जीवनाचे खरे सार दडलेले आहे. ●

# सूर्यकन्या सावित्री


**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

सूर्यकन्या सावित्री, ही विनीता तेलंग यांची कादंबरी, बीज पब्लिकेशन्सने प्रकाशित केली आहे. सुरुवातीला 'प्रकाशकीय'मध्ये धनश्री बेडेकर यांनी कादंबरी प्रकाशित करण्यामागील आपली भूमिका मांडली आहे. विवेक घळसासी यांनी ''आशीर्वाद'' या शीर्षकान्वये कादंबरीचे स्वागत केले आहे. महाभारतातील वनपर्वात आलेल्या एका आख्यानाचे, वटसावित्री या व्रताचे आजही व्रताचरण होते आहे. सत्यवान-सावित्रीची कथा सर्वांनाच थोडीफार माहीत असते. महायोगी अरविंद यांना सावित्री आख्यानाचे आकर्षण वाटले. त्यांनी इंग्रजीत ''सावित्री'' हे महाकाव्य लिहिले. या कथेतून त्यांनी आध्यात्मिक जीवनाची वाटचाल मांडली. परंपरा आणि मूळ आध्यात्मिक गाभा सांभाळून, प्रवाही आणि लालित्यपूर्ण भाषेत हे पुस्तक वाचकांसमोर येते. विनिता यांना नैनितालच्या अरविंद आश्रमाच्या नयनरम्य परिसरात अरविंद यांचे चरित्र ऐकायला मिळाले आणि त्यावेळी सावित्रीविषयीची उत्सुकता जागी झाली. श्रीअरविंद यांचा दृष्टिकोन आणि त्यातील उच्च आध्यात्मिक आशयाच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्रपणे ही कथा मांडली आहे, असे लेखिकेचे म्हणणे आहे.

श्रीअरविंद आणि माताजी यांच्या उत्क्रांत मानवत्वाच्या दिशेने आपली पावले पडत राहोत, अशी अपेक्षा शेवटी लेखिकेने 'मनोगत'मध्ये व्यक्त केली आहे. दहा प्रकरणांतून ही कादंबरी वाचकांसमोर उलगडते. मुखपृष्ठ आणि आतील रेखाटने सखाराम उमरीकर यांची आहेत. कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखा आपले निवेदन करीत आहेत, अशी शैली स्वीकारली आहे.

पहिल्या प्रकरणात कालवृक्षाचे निवेदन वाचावयास मिळते. मद्रदेशाचा राजा अश्वपती याला प्रदीर्घ तपश्चर्येनंतर प्राप्त झालेली दिव्यकन्या सावित्री. ती उपवर झाली तरी तिच्या योग्य वर मिळत नसल्याने मग राजाने तिलाच आपला सहचर निवडण्याकरता प्रवासाला पाठवले. सावित्री एकटी राज्याबाहेरच्या प्रदेशात फिरली आणि तिला अखेर तिच्या जीवाचा जोडीदार सापडला. शाल्व देशाचा राजकुमार असलेला सत्यवान तिला वनात भेटला. त्याचा पिता द्युमत्सेन याला अचानक आलेल्या अंधत्वामुळे, राज्य गमवावे लागले होते. त्यामुळे तो सपरिवार वनात राहत होता. सावित्रीने सत्यवानाला वरले आणि ते सांगायला ती पित्याकडे आली. तिथे उपस्थित असलेल्या नारदमुनींनी सत्यवानाला केवळ एक वर्षाचेच आयुष्य असल्याचे भविष्य सांगितले. त्यामुळे माता मालवीने सावित्रीला या विवाहापासून परावृत्त करायचा खूप प्रयत्न केला. पण सावित्री तिच्या निर्धारावर ठाम होती. तिच्या मातापित्याने तिचा विवाह सत्यवानाशी करून दिला. सावित्री सत्यवानासह आश्रमात राहू लागली.

सावित्री तिला ठाऊक असलेले भयंकर सत्य मनात दडवून, ती सत्यवानाच्या आयुष्यात आनंद फुलवत होती आणि एकीकडे स्वतःला त्या भयानक सत्याला सामोरे जाण्याकरता तयार करत होती. अखेरचे तीन दिवस निर्जळ, निराहार असे अखंड जागृत राहण्याचे त्रिरात्र व्रत तिने घेतले. हिमप्रदेश आणि मरुभूमीच्यामध्ये असणाऱ्या केकय देशाला लागून असलेला मद्रदेश. हिमवंत पर्वत, निबिड अरण्ये, विपुल निसर्गसंपदा आणि अद्भूत अशी शांतता यांचा हा प्रदेश. उत्तम, सुलक्षणी, महाशक्तिमान अशा अश्वांचा प्रदेश. उच्च दर्जाच्या अश्वांची पैदास तेथे होत होती. मद्रदेश हा अश्वांसाठी सुविख्यात होता. विलक्षण सामर्थ्यवान अश्वदळामुळे अश्वपतीचे राज्य स्थिर, समृद्ध झाले, विस्तारलेही. अनेक उपाय करूनही त्याला संतानप्राप्ती नव्हती. संतानप्राप्तीसाठी व्रते, यज्ञ करावेत हे त्याच्या तर्कनिष्ठ बुद्धीला पटत नसे. कालवृक्षाखाली राजा चिंतन करत असे. चिंतनातून मानव जातीला शाश्वत आनंदाचा मार्ग दाखवता यायला हवा, याची जाणीव त्याला झाली. त्यासाठी त्याने सूर्यदेवाची आराधना करण्याचे ठरवले. राजाने संपूर्ण ब्रह्मचर्य स्वीकारले, कठोर नियम घालून घेतले. अठरा वर्षांच्या तपश्चर्येनंतर त्याला जगन्मामातेचे दर्शन झाले. मानव जातीचा उद्धार करेल, असा पुत्र त्याने मागितला. तुझ्या भाग्यात पुत्र प्राप्तीचा योग नाही, असे




त्याला समजते . मग राजाने कन्येची मागणी केली. समस्त मानव वंशाला पुढे नेण्यासाठी राजा परमेश्वर अवतार मागतो. ''माझ्या कुळात जन्म घेऊन मला धन्य कर आणि समस्त मानव जातीला तिच्या प्रगतीचे नवे दार उघडून दे,'' अशी विनवणी राजा करतो. यशस्वी अनुष्ठानामुळे मालवीच्या उदरात गर्भ वाढू लागला आणि सावित्रीचा जन्म झाला. राजाराणीने तिला केवळ कन्या म्हणून वाढवले नाही, पुत्राला दिले असते, ते सर्व संस्कार दिले आणि प्रशिक्षणही!

दुसऱ्या प्रकरणात, मालवी, सावित्रीच्या जन्मापूर्वीची आपली कहाणी सांगते आहे. राजाच्या कठोर तपश्चर्येमुळे दोघांनाही व्रतस्थ जीवन स्वीकारावे लागले होते. राजाच्या कठोर साधनेच्या अखेरी, त्याला जो दृष्टांत झाला, त्याच्याशी अनुरूप तिला स्वप्ने पडली. आनंदपर्व सुरू झाले. गायत्री मंत्राच्या साधनेचे फळ म्हणजे साक्षात सूर्यदेवांचा आशीर्वाद. म्हणून सावित्री हे नाव ठेवले गेले. राजाने सांगितले होते, ''राणी ही सूर्यकन्या आहे. याचे विस्मरण होऊ नये. तिला मुक्तपणे वाढू दे'' सावित्रीची प्रगती अचंबित करणारी होती. यथावकाश सावित्रीने विद्या संपादन केली. राणीला तिच्या विवाहाची काळजी वाटू लावली. सुसज्ज एकाश्व सुवर्णरथ घेऊन सावित्री, एकटीच भविष्याचा वेध घ्यायला निघाली. नंतरच्या प्रकरणात कालवृक्ष, वरसंशोधनाला गेलेल्या सावित्रीच्या मनाचा शोध घेतो. 'दिव्य मानव' हे सावित्रीचे स्वप्न होते. आताच्या मानवी वंशालाच अधिक उन्नत करून, त्याचे दिव्य मानवात रूपांतर करणे शक्य आहे. या जगाला सुंदर आणि शाश्वत करण्याचे तेच एक साधन आहे, असे तिला वाटत होते. तिने विविध राज्यांतील राजपुत्र आणि अभ्यासपूर्ण केलेल्या युवकांची भेट घेतली. पण तिला सुयोग्य सहचर सापडत नव्हता. जंगलातील भटकंतीत तिची आणि सत्यवानाची भेट होते. त्यावेळचे त्यांचे, भवतालचे वर्णन कालवृक्षाने सुंदर प्रकारे मांडले आहे. सत्यवानाच्या बोलण्यातून तो शाल्व देशाच्या न्यायप्रिय, प्रजावत्सल राजा द्युमत्सेनाचा पुत्र असल्याचे समजते. दैवाने अकस्मात दृष्टी हिरावल्याने, हितशत्रूंनी त्यांचे राज्य बळकावल्याने, लहानपणीच सत्यवान आई-वडिलांसह जंगलामध्ये राहिला होता आणि जंगलातच रमला होता. परस्परांना जाणून घेतल्यानंतर ते गांधर्व विवाह करतात. नंतर लगेच सावित्री घरी परतते. ती आपल्या आई-वडिलांना आपल्या निवडीबद्दल सांगते आणि ते संतुष्ट होतात. त्याचवेळी तेथे नारद मुनी प्रकटतात. ते भविष्य सांगतात. सत्यवान हा योग्य वर असला, तरी त्याला एक वर्षानंतर मृत्यू येणार आहे. हे ऐकून सावित्रीचे आई-वडील तिला तिच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. परंतु सावित्री आपल्या निर्णयावर ठाम असल्याने, अश्वसेन तिचे सत्यवानाशी लग्न लावून देतात. सावित्री काषाय वस्त्र परिधान करून मातापित्यांचा निरोप घेते. ज्योतिष्मती, सावित्रीची सखी, तिच्याबरोबर थांबते. ज्योतिष्मतीच्या निवेदनातून सत्यवान, सावित्रीच्या, नव्या संसारातील दैनंदिन जीवनाची कल्पना येते. सावित्रीच्या मातेने सावित्रीच्या विवाहानंतरच्या, त्या भविष्यवाणीची ज्योतिष्मतीला कल्पना दिली आहे. त्या प्रसंगाची जबाबदारी सावित्रीच्या आई-वडिलांनी तिच्यावर सोपविली. सत्यवानाच्या आई-वडिलांना, सत्यवानाने पुन्हा राज्य प्राप्त करावे, असे वाटत असते. सावित्री ते आव्हान स्वीकारते. कारण सत्यवान वनामध्येच रमला आहे. सत्यवानाच्या निवेदनातून त्याच्या पित्याची, त्यांच्या मित्रानेच घोर फसवणूक केली होती, या धक्क्यामुळे त्यांची दृष्टी केली होती. त्यांना सहकुटुंब राज्य, राजगृह सोडून वनात राहावे लागले होते. विवाहानंतर सावित्रीचा त्याच्यावरील विलक्षण वाढता प्रभाव जाणवतो. नंतर सावित्री त्याला अश्वारोहणही शिकवते. विवाहाला वर्ष होत असताना, तीन दिवस, तीन रात्री काहीही ग्रहण न करता, एका जागी उभे राहण्याचे कठोर व्रत सावित्री करते. या काळात,जास्तीत जास्त वेळ सावित्रीच्या जवळ राहायचे तो ठरवतो. कालवृक्षाच्या निवेदनातून सावित्री आणि यमराज यांच्या सविस्तर संवादाची माहिती वाचकाला समजते. यमराज ऐकत नाही हे पाहून, सावित्री आपले जगन्मातेचे रूप प्रकट करते. यम हात जोडून नतमस्तक होतो. परिणामी सत्यवान सावित्रीमुळे जिवंत राहतो. सावित्रीची सखी, ज्योतिष्मती हे सारे महानाट्य, काही अंतरावरून पाहते. यासंबंधीचे तिचे सविस्तर निवेदन महत्त्वपूर्ण आहे. शेवटी सत्यवान आणि कालवृक्षाच्या निवेदनातून सत्यवान, सावित्री यांनी पुन्हा शाल्व प्रदेश आणि आसपासच्या प्रदेशात चार दशकांपर्यंत राज्य केल्याचे समजते. पृथ्वी मातेला भोग्य वस्तू नव्हे, तर पूज्य मानून निसर्गाशी तादात्म्य पावून विकास करणारे तंत्र सत्यवानाने मानव समाजाला दिले. या दोघांच्या दिशादर्शनाखाली विकसित आणि दिव्यमानव जीवन आकाराला आले. तो सारा परिसर देवभूमी गणला गेला. पुस्तकाचे शेवटी संदर्भसूची आणि लेखिकेचा सचित्र परिचय दिला आहे.

सूर्यकन्या सावित्री, या कादंबरीतील लेखिकेची भाषा संस्कृतप्रचुर, काव्यमय आहे. सावित्री आणि सत्यवान यांची, पूर्वपरिचित कथा, काहीशी वेगळ्या प्रकारे, वाचकाच्या डोळ्यासमोर उलगडते. महाभारत हे एक महाकाव्य आहे . त्यामधील विविध मिथके विचारी माणसाला निश्चितच जाणवतात. साहित्यिकाला साहित्य निर्मितीत नेहमीच स्वातंत्र्य असते. त्यामुळे त्यामधील सर्व भाग जसाच्या तसा स्वीकारणे, आजच्या काळात सर्वांना शक्य होईलच असे नाही. या कादंबरीमधील सर्व गोष्टी सर्वांनाच, पूर्णपणे मान्य होतील असेही नाही. मानवाच्या उत्क्रांतीतून, 'वैश्विक ऐक्य' साध्य होईल, असे श्रीअरविंद यांना वाटत होते, ते वास्तवात यावे, हीच अपेक्षा ! ●

**पुस्तकाचे नाव : सूर्यकन्या सावित्री**
**लेखिका : विनीता तेलंग**
**प्रकाशक : बीज पब्लिकेशन्स, पुणे-३८**
**तिसरी आवृत्ती : २५ जानेवारी २०२६**
**संपर्क : ८३०८८४१२७१**
**पृष्ठे : ११२ मूल्य : रु.२००/**

# देवभूमी हिमाचल



सफर
वर्षा कुवळेकर
८७६६५६९१३६



चंदिगढ मधील एका छानशा हॉटेल मध्ये दाखल झालो. गेला आठवडाभर निरनिराळ्या होम स्टे मधे तिथले मदतनीस पटापट सामान उचलून धावत जिने, पायऱ्या चढून आमच्या रूम्स मध्ये सुखरूप पोहोचवत. इथे गेटवरच्या दारवानाने सॅल्यूट मारून हाऊस सर्व्हिसला ट्रॉली घेऊन बोलावले. सर्विस तीच पण जमीन अस्मानाचा फरक. मुळात दिवसा १५ डिग्री तापमानातून आम्ही ४० डिग्री मध्ये आलो होतो. शरीर अजून स्वीकाराच्या मोड वर आले नव्हते. आता हे असे बदल आम्हाला नॉर्मल लाईफशी जोडत होते. सुंदर खोल्या ताब्यात घेतल्या. मस्त ताणून देऊ असे आधी ठरवले होते. पण अर्धा ग्रुप विस्कळीत झाल्यावर आत कुठेतरी उदासी पोहोचली होती. पाची जणी एका रूममध्ये थोडावेळ बसलो. चहा घेतला. आमच्या टॅक्सी ड्रायव्हरचा फोन आलाच. तो येऊन हजर झाला होता. आता झोप येणार नाही हे उमगून चला बाहेरच पडू असा निर्णय घेतला.

तासाभराने टॅक्सीमध्ये बसून पुढील प्रोग्राम ठरवायला लागलो तेव्हा दुर्दैवाने लक्षात आले की पूर्वसूचना देऊनही आज आम्हाला जो ड्रायव्हर मिळाला होता तो लुधियानाहून सहा महिन्यापूर्वीच चंदिगढ मध्ये राहायला आलेला होता. आम्हाला जितके चंदिगढ माहिती होते त्यापेक्षा किंचितच जास्ती त्याला माहिती होते. मुख्य चंदिगढ पाहण्याच्या प्रोग्रामवर बोळा फिरला होता.

''आम्हाला छान पंजाबी दही भल्ले, गोल गप्पे आणि एकूणच छान चाट कुठे मिळेल तिथे घेऊन चल.'' या पहिल्या ऑर्डरवरच तो गडबडला. हे फारच आश्चर्यजनक होते. कोणाला तरी फोन करून अत्यंत साधारण ठिकाणी तो आम्हाला घेऊन गेला. जिथे चाटचे फक्त एक दुकान होते बाकी भलतीच दुकाने होती. तिथे आलेल्या ग्राहकांशी बोलून आम्हीच पर्याय शोधले.

आता कुठे जाऊया या प्रश्नावर तो ब्लँक होता. एकतर त्या उन्हात आम्हाला सुचेनासे झाले होते. तो त्याच्या मालकालाच बहुधा, ''अब कहां ले जाऊ इनको?'' विचारत होता.

रॉक गार्डन, तालाब आणि मॉल इथे त्याचा काउंट संपत होता. भर उन्हात तलावावर किंवा रॉक गार्डन वर जाणे केवळ अशक्य होते.

''शॉपिंग एरिया मध्ये चल मग'' या सोप्या ऑप्शन वरही तो जेव्हा प्रश्नार्थक चेहरा करून बघू लागला तेव्हा आमची सहनशक्ती संपुष्टात येऊ लागली. हिमाचलमध्ये एका हॉटेलमध्ये आलेल्या पंजाबी मुलीशी गप्पा मारताना दूरदृष्टीने आम्ही शॉपिंग टिप्स घेऊन ठेवल्या होत्या आणि नोंद करून ठेवली होती.

''सेक्टर १७ मे चलो''

आमची खात्रीशीर आज्ञा.

परत त्याने फोनवर विचारून तिकडे नेले. तो बंद वार निघाला. आम्हीच चौकशी आरंभली आणि नेमक्या ठिकाणी त्याला घेऊन गेलो. एकदा आमच्या मध्ये गेल्यावर पुढील ३ तास आम्ही मनापासून रमलो. इथेही कुरिअर सर्व्हिस देणारे भेटल्यावर तर विचारायची काही सोयच उरली नाही.

परत गाडीत बसल्यावर मग रॉक गार्डन, तलाव पाहिले. उन्ह तेव्हाही कडक असल्याने तिथून फक्त हजेरी लावून आलो. गाडीतील एसी सोडावा वाटत नव्हते. इथली असेम्ब्ली, मंत्रीगण कुठे राहतात, अजून काय दाखवशील.... कशालाच त्याच्याकडे उत्तर नसल्याने, ''तू आम्हाला चंदिगढच्या वेगवेगळ्या रस्त्यावरून फिरव. तुला माहिती आहे ते शहर आम्हाला दाखव.'' असे त्याला सांगून शांत बसलो.

चंदिगढ जाणीवपूर्वक पाहण्यासाठी आम्ही आजचा दिवस राखून ठेवला होता, किंबहुना त्यासाठी केवळ आज आम्ही मुक्काम केला होता. ते तर राहिलेच, मग आता पैसे मोजले आहेतच तर असे बघू शहर असा निर्णय घेतला.

बराच वेळ असे फिरत राहिलो. चंदिगढ ही अगदी उत्तम प्लॅनिंग पूर्वक बसवलेली पंजाबची राजधानी आहे. रस्ते, त्याभोवती वृक्ष, उत्तम वास्तू, कुठेही गर्दी, घाण नाही हे पाहत होतो. खूप छान शहर आहे हे. माहितगार ड्रायव्हर असता तर फार बरे झाले असते.

तसेच अनमानधपक्याने फिरताना अचानक आम्ही रामकृष्ण मिशन समोर आलो. मी आणि शर्मिला ठाकूर...... रामकृष्ण परमहंसांच्या भक्त आहोत. आग्रहाने तिथे उतरलो. पंधरा मिनिटे तिथे बसलो, अपार शांतता मिळाली. ठाकूरांनी ठरवलेच होते आम्हाला दर्शन देण्याचे.

पुन्हा गाडीत बसलो परंतु या निरुद्देश फिरण्याला कंटाळून हॉटेलवरच पोहोचव आम्हाला म्हटलं. हॉटेल छान होते. संध्याकाळी छान ऐकत डिनर घेतले आणि झोपेच्या स्वाधीन झालो. सकाळी १२.३० ची होती. नंतर एअरपोर्ट गाठला.

देताना गडबड झाली थोडी. माझी केबिन बॅग अडवली. अरेच्या, हे काय अचानक? ऑफिसर जवळ गेल्यावर शांतपणे त्याने सांगितले, ''पत्थर निकालो.''

दोन सेकंद काही समजलेच नाही. मग आठवले की नारकंडाला शोधून शोधून मिळवलेले माझे दगड चुकून या बॅगेत ठेवले गेले. दिले काढून. नशीब दोनच होते. एक मोठ्या बॅगेत गेला होता. खूप विनंती केली मी, ''हिमालयाची आठवण म्हणून नेते आहे. द्या ना.'' नाही म्हणायची तसदी सुद्धा न घेता नुसती मान नकारार्थी हलवून त्यांनी पळवले मला. आता त्या छोट्या दगडांनी कोणाचे डोके फोडणार होते मी? असो.

परतीच्या प्रवासाला लागलो. मुंबई एअरपोर्टवर आमचा अलिबागचा टॅक्सी वाला हजर होता. अखंड गप्पा मारत परत आलो. एकेकीला सोडत रात्री घरी आलो. पुणेकर आमच्या थोडेच आधी पोहोचले होते. फोनवर संपर्क होताच. नऊ दिवसांचा अखंड प्रवास, तोही दऱ्या डोंगरातून केलेला. त्यात कठीण ट्रेक पार पाडलेले. आमच्या वयाच्या मानाने आम्ही खूपच अवघड ट्रिप पूर्ण करून आलो होतो. एक एअरपोर्टवरील आठवण मस्तच आहे. चंदिगढ एअरपोर्टवर आमच्या गेट समोर बसलो होतो. शेजारी एक ग्रुप आला. मराठीत बोलत होते. साहजिकच , ''मराठी ना? कुठले तुम्ही?''

'अरेच्या तुम्ही पण मराठीच का? आम्ही धुळ्याचे.'

''आम्ही अलिबागचे''.

प्रश्नोत्तरे सुरू झाली. शिमला कुलू मनाली वगैरे ट्रिप करून ते परतत होते. वयोगट १२ ते ४०.

आम्ही असे असे ट्रेक करून आलो म्हटल्यावर कुटुंब प्रमुखाने विचारले, ''काकी रागावणार नसाल तर वय विचारू का?''

''आम्ही दोघी अडुसष्ट, बाकीच्या अशाच आगेमागे''. माझे उत्तर.

त्यावर आपल्या बायकोला म्हणाला , ''बघ, तुम्ही रडताय दमलो म्हणून. यांच्याकडे बघा. काकी तुम्हाला मनापासून नमस्कार करावासा वाटतोय.''

सांगायचे एव्हढेच की आम्ही अगदी फ्रेश होतो. कसा कोणास ठाऊक घरी परतलो तरी थकवा जाणवला नाही. आमचा मूड या सर्वांवर मात करून गेला की श्वासातून गेलेला तो शुद्ध प्राणवायू आम्हाला शक्ती देऊन गेला माहिती नाही. किन्नौर कैलास आणि श्रीखंड कैलास आमच्यावर अशीच कृपा ठेवून असू देत हीच प्रार्थना करून ही लेखमाला इथेच थांबवते.

● समाप्त

# कुमार सप्तर्षींची वादळवाट...

डॉ. नीलम गोऱ्हे

**डॉ. कुमार सप्तर्षी यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी एका पिढीला निर्भयपणे विचार मांडण्याची हिंमत दिली. महाराष्ट्रातील अनेक पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींवर युवक क्रांती दलाच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. डॉ. कुमार सप्तर्षी यांचे संपूर्ण आयुष्य ही एक वादळवाट होती. त्या वाटेवर संघर्ष होते, आंदोलन होते, वैचारिक लढे होते, यश-अपयश होते.**

कुमार सप्तर्षी यांच्या निधनानंतर आज आठवणींचा एक मोठा पट डोळ्यासमोर उभा राहिला. त्यांची युवक क्रांती दल ही केवळ एक सामाजिक संघटना नव्हती. ती विचारांची, संघर्षाची आणि परिवर्तनाची चळवळ होती. १९७४ नंतर ते १९८३ या काळात माझा डॉ. कुमार सप्तर्षी यांच्याशी कमी-अधिक प्रमाणात परिचय झाला; मात्र काही वर्षे मला युवक क्रांती दलात सक्रियपणे काम करण्याची संधी मिळाली. त्या काळात आंदोलनांमधील त्यांचा धाडसी स्वभाव, प्रश्नांच्या मूळापर्यंत जाऊन शोध घेण्याची वृत्ती आणि त्या प्रश्नांशी दोन हात करण्याची तयारी मला जवळून अनुभवता आली. डॉ. कुमार सप्तर्षी यांची अनेक भाषणे ऐकण्याचा योग आला. नाशिकमधील कार्यक्रम, मुंबईतील युवक क्रांती दलाच्या गच्चीवरील बैठका, डॉ. अरुण लिमये यांच्यासह झालेल्या चर्चा या सर्वांमधून त्यांच्या विचारांचा आणि युवक क्रांती दलाच्या भूमिकेचा परिचय अधिक सखोल होत गेला. मात्र माझ्यावर सर्वाधिक प्रभाव पडला तो १९७५ मध्ये औरंगाबाद (आताचे छत्रपती संभाजीनगर) येथे झालेल्या युवक क्रांती दलाच्या शिबिराचा. त्या शिबिरात मला जाणवले की, कुमार सप्तर्षी हे एक व्यक्तिमत्त्व नव्हते, तर ते अनेक कार्यकर्त्यांना घडवणारी एक शाळाच होते. त्यांच्या आजूबाजूला वीस-पंचवीस जणांची सक्षम कार्यकर्त्यांची फळी होती. पुढे याच कार्यकर्त्यांपैकी अनेकजण महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात महत्त्वाच्या स्थानावर पोहोचले. काही आजही विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत, तर काही दुर्दैवाने आपल्यात नाहीत.

युवक क्रांती दलाची एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती होती. वैयक्तिक निर्णयांवर संघटनेने बंधने घातली नाहीत, तरी महत्त्वाच्या निर्णयांपूर्वी मुक्तपणे चर्चा करण्याची संस्कृती होती. त्याचाच अनुभव मला आणि आनंद करंदीकर यांना आला. आम्हा दोघांपैकी कोणी तरी पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करावे का, कुठे करावे आणि ही जबाबदारी प्रथम कोणी घ्यावी, याबाबत आम्ही डॉ. कुमार सप्तर्षी यांचा सल्ला घेण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी त्यांनी अत्यंत वस्तुनिष्ठ विश्लेषण केले. माझे वैद्यकीय शिक्षण आणि काम लक्षात घेता मी कोणत्याही शहरात वा खेड्यात कार्य करू शकते, तर आनंद यांच्या नोकरीच्या मर्यादा वेगळ्या होत्या. त्याचबरोबर मराठवाड्यात युवक क्रांती दलाचे काम अधिक विस्तारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी आम्हाला सांगितले की, कार्यकर्त्याने केवळ भावनेने नव्हे, तर समाजहित, परिस्थिती आणि संघटनेच्या गरजा लक्षात घेऊन निर्णय घ्यावा. दोन-तीन वर्षांनी स्वतःच्या कामाचे मूल्यमापन करावे, कार्यकर्ते तयार झाले की नवीन प्रदेशात काम सुरू करावे, अशी त्यांची भूमिका होती. त्यांच्या या मार्गदर्शनातून आम्ही उदगीर येथे काम सुरू करण्याचा निर्णय घेतला. आणीबाणीचा काळ ही युवक क्रांती दलासाठी मोठी कसोटी होती. त्या काळात डॉ. कुमार सप्तर्षी तुरुंगात होते. मात्र जवळपास वीस महिन्यांच्या त्या काळात राशीन (जि. अहिल्यानगर) परिसरातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवणे, त्यांना मदत करणे, आर्थिक सहाय्य उभे करणे आणि संघटनात्मक बळ टिकवून ठेवणे ही अनेक कामे आम्ही केली. या काळात अनेक नव्या कार्यकर्त्यांची जडणघडण झाली.

आणीबाणीनंतर युवक क्रांती दलासमोर एक मोठा प्रश्न उभा राहिला. संघटनेने थेट राजकीय भूमिका घ्यावी का, हा विषय अनेक चर्चांचा केंद्रबिंदू होता.



कार्यकर्त्यांमध्ये मतभेद होते. पुढे काळाच्या ओघात अनेक कार्यकर्ते वेगवेगळ्या राजकीय पक्षांमध्ये गेले ही देखील वस्तुस्थिती आहे. परंतु डॉ. कुमार सप्तर्षी यांनी स्वतःच्या लोकप्रियतेच्या आणि लोकांमधील विश्वासाच्या बळावर आमदार म्हणून निवडून येण्याइतकी लोकमान्यता मिळवली. मात्र त्याच काळात युवक क्रांती दलाच्या मोठ्या आंदोलनांची ताकद हळूहळू कमी होत गेली. देशातील राजकीय परिस्थिती बदलत होती. अनेक विचारवंत आणि नेत्यांनी विविध भूमिका स्वीकारल्या. राष्ट्रीय स्तरावर द्विध्रुवीकरण झाले. बिहार, उत्तर प्रदेश येथे समाजवादी पक्षाने भाजपासोबत जाण्याचा निर्णय घेतला. पण कुमार यांनीही आपल्या वैचारिक भूमिकेशी प्रामाणिक राहत लेखन, व्याख्याने आणि सामाजिक हस्तक्षेप सुरू ठेवला. 'सत्याग्रही विचारधारा'सारख्या माध्यमांमधून त्यांचे समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने चालू राहिले. माझ्या राजकीय प्रवासात पुढे आमचा प्रत्यक्ष संपर्क कमी झाला. याचे कारण वैयक्तिक दुरावा नव्हता, परंतु आम्ही वेगवेगळ्या राजकीय प्रवाहांत काम करू लागलो होतो. मी शिवसेनेच्या माध्यमातून काम करत असताना पक्षशिस्त आणि जबाबदाऱ्यांना प्राधान्य देणे आवश्यक होते. त्यामुळे युवक क्रांती दलाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे शक्य झाले नाही. मात्र विचारांचा सन्मान आणि व्यक्तीबद्दलचा आदर कधीही कमी झाला नाही.

डॉ. कुमार सप्तर्षी यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी एका पिढीला निर्भयपणे विचार मांडण्याची हिंमत दिली. महाराष्ट्रातील अनेक पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तींवर युवक क्रांती दलाच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. म्हणूनच आमच्या स्त्री आधार केंद्र आणि क्रांतिकारी महिला संघटनेच्या कामातही जातीविहीन, वर्गविहीन आणि स्त्री-पुरुष समतेच्या समाजाची त्यांची संकल्पना प्रेरणादायी ठरली. त्या विचारातून अनेक संवेदनशील आणि जाणीवसंपन्न कार्यकर्ते घडले. आम्ही समतेसाठी निरंतर कृती हेच घोषवाक्य स्विकारले आहे. डॉ. कुमार सप्तर्षी यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बदलत्या काळातही युवक क्रांती दलाला नव्याने उभारी देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी मला एका कार्यक्रमासाठी निमंत्रण दिले होते. मी त्या वेळी गेले, शुभेच्छा दिल्या, मनोगतही मांडले. परंतु पुनश्च युक्रांदिय म्हणून सक्रिय होणे शक्य नव्हते. 'युक्रांद'कडून गरिबांना घरे न देता फसवणुकीच्या विरोधात एका बाहुबलीविरोधात आंदोलन झाले होते. त्यात मी शेवटपर्यंत प्रशास-नाला रोखून होते. २०१४ ते २०१९ या कालावधीत त्यासाठी मला शिवसेनेच्या नेत्यांनी पुर्ण सहकार्य दिले होते. आज त्यांच्या स्मृती जागवत असताना एक वाक्य पुन्हा पुन्हा आठवते, 'अन्यायाच्या काळातील शांतता ही बंडाची सुरुवात असते.' हे वाक्य आमच्या पिढीला संघर्षाची दिशा देणारे ठरले. विधायक काम, रचनात्मक कार्य आणि आवश्यक तेथे संघर्ष यांचा समतोल कसा साधायचा, हे आम्ही त्यांच्याकडून शिकलो. डॉ. कुमार सप्तर्षी यांचे संपूर्ण आयुष्य ही एक वादळवाट होती. त्या वाटेवर संघर्ष होते, आंदोलन होते, वैचारिक लढे होते, यश-अपयश होते. या कार्यात पत्नी ऊर्मिला, मुलगा कबीर, भाऊ बहिण प्रविण, अनिल, मंगल बडवे, कुमार यांचे आईबाबा यांना बसलेली झळ मी समजू शकते. परिस्थिती समजून घेण्याबद्दल मला ऊर्मिलाच्या माहेरच्या नातेवाईकांचेही कौतुक वाटते. काही बदल समाजाने स्वीकारले, काहींना विरोध झाला; पण समतेचा, सामाजिक न्यायाचा आणि परिवर्तनाचा ध्यास कुमार सप्तर्षी यांनी आयुष्यभर सोडला नाही. आज ते आपल्यात नसले तरी त्यांनी घडवलेले कार्यकर्ते, त्यांनी रुजवलेले विचार आणि त्यांनी दिलेली संघर्षाची प्रेरणा समाजात कायम जिवंत राहील. जातीविहीन, वर्गविहीन आणि स्त्री-पुरुष समतेवर आधारित समाजव्यवस्थेचे त्यांचे स्वप्न पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहील. डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या स्मृतींना मी भावपूर्ण अभिवादन करते. ●

# सवयींच्या मुशीतून घडते विद्यार्थी व्यक्तिमत्त्व

सुनील गवळी




विद्यार्थ्यांचे शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील धडे शिकवणे नव्हे. शिक्षणाचा खरा अर्थ विद्यार्थ्याच्या विचारांना दिशा देणे, वर्तनाला शिस्त लावणे आणि जीवनाला योग्य आकार देणे हा आहे. या प्रक्रियेत ज्ञानाइतकीच, किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाची भूमिका असते ती सवयींची. कारण एखादी कृती वारंवार केली की ती सवय बनते, सवयींची पुनरावृत्ती स्वभाव घडवते आणि स्वभावातून व्यक्तिमत्त्वाची निर्मिती होते.

म्हणूनच विद्यार्थी दळणघडणीचा विचार करताना आपण केवळ ''विद्यार्थ्याला काय शिकवायचे?'' असा प्रश्न न विचारता, ''विद्यार्थ्यामध्ये कोणत्या सवयी रुजवायच्या?'' हा प्रश्न विचारणे अधिक आवश्यक आहे.आजचा विद्यार्थी ज्ञानाच्या प्रचंड विश्वात जगत आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, विविध प्रकारचे मनोरंजन आणि सतत बदलणारे वातावरण यामुळे त्याचे लक्ष अनेक दिशांनी खेचले जाते. अशा परिस्थितीत स्वअनुशासन, वेळेचे नियोजन, नियमित अभ्यास, वाचन, एकाग्रता, स्वच्छता, संयम, सकारात्मक विचार आणि आत्मपरीक्षण या सवयी त्याच्या व्यक्तिमत्त्वाला स्थैर्य देतात.विद्यार्थ्यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची सवय म्हणजे वेळेचे भान. वेळ ही अशी संपत्ती आहे की ती एकदा निघून गेल्यावर कोणत्याही किंमतीत परत मिळत नाही. त्यामुळे दिवसाचे नियोजन करणे, अभ्यासासाठी निश्चित वेळ देणे, खेळ, विश्रांती आणि मनोरंजन यांचा समतोल राखणे विद्यार्थ्याने शिकले पाहिजे. ''उद्यापासून करतो'' ही सवय टाळून ''आजचे काम आजच'' करण्याची वृत्ती निर्माण झाली, तर त्याचा परिणाम केवळ अभ्यासावर नव्हे तर संपूर्ण जीवनावर होतो.त्याचप्रमाणे नियमित अभ्यासाची सवय विद्यार्थ्याच्या यशाचा पाया आहे. परीक्षेच्या काही दिवस आधी तासन्तास अभ्यास करण्यापेक्षा दररोज थोडा-थोडा अभ्यास करणे अधिक परिणामकारक असते. मात्र अभ्यास म्हणजे केवळ पाठांतर नव्हे. शिकलेल्या गोष्टी समजून घेणे, प्रश्न विचारणे, त्यावर विचार करणे, चर्चा करणे आणि त्या ज्ञानाचा जीवनाशी संबंध जोडणे ही खरी अध्ययनाची सवय आहे. याचबरोबर वाचनाची सवय विद्यार्थ्याच्या विचारविश्वाला व्यापक करते. पाठ्यपुस्तक विद्यार्थ्याला अभ्यासक्रमाचे ज्ञान देते; परंतु अवांतर पुस्तके, चरित्रे, कथा, विज्ञानविषयक साहित्य, वर्तमानपत्रे आणि उत्तम लेख त्याला जग समजून घेण्याची दृष्टी देतात. दररोज काही पाने वाचण्याची सवय लावणारा विद्यार्थी हळूहळू स्वतःचे स्वतंत्र विचारविश्व निर्माण करतो.

विद्यार्थ्याने प्रश्न विचारण्याची सवयदेखील लावून घेतली पाहिजे. ''हे असे का?'' हा प्रश्न ज्ञानाच्या दाराची पहिली किल्ली आहे. प्रश्न विचारणारा विद्यार्थी जिज्ञासू राहतो आणि जिज्ञासा हीच ज्ञाननिर्मितीची सुरुवात असते. म्हणून वर्गात प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्याला थांबवण्याऐवजी त्याच्या प्रश्नाचे स्वागत करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठी ऐकण्याची सवय तितकीच महत्त्वाची आहे. आज प्रत्येकाला बोलायचे आहे; पण दुसऱ्याचे शांतपणे ऐकण्याची तयारी कमी होत चालली आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे अनुभव, मित्रांचे विचार आणि इतरांचे मत समजून घेण्यासाठी चांगले श्रोता होणे आवश्यक आहे. ऐकण्याची सवय विद्यार्थ्यामध्ये संयम, संवेदनशीलता आणि संवादकौशल्य निर्माण करते. स्वच्छता आणि नीटनेटकेपणा या सवयीही विद्यार्थ्यांच्या दळणघडणीत दुर्लक्षित करता येणार नाहीत. स्वतःची स्वच्छता राखणे, शाळेचा गणवेश व्यवस्थित ठेवणे, पुस्तके आणि दप्तर नीट ठेवणे, वर्ग स्वच्छ ठेवणे आणि सार्वजनिक ठिकाणांची काळजी घेणे यातून विद्यार्थ्यामध्ये जबाबदारीची भावना निर्माण होते. बाह्य शिस्त हळूहळू अंतर्मनातील शिस्तीचे रूप धारण करते.

आजच्या डिजिटल युगात मोबाईलचा विवेकी वापर ही विद्यार्थ्यांसाठी अत्यावश्यक सवय झाली आहे. मोबाईल हे ज्ञानाचे साधन होऊ शकते; पण त्याचा अतिरेक एकाग्रता, वेळ आणि सर्जनशीलता कमी करू शकतो. म्हणून विद्यार्थ्याला मोबाईलपासून पूर्णपणे दूर ठेवण्यापेक्षा त्याचा योग्य आणि मर्यादित वापर करण्याचे स्वनियंत्रण शिकवणे अधिक आवश्यक आहे. विद्यार्थ्याच्या मानसिक विकासासाठी सकारात्मक विचारांची सवय निर्माण करणे गरजेचे आहे. अपयश आले की ''मी काहीच करू शकत नाही'' असे म्हणण्याऐवजी ''माझ्याकडून चूक झाली, पण पुढच्या वेळी मी अधिक चांगले करेन'' असा विचार करणे शिकले पाहिजे. अपयशाला शेवट न मानता ते शिकण्याची संधी मानणारा विद्यार्थी जीवनातील अडचणींना अधिक धैर्याने सामोरा जातो. तसेच स्वावलंबनाची सवय विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाला बळ देते. स्वतःची पुस्तके व्यवस्थित ठेवणे, शाळेची तयारी स्वतः करणे, स्वतःच्या छोट्या जबाबदाऱ्या पार पाडणे आणि स्वतःच्या चुका स्वतः सुधारण्याची तयारी ठेवणे या छोट्या गोष्टी विद्यार्थ्याला जबाबदार नागरिक बनवतात. पालकांनी मुलांच्या प्रत्येक कामात हस्तक्षेप करण्याऐवजी त्यांना स्वतः करण्याची संधी देणे आवश्यक आहे.

यासोबतच नम्रता, आदर, कृतज्ञता आणि क्षमाशीलता या सवयी विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाला खऱ्या अर्थाने सुंदर बनवतात. मदत मिळाल्यावर ''धन्यवाद'' म्हणणे, चूक झाली तर ''माफ करा'' म्हणणे, मोठ्यांचा आदर करणे आणि लहानांशी प्रेमाने वागणे या सवयी गुणपत्रिकेत दिसत नसल्या तरी जीवनाच्या परीक्षेत त्यांचे महत्त्व फार मोठे असते. या सर्व सवयींपैकी एक अत्यंत प्रभावी सवय म्हणजे आत्मपरीक्षणाची सवय. दिवस संपताना विद्यार्थ्याने स्वतःला तीन प्रश्न विचारावेत की आज मी काय चांगले केले? माझ्याकडून कोणती चूक झाली? उद्या मी त्यात काय सुधारणा करणार? या तीन प्रश्नांची नियमित सवय विद्यार्थ्याला स्वतःचाच निरीक्षक आणि स्वतःचाच मार्गदर्शक बनवते. मात्र येथे पालक आणि शिक्षकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मुलांना केवळ ''वाचन कर'', ''वेळ वाया घालवू नको'', ''मोबाईल कमी वापर'' असे सांगून चांगल्या सवयी निर्माण होत नाहीत. मुले उपदेशापेक्षा अनुकरणातून अधिक शिकतात. पालक वाचन करत असतील तर मुलाला वाचनाची प्रेरणा मिळते; शिक्षक वेळेचे भान ठेवत असतील तर विद्यार्थ्याला वेळेची किंमत समजते.घरात संवाद, आदर आणि संयमाचे वातावरण असेल तर तेच संस्कार मुलांच्या व्यक्तिमत्त्वात उतरतात. म्हणून विद्यार्थ्याच्या दळणघडणीचा केंद्रबिंदू केवळ गुण मिळविणे नसून गुण निर्माण करणे हा असला पाहिजे. अभ्यासातील गुण महत्त्वाचे आहेतच; पण त्याबरोबर प्रामाणिकपणा, शिस्त, संवेदनशीलता, स्वावलंबन, कृतज्ञता, जिज्ञासा, संयम आणि जबाबदारी हे गुण विकसित झाले तर शिक्षण खऱ्या अर्थाने यशस्वी झाले असे म्हणता येईल.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की

**सवय कृती घडवते,**
**कृती स्वभाव घडवते,**
**स्वभाव व्यक्तिमत्त्व घडवतो,**
**आणि व्यक्तिमत्त्व भविष्य घडवते.**

म्हणूनच विद्यार्थ्यांच्या हातात केवळ पुस्तक देणे पुरेसे नाही; त्यांच्या जीवनात चांगल्या सवयींची बीजे रुजवणे आवश्यक आहे. कारण आजची एक छोटी चांगली सवय उद्याच्या एका सुंदर, सक्षम आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वाची सुरुवात ठरू शकते. ●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)

## भारतीय शेतकरी कामगार पक्ष
# ७९ या वर्धापन दिन विशेष



# विचारांचा दीपस्तंभ, संघर्षाची मशाल!


माधवी सावंत
संपादक, दैनिक कृषीवल


**राजकारणात सत्तेसाठी पक्षांतर, तत्त्वांशी तडजोड आणि विचारांचा त्याग ही बाब आता नवी राहिलेली नाही. अशा काळात तब्बल ७९ वर्षे शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी संघर्षाची मशाल अखंड पेटती ठेवणारा शेतकरी कामगार पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण करतो. सत्तेपेक्षा विचारांना, पदापेक्षा जनतेच्या विश्वासाला आणि राजकीय फायद्यापेक्षा आंदोलनाच्या परंपरेला महत्त्व देणाऱ्या या पक्षाने अनेक चढ-उतार, पराभव आणि राजकीय आव्हाने पेलली; पण आपल्या मूलभूत विचारसरणीशी कधीही तडजोड केली नाही. लाल बावट्याच्या सावलीत घडलेल्या या संघर्षमय प्रवासात शेकडो कार्यकर्त्यांचा त्याग, अनेक नेत्यांची निष्ठा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी दिलेल्या लढ्यांचा इतिहास दडलेला आहे. शेकापच्या ७९ वर्षांच्या या विचारप्रवासाचा, संघर्षाचा आणि जनआंदोलनांच्या परंपरेचा हा वेध.**

### 1 संघर्ष हीच शेकापची ओळख

शेकापने कधीच राजकारणाला केवळ निवडणुकीपुरतं मर्यादित ठेवलं नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी, कामगारांचे हक्क, कष्टकऱ्यांचा सन्मान, सहकार चळवळ, स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक न्याय अशा प्रत्येक प्रश्नावर लाल बावटा अग्रभागी राहिला. जनतेच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून संघर्ष करणं हीच पक्षाची ओळख बनली.

### 2 कार्यकर्ताच पक्षाचा पाया

कोणत्याही विचाराचा पाया हा कार्यकर्ता असतो. शेकापची खरी ओळख त्याचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. पद, पैसा किंवा सत्तेपेक्षा विचाराला प्राधान्य देणारी ही पिढीच पक्षाचा सर्वात मोठा वारसा आहे. प्रत्येक गावात, प्रत्येक आंदोलनात आणि प्रत्येक संघर्षात लाल बावटा जिवंत ठेवणारी हीच माणसं शेकापची खरी ताकद आहेत.

### 3 कामगारांच्या स्वाभिमानाचा आवाज

लाल बावटा आजही त्याच अभिमानाने फडकत आहे आणि तो फडकत राहील, कारण तो केवळ एका पक्षाचा ध्वज नाही, तर तो कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या स्वाभिमानाचं प्रतीक आहे. ७९ वर्षांपूर्वी पेटलेली विचारांची ज्योत आजही विझलेली नाही. काळ बदलला, राजकारण बदलले, संघर्षांची रूपे बदलली; पण अन्यायाविरुद्ध उभं राहण्याचं तत्त्व आजही शेकापनं जपलं आहे. लाल बावटा हा शेतकरी आणि कामगारांच्या स्वाभिमानाचा आवाज आहे. कष्टकऱ्यांच्या हक्काचा संघर्ष आहे. सत्तेच्या दडपणापुढे न झुकण्याची जिद्द हीच शेकापची ओळख आहे.

### 4 आता संकल्प १०० वर्षांचा!

७९ वर्षांचा इतिहास अभिमानाने मिरवण्यासाठी तर आहेच; तसेच पुढच्या लढ्याची दिशा ठरवण्यासाठीदेखील आहे. आता नव्या अध्यायाची सुरुवात झाली आहे. शेकापसमोर आज सर्वात मोठे आव्हान सत्ता मिळवण्याचे नाही, तर विचारांची ताकद नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे आहे. आणि, हे काम आजची पिढी प्रामाणिकपणे करीत आहे. लाल बावटा फक्त जुन्या पिढीच्या आठवणींमध्ये न राहता तरुणांच्या हातात, नव्या प्रश्नांच्या आंदोलनात आणि आधुनिक राजकारणाच्या केंद्रस्थानी दिसत आहे. आजचा युवक वेगळे प्रश्न घेऊन उभा आहे. रोजगार, शिक्षण, डिजिटल अर्थव्यवस्था, शेतीचे बदलते स्वरूप, वाढते शहरीकरण, पर्यावरण, महागाई आणि सामाजिक असुरक्षितता या प्रश्नांवर शेकापने स्पष्ट आणि आक्रमक भूमिका घेतली आहे. इतिहास सांगणारा पक्ष नव्हे, तर इतिहास घडवणारा पक्ष बनण्याचा संकल्प तरुण पिढीने घेतला आहे. गावागावातील संघटना मजबूत होत आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या बळावर नव्या नेतृत्वाची फळी उभी राहात आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा वापर केवळ प्रसिद्धीसाठी नव्हे, तर जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी केला जात आहे.

सत्तेच्या सावलीत अनेक राजकीय पक्ष जन्माला आले आणि सत्तेचा सूर्य मावळताच इतिहासाच्या पानांत हरवून गेले. काहींनी सत्तेसाठी विचार बदलले, तत्त्वांशी तडजोड केली, तर काहींनी सत्तेच्या समीकरणांसाठी आपली राजकीय ओळखच गहाण ठेवली. पण, ७९ वर्षे उलटूनही विचारांची मशाल हातात घेऊन संघर्षाच्या रणांगणात ठामपणे उभा असलेला शेतकरी कामगार पक्ष ही महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील वेगळी ओळख आहे. शेकापचा इतिहास लिहायचा झाला तर तो निवडणूक निकालांच्या आकड्यांनी पूर्ण होणार नाही. तो लिहावा लागेल तो शेतकऱ्यांच्या घामाने, कामगारांच्या कष्टाने, कष्टकऱ्यांच्या वेदनेने आणि आंदोलनांच्या घोषणांनी.

ज्या काळात शेतकऱ्याच्या प्रश्नाला राजकीय ताकद नव्हती, त्या काळात त्याचा आवाज बनण्याचे काम याच पक्षाने केले. कामगारांच्या हक्कांसाठी लढे उभारले. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याचा प्रयत्न केला. शिक्षण, स्थानिक स्वराज्य, सामाजिक न्याय आणि सामान्य माणसाच्या हक्कांच्या प्रश्नांना राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले.

हा केवळ एका पक्षाचा ७९ वर्षांचा प्रवास नाही, तर महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, कष्टकरी, मच्छिमार, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्यांच्या हक्कासाठी उभारलेल्या संघर्षाचा इतिहास आहे. हा इतिहास आहे घामाचा, त्यागाचा, तुरुंगवासाचा, आंदोलनांचा आणि अन्यायाविरुद्ध न झुकणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांचा.

शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांशी आणि लाल बावट्याशी आपले राजकीय नाते कायम ठेवणारे स्व. नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील, स्व. अ‍ॅड. दत्ता पाटील, स्व. गणपतराव देशमुख, प्रा. एन.डी. पाटील, स्व. मीनाक्षी पाटील आणि जयंत पाटील हे शेकापच्या राजकीय वाटचालीतील महत्त्वाचे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. सत्ता असो वा नसो, राजकीय परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल, शेकापच्या विचारांचा झेंडा हातातून खाली न ठेवण्याची भूमिका त्यांनी कायम जपली. राजकारणात संधी अनेकांना मिळतात; मात्र संधीपेक्षा निष्ठेला महत्त्व देणारे नेतृत्व दुर्मिळ असते. शेकापच्या या ज्येष्ठ नेत्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहताना ही बाब प्रकर्षाने जाणवते. शेकापची ताकद केवळ निवडणुकीतील जागांमध्ये नाही, तर विचारांशी जोडलेल्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्या विचारांना राजकीय पातळीवर सातत्याने पुढे नेण्याचे काम आजही शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील करीत आहेत. शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना राजकारणाच्या केंद्रस्थानी ठेवण्याची भूमिका ही शेकापच्या परंपरेशी जोडलेली आहे.





आजच्या राजकारणात विचारांपेक्षा सत्ता महत्त्वाची ठरते, तत्त्वांपेक्षा तडजोडीला किंमत मिळते. कार्यकर्त्यांपेक्षा निवडणूक यंत्रणा आणि पैशाच्या ताकदीला महत्त्व दिले जाते. अशा काळात विचारांशी निष्ठा राखत संघर्षाची वाट चालणं, ही खरी राजकीय परीक्षा आहे आणि शेकापने ही परीक्षा तब्बल आठ दशके दिली आहे. शेकापसाठी आंदोलन हा केवळ राजकीय कार्यक्रम नाही; तो जनतेच्या प्रश्नांशी जोडलेला विश्वास आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीपासून कामगारांच्या हक्कांपर्यंत, कष्टकऱ्यांच्या सन्मानापासून सहकार चळवळीपर्यंत, शिक्षणापासून पर्यावरणापर्यंत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांपासून सामाजिक न्यायापर्यंत जिथे-जिथे जनतेचा प्रश्न, तिथे-तिथे लाल बावटा कायमच फडकत राहिला आहे. सत्तेच्या दालनात बसून जनतेच्या प्रश्नांची चर्चा करण्यापेक्षा रस्त्यावर उतरून त्या प्रश्नांसाठी लढण्याची परंपरा शेकापने जपली. म्हणूनच लाल बावटा हा केवळ पक्षाचा झेंडा राहिला नाही; तर तो संघर्षाची ओळख आहे.

राजकारणात सत्ता येते-जाते. जागा कमी-जास्त होतात. राजकीय समीकरणे बदलतात; परंतु विचारांशी तडजोड करून सत्ता टिकवण्यापेक्षा तत्त्वांसाठी सत्ता गमावण्याची तयारी ही शेकापने दाखविली. आणि, म्हणूनच शेकापचे ज्येष्ठ नेते उद्धवराव पाटील यांनी मुख्यमंत्रीपद नाकारत जनतेच्या विश्वासाची तत्त्वं सांभाळली. आज सत्तेसाठी पक्ष बदलणं, विचार बदलणं आणि भूमिका बदलणे, ही बाब राजकारणात नवीन राहिलेली नाही. अशा वातावरणात ७९ वर्षे एका विचारधारेचा झेंडा घेऊन उभे राहणं, ही छोटी गोष्ट नाही. या लाल बावट्याच्या सावलीत हजारो कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य जनतेसाठी खर्च केले. पदाची अपेक्षा नाही, सत्तेची लालसा नाही, वैयक्तिक स्वार्थाची गणिते नाहीत, फक्त विचार आणि संघर्ष! गावागावातील कार्यकर्ता हा शेकापचा खरा चेहरा आहे. आंदोलनात लाठी खाणारा, शेतकऱ्याच्या बांधावर उभा राहणारा, कामगाराच्या प्रश्नासाठी आवाज उठवणारा आणि सामान्य माणसाच्या अडचणीच्या वेळी त्याच्या पाठीशी उभा राहणारा कार्यकर्ता हीच या पक्षाची खरी संपत्ती आहे.

शेकापची ताकद कधीच सत्तेच्या आकड्यांत नव्हती; ती जनतेच्या विश्वासात होती. म्हणूनच अनेक वेळा सत्ता हातातून गेली, जागा कमी झाल्या, राजकीय समीकरणं बदलली; पण विचारांशी तडजोड करण्याचा मार्ग पक्षाने स्वीकारला नाही. राजकारणात टिकून राहण्यासाठी तत्त्व सोडण्यापेक्षा तत्त्वांसाठी संघर्ष करणं पक्षाने निवडलं. आज राजकारणाचा चेहरामोहरा बदलला आहे. पैशाचा वाढता प्रभाव, सोशल मीडियाचे राजकारण, प्रचंड प्रचारयंत्रणा, सत्तेचे केंद्रीकरण, जातीय ध्रुवीकरण आणि जनतेच्या प्रश्नांपेक्षा प्रतिमानिर्मितीला मिळणारे महत्त्व या सगळ्यामुळे विचारांच्या राजकारणापुढे मोठे आव्हान उभे आहे. पण, आव्हान मोठे आहे म्हणून संघर्ष थांबवायचा नसतो. उलट, जिथे शेतकरी अडचणीत आहे, जिथे कामगार असुरक्षित आहे, जिथे तरुण बेरोजगार आहे, जिथे शिक्षण आणि आरोग्य सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे, तिथे विचारांच्या राजकारणाची गरज अधिक आहे. ७९ वर्षांचा इतिहास हा केवळ गौरव करण्यासाठी नाही. तो पुढच्या संघर्षाची दिशा दाखवण्यासाठी आहे. कारण जुना इतिहास अभिमान देतो; पण नवा संघर्षच भविष्य घडवतो. आजही शेतकऱ्यांच्या प्रश्नांना पूर्णविराम मिळालेला नाही. कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न कायम आहे. बेरोजगारीचे संकट गंभीर आहे. शिक्षण आणि आरोग्य महाग होत आहे. जमिनी, पाणी, पर्यावरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवरचे संघर्ष वाढत आहेत. ७९ वर्षांचा हा टप्पा म्हणजे नव्या संघर्षाची सुरुवात आहे!

लाल बावटा आजही फडकतोय. तो फक्त एका राजकीय पक्षाचा झेंडा नाही. तो शेतकऱ्याच्या घामाचा, कामगाराच्या कष्टाचा, कष्टकऱ्याच्या स्वाभिमानाचा आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याच्या जिद्दीचा झेंडा आहे. आजच्या सत्ताकेंद्री राजकारणाला प्रश्न विचारण्याची हिंमत जिवंत ठेवायची असेल, तर विचारांचे राजकारण जिवंत ठेवावे लागेल. आणि म्हणूनच संघर्ष थांबणार नाही, विचार झुकणार नाही आणि लाल बावटा कधी खाली येणार नाही!

**लाल सलाम!**

## लाल बावटा झिंदाबाद!

लढायची हिम्मत ठेवा,
विजय निश्चित आहे..
चोर, फसवे घरादारात,
त्यांना दूर ठेवायचे आहे..

दुबळ्याची सेवा मुळाशी,
ती आजही तशीच आहे..
खोट्याने राजकारण नाही,
ही शेकाची कमाई आहे..

संविधान हाच ग्रंथ आमचा,
देशनिष्ठा तिरंग्यात आहे..
देश विक्या खोके कंपनीचे,
आमच्यासाठी ते पाप आहे..

गेले किती त्याची तमा नाही,
स्वतःत मोठी शक्ती आहे..
करणार, लढणार पुढेच आम्ही,
लाल बावतट्याची जिद्द आहे..

देशभक्त, द्रोही म्हणणाऱ्यांची,
आजची खोटी राजवट आहे..
आम्ही मनाचे इमानी राजे,
आमची छोटी राजवट आहे..

कोणीही नाही अढळ आजवर,
प्रत्येकास मर्यादा ठरली आहे..
मूठभर जागेत मूळ धरूनही,
राज्यात लाल बावटा टिकून आहे..

– साहित्यरत्न रायगडभूषण
प्रा. एल.बी. पाटील
मो. ८८५०२८७४८६

## शेतकरी कामगार पक्ष

ऐका कहाणी ही शे.का. पक्षाची
शेतकरी आणि कष्टकऱ्यांची
पूर्तता करीते प्रश्नाची ।। १ ।।

कै. नारायण नागू पाटील साहेबांनी
शे.का. पक्षाची स्थापना केली त्यांनी
कै. दत्ता पाटील, भाऊ प्रभाकर पाटीलांनी
खरी बांधणी केली या पक्षाची ।। २ ।।

श्री. जयंत पाटील साहेब लढवय्ये नेते
अध्यक्ष आहेत ते या शे.का. पक्षाचे
वाहा वा होत आहे सगळीकडे त्याची
त्यांनी केलेल्या कामाची ।। ३ ।।

आठवण येत आम्हा आमदार मीनाक्षी ताईंची
शेकापक्षाच्या त्या झाशीच्या राणीची
जनकल्याणनाची कामे करताना ती
भान हरपून जायाची ।। ४ ।।

आरडीसीसी बँकेची प्रगती झाली
शे.का. पक्षाच्या प्रयत्नांनी
प्रशंसा करुया आपण सारेजण
श्री. जयंत पाटीलांच्या बुद्धीची ।। ५ ।।

भिवू नको कुणी, घाबरु नका हो
पक्षाशी गद्दारी कुणी करु नका हो
जिद्दीने पुन्हा तयारी करु या
विरोधकांशी लढण्याची ।। ६ ।।

**– लवेंद्र मोकल,**
कळवे-पेण,
मो. ९९२१९७३८५६



**राज्यात आज ४३५ नोंदणीकृत राजकीय पक्ष आहेत. पक्षांची संख्या वाढली, तशी पक्षांतराची संस्कृतीही बोकाळली. सत्ता, पद, प्रतिष्ठा, चौकशांची भीती, राजकीय दबाव किंवा वैयक्तिक स्वार्थ यासाठी पक्ष बदलणे, विचार बदलणे आणि कालपर्यंत ज्या झेंड्याला खांदा दिला, तोच झेंडा दुसऱ्या दिवशी सोडून देणे, हे आजच्या राजकारणाचे कटू वास्तव बनले आहे. आयाराम-गयाराम हा शब्द आता केवळ राजकीय उपहास राहिलेला नाही; तर तो अनेकांच्या राजकीय प्रवासाची ओळख बनला आहे. मात्र, या राजकीय गर्दीत एक पक्ष असा आहे, ज्याची ओळख सत्तेपेक्षा विचारांनी, पदांपेक्षा संघर्षाने आणि व्यक्तींपेक्षा निष्ठेने निर्माण झाली. १९४८ मध्ये स्थापन झालेला शेतकरी कामगार पक्ष हा केवळ एक राजकीय पक्ष नाही, तर महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि भूमीपुत्रांच्या स्वाभिमानाचा लाल ध्वज आहे. या पक्षाने अनेक दिग्गज नेते घडवले; पण त्याहून मोठी गोष्ट म्हणजे, या पक्षाने अशी माणसे घडवली, ज्यांनी आयुष्यभर आपल्या विचारांशी प्रतारणा केली नाही. सत्तेची दारे उघडी होती, मंत्रीपदांची आमिषे होती, मुख्यमंत्रीपदाचे प्रस्ताव होते, तरी त्यांनी लाल बावटा सोडला नाही. त्यांनी पदापेक्षा पक्ष मोठा मानला आणि सत्तेपेक्षा विचार मोठे मानले. शेतकरी कामगार पक्ष आज आपला ७९ वा वर्धापन दिन साजरा करत आहे. यानिमित्ताने आम्ही अशा २० महान नेत्यांचा प्रवास उलगडत आहोत, ज्यांनी पदासाठी 'विचार' विकले नाहीत, सत्तेसाठी 'झेंडा' बदलला नाही आणि आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत 'लाल बावट्या'शी एकनिष्ठ राहून संघर्षाची परंपरा जिवंत ठेवली. ही केवळ त्यांच्या कार्याची नोंद नाही; तर आजच्या पिढीसमोर निष्ठा, विचार आणि राजकीय चारित्र्याचा आदर्श आहे.**



अशोक अडसूळ
ज्येष्ठ पत्रकार

# अखेरच्या श्वासापर्यंत लालबावट्याशी एकनिष्ठ





राजकीय पक्षासाठी आजचे दिवस अडचणीत आहेत. ईडी, सीबीआय, कारवाईची भीती दाखवली जाते. नेत्यांना आपल्या पक्षात किंवा इतर पक्षात जाण्यासाठी धमकावले जाते. काही लेचेपेचे असतात, ते लगेच पळतात. काही अशा धमकीला भीक न घालता लढतात. संघर्ष करतात आणि आपला बाणा दाखवतात. पक्षाने जे जे दिले, त्याची आठवण ठेवतात. ते आपल्या भूमिकेपासून जराही ढळत नाहीत. हीच तर परीक्षेची वेळ असते. तुम्हाला तुमचे सत्व दाखवण्याची हीच तर संधी असते. तुम्हाला 'शेकाप'मध्ये असे अनेक नेते सापडतील, त्यांना काँग्रेसने मंत्रीपदाच्या, मुख्यमंत्रीपदाच्या ऑफर दिल्या होत्या. तरी त्यांनी लाल बावटा सोडला नाही.

प्रादेशिक पक्षांसाठी सध्या अडचणीचा काळ आहे. पण, राजकारण कधीच स्थिर नसते. सत्ता काही केवळ निवडणुकांमध्ये नसते. डाव्या पक्षांसाठी तर सत्ता कायम दूरदूर राहिली आहे. पण, या देशात आजही केवळ सिद्धांताचे राजकारण डावे पक्ष करतात. म्हणून तर कॉम्रेडना मान आहे. लाल बावट्याची काही एक भूमिका आहे. त्यापासून डावे पक्ष कधीही ढळत नाहीत. जुने जातात, नवे त्यांची जागा घेतात, हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे जाणाऱ्यांचे, गेलेल्यांचे पक्षाला जराही दुख: नाही. पक्ष पुन्हा उभा राहील. नव्यांना जोडून घेईल. राजकीय संधी फिरुन येत असते. तुमचे पाय फक्त जमिनीवर हवेत.

इतरत्र पक्षफुटीचा शिरकाव अभेद्य मानल्या गेलेल्या रायगडातही झाला. कार्यकर्त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते अशा नेत्यांनी लाल बावट्याशी बेईमानी करत शरणागती पत्करली. राजकीय पक्ष नदीसारखा प्रवाही असतो. शेकाप तसाच आहे. किती ओढे, ओहोळ या लाल नदीला मिळतात. म्हणून तर आम्ही गेल्या सात दशकांत इतिहास घडवला आहे. पक्षाने या नेत्यांना सर्वकाही दिले. पण, त्यांनी पक्ष अडचणीत असताना पाठ दाखवली. त्यांना इतिहास माफ करणार नाही. म्हणून आम्ही 'शेकाप'च्या २० महान नेत्यांचे कार्य समोर ठेवत आहोत. कारण, ते असे भाई होते, ज्यांनी पक्ष कधी बदलला नाही.

## १. नारायण नागू पाटील : (१८९२ ते १९६८)



कुळ कायद्याचे जनक, खोतीविरोधी लढ्याचे शिल्पकार आणि शेतकरी चळवळीचे आधारस्तंभ रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील धेरंड या छोट्याशा गावात जन्मलेले नारायण नागू पाटील हे महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचे एक अजरामर व्यक्तिमत्त्व मानले जाते. शोषित, वंचित आणि कष्टकरी शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे हे नेतृत्व केवळ शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक नेते नव्हते, तर त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि कृषी इतिहासावर अमीट ठसा उमटवला. म्हणूनच त्यांना कुळ कायद्याचे जनक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात सन्मानाने ओळखले जाते.

ब्रिटिशकालीन खोती पद्धतीमुळे कोकणातील शेतकऱ्यांचे जीवन अक्षरशः उद्ध्वस्त झाले होते. जमीन कसणारा शेतकरी उपाशी राहात होता, तर खोत आणि जमीनदार मात्र त्याच्या श्रमांवर ऐषआराम करत होते. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे धाडस नारायण नागू पाटील यांनी केले. १९३२ मध्ये चरी-कोपर परिसरातून त्यांनी खोतीविरोधी ऐतिहासिक आंदोलनाची मुहूर्तमेढ रोवली. हा संघर्ष काही दिवसांचा नव्हता; तब्बल सात वर्षे शेतकऱ्यांनी जमीन न कसण्याचा निर्धार केला. पोटाला चिमटा काढला, उपासमार सहन केली, अनेकांनी शहरांकडे मजुरीसाठी स्थलांतर केले; पण अन्यायापुढे गुडघे टेकले नाहीत. या ऐतिहासिक लढ्याला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ठाम समर्थन लाभले. ''जमिनीचा मालकी हक्क मिळत नसेल, तर जमीन कसणार नाही,'' हा नारायण नागू पाटील यांनी दिलेला नारा शेतकरी चळवळीचा घोष बनला. या दीर्घकालीन संपाची दखल राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही घेतली गेली. अखेर या संघर्षातून कुळ कायद्याची निर्मिती झाली आणि महाराष्ट्रातील लाखो कुळांना कायदेशीर संरक्षण मिळाले. ''कसेल त्याची जमीन'' हे ऐतिहासिक तत्त्व प्रत्यक्षात येण्यासाठी नारायण नागू पाटील यांच्या संघर्षाचा सिंहाचा वाटा होता.

१९३६ च्या मुंबई प्रांतिक निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने शेतकरी प्रश्न केंद्रस्थानी ठेवत निवडणूक लढवली. त्या चळवळीत नारायण नागू पाटील सक्रियपणे सहभागी झाले. शेतकरी, शेतमजूर आणि कामगार यांच्या प्रश्नांना राजकीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. संघर्षाबरोबरच विचारांची लढाईही तेवढीच महत्त्वाची असल्याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे १९३७ मध्ये त्यांनी 'कृषीवल' या दैनिकाची स्थापना केली. हे वृत्तपत्र केवळ बातम्या देणारे माध्यम नव्हते; तर शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य जनतेच्या हक्कांसाठी आवाज उठवणारे प्रभावी शस्त्र ठरले. १५ जानेवारी हा त्यांचा स्मृतिदिन आजही रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रात प्रेरणादिन म्हणून साजरा केला जातो. प्रकल्पग्रस्त, भूमीपुत्र, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा आजही त्यांच्या विचारांतून मिळते. संघर्ष, त्याग, प्रामाणिकपणा आणि विचारनिष्ठा यांचा संगम असलेले नारायण नागू पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे केवळ संस्थापक नेते नव्हते, तर महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी इतिहासातील एक अजरामर पर्व होते. त्यांनी उभारलेला लाल बावटा आजही शोषितांच्या न्यायलढ्याचे प्रतीक म्हणून अभिमानाने फडकत आहे.

## २. भाई माधवराव बागल : (१८९५ ते १९८६)



भाई माधवराव बागल यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापुरातील राजाराम हायस्कूल येथे झाले. त्यांनी जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथून चित्रकला अभ्यासक्रम पूर्ण केला. समाजसुधारक म्हणून त्यांनी दलितांच्या उत्कर्षासाठी काम केले. दलितांना मंदिरात जाऊन इतर जातींमध्ये मिसळण्याचा हक्क मिळावा यासाठी लढा दिला. त्यांचे वडील खंडेराव कट्टर सत्यशोधक होते. त्यांनी १९३९ मध्ये कोल्हापूर येथे शेतकरी परिषद आयोजित केली आणि आंदोलनाच्या मार्गाने अन्यायकारक महसुलाविरुद्ध आवाज उठविला. १९४१ मध्ये कोल्हापूरच्या रियासत राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केली. कोल्हापूर संस्थानचे भारतीय संघराज्यात विलीन होण्याच्या आंदोलनाचे नेतृत्व केले. कोल्हापुरात लोकवर्गणीतून महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे उभारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हयातीत उभारण्यात आलेला हा देशातील पहिला पुतळा आहे. त्यांनी कोल्हापूर आणि लगतच्या प्रदेशात कृषी सहकारी संस्था सुरू केल्या. १९४६ मध्ये पुण्याचे केशवराव जेधे, पुण्याचे शंकरराव मोरे, नाशिकचे काकासाहेब वाघ, नाशिकचे नाना पाटील, सोलापूरचे तुळशीदास जाधव यांच्यासमवेत संयुक्तपणे शेतकरी व कामगार पक्षाची स्थापना करणारे मराठा समाजातील भाई माधवराव बागल हे आघाडीचे नेते होते. भाई माधवराव बागल यांनी मोठ्या निष्ठेने शेतकरी कामगार पक्षाचे काम केले. जीवनप्रवाह (आत्मचरित्र), बहुजन समाजाचे शिल्पकार, सत्याग्रहाचा इतिहास अशी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांच्या स्मरणार्थ कोल्हापुरात भाई माधवराव बागल विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे.

## ३. भाई भाऊसाहेब राऊत : (१९०४ ते १९९४)



'शेकाप'चे थोर नेते म्हणजे राजाराम बाळकृष्ण उर्फ भाऊसाहेब राऊत. क्रांतिवीर भाई कोतवाल यांनी स्थापन केलेल्या 'आझाद दस्ता' या भूमीगत संघटनेच्या कार्यात आणि ब्रिटिशविरोधी आंदोलनांत भाऊसाहेब सहभागी होते. राऊत यांनी पारशांच्या ताब्यात असलेली माथेरान नगरपालिका १९३८ मध्ये भूमीपुत्रांच्या ताब्यात आणली. १९४७ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबई विधानसभेमध्ये ते निवडून गेले. भाऊसाहेब राऊत व शंकरराव मोरे यांनी पुढाकार घेऊन शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. १९५४ मध्ये राज्यसभेवर महाराष्ट्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाऊसाहेब असे दोघे गेले. महाराष्ट्र काँग्रेसचे नेतृत्व यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आल्यावर विरोधी पक्षाच्या एकेक नेत्याला काँग्रेसमध्ये आणण्याची मोहीम उघडली. परंतु, त्यापासून भाऊसाहेब राऊत दूर राहिले. ते 'शेकाप'चे पहिले खासदार होते. खासदार म्हणून निवडून आल्यानंतर परळच्या कामगार मैदानावर त्यांना नागरी सत्कारात दिलेली ५० हजारांची थैली त्यांनी पक्षाला छापखाना काढण्यासाठी दिली. त्यांनी 'जनशक्ती' साप्ताहिक सुरू केले. 'जय महाराष्ट्र' साप्ताहिकाचे संस्थापक राऊत होते. त्यांनी कर्जत तालुक्यात 'आदिजन विद्या प्रसारक मंडळाची' स्थापना केली. सर्वसामान्य शेतकरी आणि दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी आयुष्य वेचणाऱ्या या थोर नेत्याला रायगड आणि संपूर्ण महाराष्ट्रात आदराने स्मरले जाते.

## ४. शारदाबाई गोविंदराव पवार : (१९११ ते १९७४)



या कर्तृत्ववान, पुरोगामी विचारसरणीच्या सामाजिक-राजकीय कार्यकर्त्या आणि शरद पवार यांच्या मातोश्री होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी पुणे जिल्हा लोकल बोर्डाच्या सदस्या म्हणून तब्बल १४ वर्षे उल्लेखनीय कार्य केले. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात असलेल्या गोलिवडे या गावी झाला. त्या १९३८ मध्ये पुणे जिल्हा लोकल बोर्डावर बिनविरोध निवडून आल्या. त्या काळात ५० सदस्यीय बोर्डात त्या एकमेव महिला सदस्य होत्या. त्यांनी १९३८ पासून सलग १४ वर्षे (१९५२ पर्यंत) बोर्डाच्या विविध समित्यांवर, विशेषतः बांधकाम समितीच्या अध्यक्षा म्हणून यशस्वी काम पाहिले. पवार कुटुंबाची पार्श्वभूमी मूळची शेतकरी कामगार पक्षाच्या विचारसरणीशी जोडलेली होती. शारदाबाईंच्या प्रभावामुळे त्यांचा मोठा मुलगा वसंतराव पवार हेदेखील शेतकरी कामगार पक्षाचे अत्यंत सक्रिय कार्यकर्ते आणि नेते होते. शारदाबाई या पवार घराण्यातील पहिल्या राजकारणी होत्या आणि त्यांच्या राजकीय प्रवासाचा पाया हा शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी आणि डाव्या विचारसरणीवर आधारलेला होता. शारदाबाई पवार या डाव्या विचारसरणीच्या शेतकरी कामगार पक्षाच्या आजीवन सदस्य होत्या. त्यांचे पती गोविंदराव पवार आणि मुलगा (शरद पवार) हे काँग्रेस विचारांचे असतानाही, शारदाबाईंनी आपली 'शेकाप'शी असलेली राजकीय निष्ठा आयुष्यभर जपली.

## ५. भाई दिनकरराव नलवडे : (१९१८ ते १९९७)

भाई दिनकरराव नलवडे यांचा जन्म १९१८ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड (पूर्वीचे गारगोटी) तालुक्यातील मडिलगे गावी झाला. सत्यशोधक समाज आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुरोगामी विचारांनी ते प्रेरित झाले. दिनकरराव यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनातून झाली. या आंदोलनादरम्यान त्यांनी भूमीगत राहून संघटनात्मक काम केले. राधानगरी हायड्रो-इलेक्ट्रिक कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी त्यांनी संघर्ष केला. त्यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी २२ दिवसांचा यशस्वी संप घडवून आणला. बिद्री साखर कारखान्याच्या स्वप्नपूर्तीसाठी भाईंनी पायी फिरूनही शेअर्स गोळा केले. ते बिद्री कारखान्याचे व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक होते. कोल्हापूर जिल्ह्यात शेकाप वाढवण्यासाठी गावोगावी दौरे केले. १९६७ मध्ये कोल्हापूर जिल्हा शेकाप कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे अध्यक्षपद भूषवले. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेच्या लढ्यात त्यांनी हिरीरिने भाग घेतला. भुदरगड आणि गारगोटी परिसरात शैक्षणिक उपक्रमांना मदत केली. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, गोवा मुक्ती संग्राम, सीमा प्रश्न वा दुष्काळ निवारण अशा प्रश्नांवर नलवडे यांनी नेतृत्वाची धुरा समर्थपणे सांभाळली. म्हणून त्यांना लोकनेते असे आदराचे स्थान प्राप्त झाले आहे.

## ६. कृष्णराव धुळप : (१९२० ते १९८९)

कृष्णराव धुळप हे (बाबासाहेब धुळप) कल्याण येथील शेकापचे प्रमुख नेते होते. त्यांचे कुटुंब मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील विजयदुर्ग येथील जहागीरदार होते. त्यांनी १९६२ ते १९६७ आणि १९६७ ते १९७२ या काळात महाराष्ट्र विधानसभा विरोधी पक्षनेते म्हणून काम पाहिले. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेत ठाणे जिल्ह्यातील कल्याण विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सलग १० वर्षे (१९६२ ते १९७२) विरोधी पक्षनेतेपद भूषवणारे जे मोजके प्रभावशाली नेते होते, त्यापैकी धुळप एक होते. त्यांनी १९७१ मध्ये भिवंडी लोकसभा मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाकडून निवडणूक लढवली. काही काळ पक्षाचे ते सरचिटणीस होते. त्यांनी वाढती महागाई, शेतमजूर आणि मध्यमवर्गीयांच्या प्रश्नांवर विधिमंडळात आवाज उठवला. सीमा भागातील मराठी भाषिकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने केंद्र



व राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. संख्याबळ कमी असूनही अभ्यासू वृत्ती, आक्रमक वक्तृत्व आणि संसदीय नियमांच्या अचूक ज्ञानामुळे त्यांनी तत्कालीन सत्ताधारी काँग्रेस सरकारला अनेकदा धारेवर धरले. विधानसभा कारकीर्दीनंतर त्यांची १९७४ ते १९८० या कालावधीसाठी संसद सदस्य म्हणून राज्यसभेवर निवड झाली. दिल्लीच्या वर्तुळात त्यांनी महाराष्ट्रातील गिरणी कामगार, शेतमजूर आणि दुर्गम भागातील शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला.

## ७. भाई उद्धवराव पाटील : (१९२० ते १९८४)



भाई उद्धवराव पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत आणि कष्टकऱ्यांचे कैवारी होते. १९२० मध्ये बार्शी तालुक्यातील इर्ले (जि. सोलापूर) येथे शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. उस्मानाबाद येथे शिक्षण पूर्ण करून त्यांनी एल.एल.बी. पदवी घेतली व काही काळ वकिली केली. निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्यांनी सशस्त्र आणि राजकीय लढा उभारला. गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सावकारशाहीविरोधातील संघर्षात त्यांनी आघाडीची भूमिका बजावली. १९५८-५९ मध्ये त्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून प्रभावी काम केले. १९६६ मध्ये शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी मुंबईत ४० हजार बैलगाड्यांचा ऐतिहासिक मोर्चा काढला. रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकार योजना आणि शैक्षणिक सवलती यांसारख्या जनहिताच्या उपक्रमांमध्ये त्यांचा मोठा वाटा होता. तेरणा प्रकल्प आणि वैराग येथील भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीतही त्यांनी मोलाचे योगदान दिले. १९७७ ते १९८० या काळात ते लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार होते. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना काँग्रेसमध्ये येऊन मुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची ऑफर दिली होती; मात्र त्यांनी शेतकरी कामगार पक्षाशी आणि आपल्या विचारसरणीशी अखेरपर्यंत निष्ठा राखत ती नाकारली. अभ्यासू, प्रामाणिक आणि जनहितासाठी आयुष्य वाहून घेणारे भाई उद्धवराव पाटील यांनी शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य जनतेच्या हक्कांसाठी अखेरच्या श्वासापर्यंत संघर्ष केला. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ धाराशिव (उस्मानाबाद) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

## ८. भाई केशवराव धोंडगे : (१९२२ ते २०२३)



नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील गऊळ गावी केशवराव धोंडगेंचा जन्म झाला. धोंडगे हे विचारसरणीने 'शेकाप'च्या जवळचे असल्यान ते याच पक्षाद्वारे राजकारणात उतरले. मराठवाडी बोलीमुळे केशवरावांनी महाराष्ट्राचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. 'शेकाप'कडूनच ते ६ वेळा आमदार आणि एकदा लोकसभेचे खासदार म्हणूनही निवडून गेले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, मराठवाडा मुक्तिसंग्राम आणि आणीबाणीविरोधी आंदोलनात त्यांनी सहभाग नोंदवला होता. आणीबाणीत त्यांनी १४ महिने तुरुंगावासही भोगला होता. १९९२ पासून तिथे 'गुराखी साहित्य संमेलन' भरवण्याव सुरुवात केली. पोतराजापासून वासुदेव, नाथगोसावी ते अगदी गोंदवणवाल्या बायांपर्यंत अशा उपेक्षितांना त्यांनी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. धोंडगे यांना ''मराठवाड्याची मुलुखमैदानी तोफ'' किंवा ''मन्याड खोऱ्याचा वाघ'' म्हणून ओळखले जात असे. ग्रामीण भागातील मुला-मुलींना हक्काचे शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी १९४८ मध्ये श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्यांनी 'जय क्रांती' नावाचे दैनिक सुरू केले. वयाच्या १०२ व्या वर्षी २०२३ रोजी मध्ये वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. आयुष्यभर शेकापच्या विचारसरणीशी बांधील राहून त्यांनी शेतकरी, कष्टकरी आणि शोषितांच्या कल्याणासाठी केलेले कार्य आजही महाराष्ट्राच्या इतिहासात मार्गदर्शक ठरते.


## ९. भाई दाजीबा देसाई (१९२५ ते १९८५)



दाजीबा देसाई यांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातील माडीगुंजी येथे झाला. देसाई यांचे मूळ घराणे गोव्यातील. बेळगावमध्ये लिंगराज कॉलेजमध्ये उच्च शिक्षण सुरू असताना त्यांनी १९४२ च्या चळवळीत भाग घेतल्याने अटक अधिपत्र (वॉरंट) निघाल्याने ते कोल्हापूरमध्ये आले. पुढे काँग्रेसमधून बाहेर पडून ते शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेत सहभागी झाले. १९५४ ते भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस झाले. शेतकऱ्यांच्या शेतमालास किफायतशीर हमीभाव मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी लेख लिहिले. 'राष्ट्रवीर'च्या संपादनाची धुरा १९६० पासून समर्थपणे सांभाळली. आर्थिक अडचणींना तोंड देत जागृती, दीनमित्र, विजयी मराठा या वृत्तपत्रांप्रमाणेच 'राष्ट्रवीर' साप्ताहिकास मानाचे स्थान प्राप्त करून दिले. जनसत्ता, राष्ट्रवीर, संग्राम आदी नियतकालिकांतून त्यांनी विपुल लेखन केले. देसाई यांनी १९५५ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समिती व महाराष्ट्र एकीकरण समितीच्या स्थापनेत पुढाकार घेतला. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, मात्र बेळगाव, कारवारचा प्रश्न अधांतरीच राहिला. देसाई यांनी संयुक्त महाराष्ट्र लढ्याबरोबर गोवामुक्ती आंदोलनातही सहभाग घेतला. सीमा भागातील मराठी भाषिक मुलांसाठी 'दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळा'ची स्थापना केली. त्यांची शेतकरी कामगार पक्षाकडून राज्यसभेवर निवड झाली. तसेच १९७७ मधील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ते कोल्हापूर मतदारसंघातून विजयी झाले. १९ मार्च १९८५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ कोल्हापूर आणि बेळगाव भागात आजही विविध व्याख्यानमाला व स्मृती प्रित्यर्थ कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

## १०. भाई गणपतराव देशमुख : (१९२६ ते २०२१)

भाई गणपतराव देशमुख हे अत्यंत आदरणीय, साधे आणि निःस्वार्थी राजकारणी होते. त्यांचा



जन्म सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील पिंपरी येथे शेतकरी कुटुंबात झाला. महाविद्यालयीन जीवनापासूनच ते डाव्या आणि कम्युनिस्ट विचारसरणीने प्रेरित होते. त्यामुळेच त्यांनी शेकाप निवडला. १९६२ मध्ये पहिल्यांदा निवडून आले. २००९ मध्ये त्यांनी सांगोला येथून १० वी निवडणूक जिंकून तामिळनाडूचे नेते एम. करुणानिधी यांच्या विक्रमाची बरोबरी केली. २०१४ मध्ये ११ वा विजय मिळवून त्यांनी विक्रम मोडीत काढला. महाराष्ट्र विधानसभेचे सर्वात जास्त काळ सुमारे ५४ वर्षे आमदार राहण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. १९७८ मध्ये आणि १९९९ मध्ये महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम पाहिले. राजकीय विरोधकही त्यांचा मोठा सन्मान करत असत. म्हणूनच त्यांना राजकारणातील 'भीष्मपितामह' मानले जाई. आमदार असूनही त्यांची राहणी साधी होती. एसटी बसने प्रवास करत आणि सामान्य जनतेत मिसळत. सांगोला हा दुष्काळी भाग होता. कृष्णा नदीचे पाणी या भागात आणण्यासाठी क्रांतीसिंह नागनाथअण्णा नाईकवाडी यांच्यासोबत त्यांनी पाणी परिषदा आणि आंदोलने उभारली. सांगोला तालुक्यात टेंभू आणि म्हैसाळ योजनेचे पाणी आणण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले व दुष्काळाचा कलंक पुसला. वयाच्या ९२ व्या वर्षी प्रकृती कारणास्तव त्यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आणि तरुण पिढीला संधी दिली.

## ११. ॲड. दत्ता पाटील : (१९२६ ते २०११)




'शेकाप'चे ज्येष्ठ नेते ॲड. दत्तात्रय नारायण (दत्ता) पाटील हे महाराष्ट्राचे दोन वेळा विरोधी पक्षनेते आणि अलिबागचे आमदार होते. कणखर व्यक्तिमत्त्व, कायद्याची उत्तम जाण व भारदस्त आवाजासाठी ते ओळखले जात. अलिबाग विधानसभा मतदारसंघातून ते सलग सहा वेळा निवडून आले. महाराष्ट्र विधानसभेमध्ये १९८७-८८ आणि १९८९-९० या काळात दोन वेळा विरोधी पक्षनेतेपद त्यांनी भूषवले. विधानसभेत सर्वसामान्यांचे प्रश्न आक्रमकपणे मांडून त्यांनी सरकारला अनेकदा धारेवर धरले. ॲड. दत्ता पाटील यांनी केवळ राजकारण न करता ग्रामीण भागातील जनतेला शिक्षणाची दारे खुली करून दिली. त्यांनी कोकण एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात मोठे कार्य केले. कायद्याची उत्तम जाण असल्यामुळे त्यांनी वकिली क्षेत्रातही आपला प्रभाव पाडला. उत्तर कोकणात 'शेकाप'ला भक्कम स्थान प्राप्त करुन देणारे दत्ता पाटील नंतरच्या काळात सक्रिय राजकारणातून काहीसे दूर झाले. त्यांनी पूर्ण लक्ष शैक्षणिक संस्थांवर केंद्रित केले. २०११ मध्ये वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. 'शेकाप'च्या मूळ विचारसरणीनुसार त्यांनी आयुष्यभर शेतकरी, कामगार आणि शोषितांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा वारसा आजही रायगड जिल्ह्यात आदराने स्मरला जातो.

## १२. प्रभाकर (भाऊ) पाटील : (१९२८ ते २०००)



रायगड जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात स्व. प्रभाकर (भाऊ) पाटील हे केवळ एक नाव नव्हते, तर ते जनतेच्या विश्वासाचा, संघर्षाचा आणि नेतृत्वाचा आधारवड होते. 'भाऊ' हा शब्द उच्चारला की अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ मिळते, अशी भावना सर्वसामान्यांच्या मनात होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्वाची ताकद, विचारांची प्रखरता आणि जनतेबद्दलची अपार आस्था यांचा विलक्षण संगम होता. समतेचे पुरस्कर्ते, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी आणि शेतकरी-कामगार चळवळीचे ज्येष्ठ नेते नारायण नागू तथा आप्पासाहेब पाटील यांच्या विचारांचा वारसा भाऊंना लाभला. मात्र, त्यांनी तो केवळ जपलाच नाही, तर आपल्या कर्तृत्वाने अधिक समृद्ध केला. रायगडमध्ये परिवर्तनाची पहाट घडविण्यात आणि विकासाची गंगा आणण्यात त्यांचे योगदान अनन्यसाधारण राहिले. शेतकरी, कामगार, कष्टकरी, दलित आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी आयुष्यभर लाल बावट्याखाली संघर्ष केला. सत्ता मिळाली, मोठी पदे मिळाली; परंतु तत्त्वांशी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. सुमारे चार दशके शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व करत त्यांनी पुरोगामी विचारांची मशाल अखंड तेवत ठेवली. पोयनाडचे सरपंच म्हणून सार्वजनिक जीवनाची सुरुवात झालेल्या भाऊंनी पंचायत समितीचे सभापती, सलग १३ वर्षे रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, विविध सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांचे मार्गदर्शक म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यांनी रायगडमध्ये शेतकरी कामगार पक्षाची चिरेबंदी संघटना उभी केली आणि झुंजार, निष्ठावान कार्यकर्त्यांची मोठी फळी घडवली. त्यांच्या नेतृत्वामुळे शेकाप महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी शक्ती म्हणून उभी राहिली. शिक्षण, सहकार आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांतही त्यांनी मोठी भर घातली. कोकण एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये आणि तांत्रिक शिक्षण संस्थांचे जाळे उभारले. ग्रामीण ग्राहकांनाही दर्जेदार सुविधा मिळाव्यात म्हणून रायगड बाजारची स्थापना केली. सहकारी बँकिंग क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे राहिले. पत्रकारिता हा त्यांच्या जीवनाचा दुसरा महत्त्वाचा पैलू होता. वडिलांनी १९३७ मध्ये सुरू केलेल्या 'कृषीवल' साप्ताहिकाचे त्यांनी दैनिकात रूपांतर केले आणि १९५२ ते १९८९ या काळात संपादक म्हणून निर्भीड, सडेतोड आणि जनहिताची पत्रकारिता केली. अन्यायाविरुद्ध लेखणीने लढणारा आणि सत्यासाठी निडरपणे उभा राहणारा पत्रकार म्हणून त्यांची ओळख कायम राहिली. साहित्य, नाट्य आणि सांस्कृतिक चळवळींनाही त्यांनी मोठे बळ दिले. जिल्हा परिषदेची भव्य इमारत, पत्रकार संघाची वास्तू, रायगड बाजार, अर्बन बँक, शिक्षणसंस्था आणि कृषीवलची बुलंद परंपरा ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारी स्मारके आहेत. हजारो शाळा, रस्ते, समाजमंदिरे, आदिवासी भागातील विकासकामे आणि ग्रामविकासाच्या असंख्य योजना राबवून त्यांनी रायगडच्या विकासाला नवी दिशा दिली. कठोर शिस्त, काटेकोर नियोजन आणि लोकांप्रती असलेली निस्सीम बांधिलकी यामुळेच ते खऱ्या अर्थाने 'लोकनेते' ठरले.

## १३. भाई एस.एम. पाटील : (१९२८ ते २०१७)




भाई एस.एम. पाटील (सोपान महादू पाटील) हे शेतकरी कामगार पक्षाचे सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्याचे माजी आमदार आणि रयत शिक्षण संस्थेचे माजी उपाध्यक्ष होते. माढा तालुक्यातील वरवडे हे त्यांचे मूळ गाव. ते भाई एस.एम. आणि तात्या म्हणून परिचित होते. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी योगदान दिले. सेवादलात ते कार्यरत होते. 'गोवा मुक्ती संग्राम'मध्ये ते सक्रीय होते. १९६७ मध्ये ते माढा मतदारसंघातून विधानसभेवर आमदार म्हणून निवडून गेले. शेतमालाला योग्य भाव, वीज आणि पाण्याच्या प्रश्नांवर त्यांनी आयुष्यभर शेतकऱ्यांसाठी मोर्चे व आंदोलने केली. ते तब्बल ४० ते ५० वर्षे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आणि काही काळ उपाध्यक्ष राहिले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाचा विस्तार केला आणि संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा चालविणाऱ्या पहिल्या फळीतील नेत्यांमध्ये ते एक होते. त्यांनी १९७२ आणि १९७८ मध्ये विधानसभा लढवली होती. ते फर्डे वक्ते होते. उजनी धरणाचे पाणी माढा तालुक्याला मिळण्यासाठी त्यांनी विधानभवनावर मशाल मोर्चा काढला होता. जिल्हा परिषद आणि विधानसभेतील त्यांचे भाषणे गाजली. शेती, सहकार, शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदलासाठी समर्पित भावनेतून जीवनभर कार्यरत राहिलेल्या एस.एम. पाटील यांच्या स्मृती जतन करण्यासाठी त्यांच्या नावाने फाऊंडेशन कार्यरत आहे. लाल बावटा तरुणपणी खांद्यावर घेतलेल्या भाई एस.एम. पाटील यांनी हयातभर शेकापशी इमान राखले.

## १४. प्रा. एन.डी. पाटील : (१९२९ ते २०२२)



नारायण ज्ञानदेव पाटील हे शेकापचे नेते व प्रख्यात विचारवंत होते. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यात झाला. पहिल्यापासूनच शिक्षणाची आवड असणाऱ्या एन.डी. यांनी अर्थशास्त्र विषयातून एम.ए.ची पदवी घेतली. सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये प्राचार्यपदी रूजू झाले. १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणून काम केले. १९९० पासून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमनपदही त्यांनी भूषवले. दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बेळगावच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. १९८४ मध्ये एन.डी. यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ ला मुंबई गिरणी कामगार संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. १९६० ते १९६६, १९७० ते १९७६ आणि १९७६ ते १९८२ अशी १८ वर्षे महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य होते. १९६९ ते १९७८ आणि १९८५ ते २०१० या कालावधीत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. एन.डी. यांनी १९७८ ते १९८० या काळात महाराष्ट्राचे सहकारमंत्रीपद भुषवले. त्यानंतर १९८५ ते १९९० मध्ये कोल्हापूर मतदारसंघात विधानसभा सदस्य म्हणून निवडून आले. १९९९ ते २००२ या काळात लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक म्हणून काम केले. याबरोबरच एन.डी. यांनी महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समितीचे सदस्य म्हणून काम केले. बेळगाव-महाराष्ट्र सीमा चळवळीचे ते प्रमुख नेते होते. आपले संपूर्ण आयुष्य समाजकारणासाठी वाहून घेतलेल्या एन.डी. यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले.

## १५. भाई दत्तूशेठ पाटील : (१९३० ते २००२)



पनवेलचे दत्तूशेठ म्हणजे सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडलेले नेते. पनवेल-उरणसह रायगड जिल्ह्यात डॅशिंग नेता म्हणून त्यांची ओळख होती. त्यांचा लढाऊ बाणा अखेरच्या क्षणापर्यंत कायम होता. शरीर साथ देत नसतानाही पक्षाच्या प्रत्येक लढ्यात अग्रभागी असलेले ते नेते होते. त्यांची उपस्थिती हीच लढ्याची खरी ताकत होती. 'शेकाप'चे संस्थापक सदस्य नारायण नागू पाटील यांच्या विचाराने भारावून गेलेल्या दत्तूशेठ पाटील यांनी 'शेकाप'चे नेते प्रभाकर पाटील, ॲड. दत्ता पाटील यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून अनेक वर्षे काम केले. कार्यकर्ता हीच आपली संपत्ती म्हणून त्यांनी पनवेल, उरणमध्ये अनेक कार्यकर्त्यांना घडविण्याचे काम केले. त्यांनी आपला मुलगा बाळाराम पाटील यांना पक्षकार्यांसाठी सुपूर्द केले आहे. पनवेल तालुक्यातील विरोधी पक्षांना दत्तूशेठ पाटील यांचा दरारा होता. कार्यकर्त्यांवर अन्याय झाला तर पहिल्यांदा त्याच्या दारात उभा राहणार नेता म्हणजे दत्तूशेठ पाटील होते. 'शेकाप'च्या १९८४ च्या उरण शेतकरी आंदोलनात त्यांना पहिली अटक झाली होती. त्यांनी आणीबाणीच्या काळात जेल भोगला. रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कॉलेज, नावडे, पळस्पे, दापोली येथील विद्यालये यांच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कमिटीचे ते निधनापर्यंत उपाध्यक्ष होते. पनवेलबरोबरच उरण तालुक्यात त्यांनी आमदारकीच्या काळात केलेल्या कामांच्या आठवणी आजही जागविल्या जातात.

## १६. मीनाक्षीताई पाटील : (१९४७ ते २०२४)




मीनाक्षीताई पाटील या शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री आणि अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या तीन वेळा आमदार होत्या. त्यांचे वडील प्रभाकर पाटील यांच्याकडून त्यांना राजकारण आणि समाजकारणाचा वारसा मिळाला होता. त्या १९९५, १९९९ आणि २००९ मध्ये अलिबाग मतदारसंघातून शेकापच्या आमदार होऊन विधानसभेत पोहोचल्या. १९९९ मध्ये जेव्हा काँग्रेसच्या विलासराव देशमुख यांचे सरकार सत्तेवर आले, तेव्हा मंत्रिमंडळात मीनाक्षी पाटील यांच्याकडे बंदरे आणि मत्स्यव्यवसाय विभागांचे राज्यमंत्रीपद सोपवण्यात आले होते. किनारपट्टीच्या विभागांचे मंत्रीपद सांभाळताना त्यांनी कोकण आणि रायगड जिल्ह्यातील कोळी बांधवांसाठी व बंदर विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांनी 'कृषीवल' वृत्तपत्रामध्ये अलिबाग प्रतिनिधी म्हणून प्रदीर्घ काळ काम केले आणि विविध विषयांवर विपुल लेखन केले. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपदही भूषवले. बिहारमधील पत्रकारविरोधी बिलाविरुद्धच्या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे त्यांना तुरुंगवासही झाला होता. रायगड जिल्ह्यातील प्रकल्पविरोधी लढाया आणि शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांवर त्या नेहमी आक्रमकपणे व अटीतटीने पुढे असत. शेकापच्या झुंझार नेत्या अशी त्यांची ओळख होती. मीनाक्षी पाटील या अत्यंत अभ्यासू वक्त्या होत्या. त्यांची विधानसभेतील व जाहीर सभेतील भाषणे नेहमी अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या शैलीची असत. रायगड जिल्ह्यात जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांच्या जमिनींवर किंवा हक्कांवर गदा आली, तसेच विविध उद्योग व प्रकल्पविरोधी आंदोलने उभी राहिली, तेव्हा मीनाक्षीताईंनी नेहमी रस्त्यावर उतरून आंदोलनाचे नेतृत्व केले.

## १७. भाई मोहन पाटील : (१९४५ ते २०१४)



भाई मोहन पाटील हे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यमंत्री आणि पेण विधानसभा मतदारसंघाचे सलग पाच वेळा आमदार राहिलेले लोकप्रिय व मितभाषी राजकीय व्यक्ती होते. पेण तालुक्यातील वरवने गावात त्यांचा जन्म झाला. १९७७ मध्ये त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. पेण विधानसभा मतदारसंघातून अभूतपूर्व यश मिळवत सलग ५ वेळा आमदार म्हणून निवडून येण्याचा बहुमान मिळवला. १९८० ते २००४ या २४ वर्षांच्या प्रदीर्घ काळात त्यांनी पेण मतदारसंघाचे नेतृत्व केले. विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात (१९९९ दरम्यान) त्यांनी राज्यमंत्री म्हणून अत्यंत यशस्वीपणे कार्यभार सांभाळला. रायगड जिल्ह्याच्या विकासात, पाणीप्रश्नांच्या सोडवणुकीत त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. आपल्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी कोकणातील विकासकामांना मोठा निधी मिळवून दिला. पेण आणि रायगड जिल्ह्यातील सहकारी संस्था, शेतकरी बँका आणि स्थानिक संस्था बळकट करण्यात त्यांनी भूमिका बजावली. त्यांचा पराभव करण्यासाठी विरोधकांना मोहन पाटील यावाचे ९ उमेदवार उभे करावे लागले होते. कार्यकर्त्यांना राजकीय बळ देणे आणि त्यांच्या सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभे राहणे या त्यांच्या गुणामुळे त्यांना जनमानसात आदराचे स्थान होते. ते आयुष्यभर 'शेकाप'च्या विचारांशी बांधील राहिले.

## १८. भाई नरसिंगराव देशमुख :



भाई नरसिंगराव देशमुख हे काटी, ता. तुळजापूर गावचे. सावकारशाही आणि निजामशाहीच्या अन्यायाविरुद्ध मराठवाड्यात सशस्त्र उठावाचे नेतृत्व त्यांनी केले. 'शेकाप'चे ते संस्थापक सदस्य, कुशल वकील आणि स्वातंत्र्यसैनिक होते. मराठवाड्यातील 'शेकाप' नेते भाई उद्धवराव पाटील यांचे ते मेहुणे होते. त्यांनी मराठवाड्यातील बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी काम केले. निजाम काळात हैदराबाद येथे मराठा हॉस्टेल आणि तत्कालीन औरंगाबाद येथे शिवाजी हॉस्टेलची स्थापन केली. उमरगा येथील भारत शिक्षण संस्थेचे ते संस्थापक होते. पोलीस ॲक्शननंतर (१९४८) जेव्हा सामाजिक परिस्थिती चिघळली, तेव्हा नरसिंगराव देशमुख, उद्धवराव पाटील आणि अण्णासाहेब गव्हाणे यांनी गावोगावी सभा घेऊन मुस्लिम बांधवांना संरक्षण दिले. निजामाविरुद्धचा लढा धर्माविरुद्ध नसून जुलमी राजवटीविरुद्ध आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली. राजर्षी शाहू शिक्षण संस्थेच्या उभारणीत ते संस्थापक-अध्यक्ष म्हणून सक्रिय राहिले. गोरगरीब शेतकरी, शेतमजूर आणि सावकारी पाशात अडकलेल्या बहुजनांचे खटले ते विनाशुल्क लढत असत. त्यांची भारताच्या पहिल्या राज्यसभेचे सदस्य १९५४ ते १९६० म्हणून निवड झाली. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. फुले-शाहू-आंबेडकर आणि डाव्या विचारसरणीच्या चळवळींशी ते अखेरपर्यंत एकनिष्ठ राहिले.

## १९. भाई विरेंद्रबाबू देशमुख :



भाई विरेंद्र काशिराव देशमुख हे शेकापचे नेते होते. प्राध्यापक ते एक लढवय्या नेता हा त्याच्या प्रवास वेधक आहे. त्यांनी प्रामुख्याने विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा मतदारसंघात पक्षाचे प्रतिनिधित्व केले. १९९५ आणि १९९९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत त्यांनी काटोल मतदारसंघातून शेकापचे प्रतिनिधित्व केले. त्यांना त्यावेळी दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. काटोल पालिकेच्या अध्यक्षपदापासून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास विधानपरिषदे पर्यंत येऊन पोहोचला. विदर्भातील शेतकरी, कामगार आणि उपेक्षित घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला, ज्यामुळे त्यांना भाई ही आदराची पदवी लोकांकडून मिळाली. 'शेकाप'च्या पडत्या काळात विदर्भात पक्षाचा गड टिकवून ठेवण्यात देशमुख यांचे मोलाचे योगदान राहिले. काटोल परिसरात गोरगरिबांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी त्या भागात शाळा सुरू केल्या. काटोल शहरात त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'विरेंद्र बाबू देशमुख स्मृती भवन' असून तेथे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. नागपूर व विदर्भात शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा रुजवण्यात आणि वाढवण्यात वीरेंद्र बाबू देशमुख (विदर्भवीर) यांचे योगदान मोलाचे आहे.

## २०. भाई अण्णासाहेब गव्हाणे :



भाई अण्णासाहेब गव्हाणे हे शेतकरी कामगार पक्षाचे एक दिग्गज, लढाऊ नेते होते. त्यांनी मराठवाड्यात शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान देत महात्मा फुले शिक्षण संस्थेची स्थापना केली. परभणी विधानसभा मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व केले. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जेव्हा 'शेकाप'च्या पहिल्या फळीतील संस्थापक- नेत्यांनी पक्ष सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला, या कठीण काळात पक्ष पुढे नेण्याची जबाबदारी ज्या दुसऱ्या फळीतील नेत्यांनी घेतली, त्यात अण्णासाहेब गव्हाणे प्रमुख होते. १९५२ आणि १९६७ या काळात परभणी विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी प्रतिनिधित्व केले. निजामी राजवटीच्या मुक्तीनंतर परभणी आणि उस्मानाबाद भागात शेकापचा प्रगतशील विचार रुजवण्यात अण्णासाहेबांचा सिंहाचा वाटा होता. परभणी जिल्हा हा प्रागतिक विचारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो, त्याचे श्रेय अण्णासाहेब गव्हाणे यांच्या अनेक उपक्रमांना आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपत परभणी व लगतच्या परिसरात विविध सामाजिक उपक्रम आणि स्मृती व्याख्यानमालेचे आजही आयोजन केले जाते. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे लाठी, काठी आणि पाटी (संघर्ष, शेती आणि शिक्षण) सूत्राभोवती फिरत राहिले. त्यांच्या या कार्यामुळे परभणीत त्यांचे आदराने भाई आणि 'मराठवाडा केसरी' म्हणून स्मरण ठेवले जाते.



## निवडक



### कुडलीत दामिनी पथकाचे मार्गदर्शन

**सुतारवाडी :** रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा कुडली येथे दामिनी पथकाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी महिला पोलीस हवालदार बांद्रे व कोंजे यांनी इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना महिला व बाल सुरक्षा, सायबर सुरक्षितता तसेच आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी उपलब्ध असलेल्या हेल्पलाइन क्रमांकांची माहिती दिली. कोणत्याही प्रकारचा त्रास झाल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक मोहन राठोड तसेच उपशिक्षक संदीप राठोड उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



### वीजेच्या सडलेल्या खांबाकडे दुर्लक्ष

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील रोहिदास नगर वाड्यातील चंद्रकांत नांदगावकर यांच्या घरासमोरील सडलेला गंजलेला वीजेचा खांब धोकादायक अवस्थेत असून, याकडे महावितरणचे दुर्लक्ष असल्याबद्दल नाराजीचा सूर दिसून येत आहे. उसरोली रोहिदास नगरमधील असलेला वीजेचा खांब गेल्या अनेक महिन्यांपासून सडलेल्या गंजलेल्या अवस्थेत आहे. याबाबत महावितरण च्या कार्यालयात वेळोवेळी तक्रार करण्यात आली आहे. याकडे अधिकारी वर्गाचे अद्यापही दुर्लक्ष असून वेळप्रसंगी याठिकाणी कोणती दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महावितरणच्या अधिका-यांनी यात लक्ष पुरवून येथील वीजेचे सडलेले गंजलेले खांब तातडीने बदलण्याची मागणी नागरिकांतून होते आहे.

### वासांबे-मोहोपाडा ग्रा.पं.चा व्दितीय क्रमांक


**रसायनी :** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने आदिशक्ती अभियान प्रभावीपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना सन २०२५-२६ चा आदिशक्ती पुरस्कार जाहीर केला असून, खालापूर तालुक्यातील कुंभिवली, वासांबे मोहोपाडा आणि साजगाव या ग्रामपंचायतींनी राज्यात मानाचे स्थान पटकावले आहे. महाराष्ट्र शासनाच्या दि. ३१ जुलै रोजी निर्गमित शासन निर्णयानुसार, आदिशक्ती अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, महिला सक्षमीकरण, बालविकास, आरोग्य, शिक्षण व सामाजिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे. यामध्ये खालापूर तालुक्यातील कुंभिवली ग्रामपंचायतीला प्रथम, वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीला द्वितीय आणि साजगाव ग्रामपंचायतीला तृतीय क्रमांकाचा राज्यस्तरीय आदिशक्ती पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळे खालापूर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, महिला व बालकल्याण क्षेत्रात सातत्याने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांना राज्य शासनाने दिलेली ही मोठी दाद मानली जात आहे. या यशाबद्दल संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, महिला बचत गट तसेच ग्रामस्थांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दशमा देवीच्या मूर्ती साकारण्यास वेग

**खांदा कॉलनी :** दीपअमावास्येनिमित्त साजऱ्या होणाऱ्या दशमा देवी उत्सवाची तयारी पनवेलमधील कुंभारवाड्यात जोरात सुरू झाली आहे. मूर्तिकारांकडून विविध आकारांच्या आकर्षक दशमा देवीच्या मूर्ती घडविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, रंगकाम आणि सुबक सजावटीमुळे मूर्ती लक्ष वेधून घेत आहेत. दशमा देवीचा उत्सव प्रामुख्याने गुजराती समाजात मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो. दीपअमावास्येच्या दिवशी देवीची प्रतिष्ठापना करून दीड दिवस पूजा-अर्चा, आरती व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यानंतर भक्तीभावाने विसर्जन मिरवणूक काढली जाते. या उत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अनेक ठिकाणी दशमा देवीची उंटावर विराजमान असलेली मूर्ती प्रतिष्ठापित केली जाते. उंटावर आरूढ असलेल्या देवीचे हे स्वरूप विशेषतः गुजराती समाजामध्ये श्रद्धेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे अशा मूर्तींना मोठी मागणी असून पनवेलच्या कुंभारवाड्यातील मूर्तिकार त्या बारकाईने साकारत आहेत.



### सुनील गायकवाड सेवानिवृत्त



**हमरापूर :** भारतीय स्टेट बँकेच्या पेण शाखेतील कर्मचारी सुनील गायकवाड हे वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने पेण शाखेतील त्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास पेण स्टेट बँकेचे मॅनेजर सचिन कुंटे, श्रद्धा जोशी, इशान पटेल, मोरे यांच्यासह बँकेचे कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते. स्टेट बँकेत सुनील गायकवाड यांनी ३२ वर्षे नोकरी केली. त्यांचे भावी आयुष्य सुखाचे जावो अशा सदिच्छा यावेळी बँकेचे मॅनेजर सुनील कुंटे यांनी बोलताना त्यांना दिल्या.

# डोंगरावरील रस्त्यांना नाल्याचे स्वरूप

## • १२ वाड्या मजबूत रस्त्यापासून वंचित • ग्रामस्थांना मुलभूत सुविधासाठी संघर्ष

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात १३ आदिवासी वाड्या माथेरानचे डोंगरात असून, या आदिवासी वाड्या रस्त्याने जोडण्यासाठी शासनाकडून रस्ता बनविला जात आहे. १५ कोटी खर्चाच्या या रस्त्याच्या कामातील पहिला भाग पूर्ण झाला असून तयार झालेला मातीचा रस्ता वाहून जात आहे. रस्त्यावर कुठेही पावसाळ्यातील पाणी वाहून नेण्यासाठी गटार बांधली नाहीत आणि त्यामुळे किरवली ते जुम्मापट्टी रस्ता वाहून जाण्याची शक्यता आहे.



कर्जत तालूका हा आदिवासी वहूल तालुका म्हणून ओळखला जातो. परंतु, आदिवासी वाड्या पाड्यावरच्या ग्रामस्थांना आपल्या मुलभूत सुविधासाठी झगडावे लागत आहे. माथेरानच्या डोंगरात वसलेल्या १२ आदिवासी वाड्यांना जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. माथेरान डोंगरातील जुम्मापट्टी धनगर वाड्यापासून किरवली वाडीपर्यंत जाणारा रस्ता शासनाकडून बनविला जात आहे. या भागात १२ आदिवासी वाड्या असून माणगावतर्फे वरेडी, आसल, उमरोली आणि किरवली या चार ग्रामपंचायतीमधील १२ आदिवासी वाड्या या रस्त्याच्या सुविधेपासून वंचित होत्या. किरवली ठाकूरवाडी, सावरगाव ठाकूरवाडी, आषाने ठाकूरवाडी, सागाचीवाडी, चिंचवाडी, बोरीची वाडी, धामणदांड, नाण्यांचामाळ, आसलवाडी, भुतीवली वाडी, बेकरेवाडी, पाली धनगर वाडा या १२ वाड्या मजबूत रस्त्यापासून वंचित आहेत.

किरवलीपासून जुम्मापट्टीपर्यंत रस्ता शासनाकडून बनविला जात आहे. या रस्त्याच्या कामाला वन जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर गती मिळाली होती. मात्र, एकूण १२ किलोमीटर अंतराच्या रस्त्यापैकी ७० टक्के रस्त्यावर माती आजुबाजूला करीत रस्ता बनविला गेला आहे. उन्हाळ्यात डोंगर फोडून मातीचा बनविला गेला, मात्र त्यावेळी रस्ता बनविताना महाराष्ट्र राज्य ग्रामीण विकास यंत्रणांनी मातीचा रस्ता बनवित असताना रस्त्याच्या बाजूला गटार खोदले नाही. त्याचा परिणाम रस्त्यातील माती वाहून चालली असून रस्त्याला नाल्याचे स्वरूप आले आहे. त्यामुळे रस्त्यावरून आता दोनचाकी वाहने जाण्यासाठी देखील रस्ता सुस्थितीत राहिलेला नाही. आजारी व्यक्तीला कापडाची झोळी करून चार व्यक्तींना वाहून न्यावे लागत आहे. रुग्णाला डोंगर उतरत न्यावे लागत असल्याने ठेकेदाराच्या चुकीमुळे रस्ता तयार होऊन देखील काही कामाचा राहिलेला नाही. या स्थितीत येथील आदिवासी लोकांवर काही विपरीत परिस्थिती ओढवल्यास शासन त्यास जबाबदार राहील अशी नाराजी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र सांबरी यांनी व्यक्त केली आहे.

> “रस्त्यामुळे आमचे भागातील जनतेचे जीवनमान उंचावणार आहे, पण अनेक वर्षे रस्त्याच्या प्रतीक्षेत असलेल्या जनतेला आणखी संकटात टाकण्याचे काम नवीन रस्त्याने केले आहे. शासनाने असे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करायला पाहिजे.”
>
> -भालचंद्र सांबरी
> सामाजिक कार्यकर्ते

## नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील कचऱ्याचे निर्मूलन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील सर्व भागात साठून राहिलेला कचरा उचलण्याचे काम कर्जत परिवर्तन आघाडीकडून करण्यात आले आहे. गावातील बहुसंख्य भागात साठून राहिलेला कचरा उचलण्याची मोहीम राबवण्यात आली.



नेरळ ग्रुप ग्रामपंचायत परिसरात वाढत्या कचऱ्याच्या समस्येमुळे स्थानिक पातळीवर वारंवार तक्रारी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राजिप सदस्या सुनिता मोरे आणि कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांनी नेरळ गावातील कचरा उचलण्याची मोहीम हाती घेतली. नेरळ ग्रामपंचायतचे प्रशासक सुजित धनगर आणि ग्राम पंचायत अधिकारी अरुण कारले यांनी या उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करीत स्वच्छता विभागाचा सहभाग दाखवला.

या स्वच्छता मोहिमेत अतुल चंचे, बंडू क्षीरसागर, संदेश लाड, रमेश पवार, सुधाकर देसाई, सोनू नाथ, माधवी क्षीरसागर, सुजाता मोहिते, प्राची मनवे, सुजाता भवारे, अंकिता मोरे आदींसह स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मोहिमेची सुरुवात नेरळ पाडा येथून झाली आणि मातोश्री नगर, गंगा नगर, निर्माण नगरी, साईकृपा सोसायटी, टॉकीज, टॅक्सी स्टँड, टेपआळी, भिताड आळी, चिंचआळी, गणेश नगर, मोहाची वाडी, खांडा, सम्राट नगर, राजेंद्र गुरुनगर, या परिसरातून एकूण ३० ट्रॅक्टर घनकचरा गोळा करण्यात आला.

## डॉ.अनिल पाटील यांची निवड



**रसायनी :** डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवलीचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांची क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार करिता रायगड जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. जिल्ह्यातील शिक्षक ऑनलाईन प्रस्ताव सादर करतात. त्या प्रस्तावांची छाननी व मुलाखतीसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली. त्यामध्ये डॉ. ए.आर. पाटील यांची निवड होणे म्हणजे खालापूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे.

## महिला महाविद्यालय नशामुक्ती जनजागृती

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय श्रीवर्धन, महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व रायगड जिल्हा पोलीस श्रीवर्धन पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.३०) नशामुक्की जनजागृती अभियान राबविण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय राणे व श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

याप्रसंगी अमली पदार्थ व्यसन मुक्तीतसेच शपथ तसेच श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या वतीने नशामुक्तीपर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत समृद्धी पाटील, साक्षी रामाणे, सलोनी शिरवटकर यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. तर उत्तेजनार्थ खदिजा अल्वारे व शुभ्रा वाणी हिला सन्मानित करण्यात आले. ज्ञानेश्वरी बामणेकर यांनी विद्यार्थिनींना दामिनी पथक विषयी माहिती दिली. तर पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी व्यसनाचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी तृप्ती विचारे, ऋषिकेश चोगले, निखत शेख, मनीषा श्रीवर्धनकर, अभिजीत पुसाळकर उपस्थित होते.

## बहुजन विद्यार्थी संघटनेतर्फे गटशिक्षण अधिकाऱ्यांना निवेदन

**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील कामथेकरवाडी-खांडपोली येथील जि.प. प्राथमिक शाळेत गेल्या महिनाभरापासून ६६ आदिवासी विद्यार्थी शिक्षकाविना शिक्षण घेत असल्याच्या गंभीर प्रकाराविरोधात बहुजन विद्यार्थी संघटना आक्रमक झाली आहे. या पार्श्वभूमीवर संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गटशिक्षण अधिकारी तसेच पंचायत समितीच्या सभापती यांना निवेदन देण्यात आले. कामथेकरवाडी येथील दोन शिक्षकी शाळेतील एका शिक्षकाची बदली झाली असून, दुसरे शिक्षक बीएलओच्या कामावर नियुक्त असल्यामुळे शाळेतील ६६ विद्यार्थी मागील महिनाभरापासून शिक्षकाविना आहेत. या शाळेतील सर्व विद्यार्थी आदिवासी समाजातील असून त्यांचे पालक रोजंदारीसाठी बाहेरगावी जात असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, त्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे.



## विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप

**पनवेल :** मानवता फाऊंडेशनच्यावतीने सुधागड तालुक्यातील पाच्छापूर येथील सोमजाई शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना होणारी गैरसोय लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच, शालेय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. यावेळी मानवता फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय पवार, विनोद नायर, विघ्नेश मगानी, दीपक घोसाळकर, विशाल बाबर तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## महाविद्यालयात लेखन प्रेरणा दिन साजरा



**| उरण | प्रतिनिधी |**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महाविद्यालयात शनिवारी (दि.१) अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्मृतिदिन साजरा करण्यात आला. तसेच, हा दिन लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. विद्यार्थ्यांमधे वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्यांनी यावेळी महापुरुषांच्या चरित्र ग्रंथांचे वाचन करून आपण त्यांचे विचार समजून घेतले पाहिजे असे प्रतिपादन केले. डॉ. ए.के.गायकवाड यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या चरित्रावर प्रकाश टाकताना फकीरा, वैजयंता या कादंबरीतील अन्यायाविरुद्धचा लढा विद्यार्थ्यांना सांगितला. तर डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाविषयी भाष्य केले. या कार्यक्रमात डॉ. ए.आर. चव्हाण, डॉ. एच.के. जगताप, प्रा. विनिता तांडेल, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. दिपू यादव, प्रा. हन्नत शेख तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## संगीत विशारद परीक्षेत शर्वरी प्रथम

**| रसायनी | प्रतिनिधी |**

गायिका शर्वरी डोंगरे हिने अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ आयोजित प्रतिष्ठित संगीत विशारद परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शर्वरीच्या या अभूतपूर्व यशाची दखल घेत तिची संगीत क्षेत्रातील ८ राष्ट्रीय आणि २ राज्यस्तरीय प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण दि.२२ ऑगस्ट रोजी नवी मुंबई येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या भव्य दीक्षांत समारंभात मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.



शर्वरीने भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या विविध कार्यक्रमांमध्ये आपल्या गायनाची प्रभावी छाप उमटवली आहे. तसेच, चला हवा येऊ द्या, स्टार प्रवाह यांसारख्या लोकप्रिय दूरचित्रवाहिन्यांवरील कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवत रसिकांची मने जिंकली आहेत. याशिवाय तिने देशभरातील अनेक राष्ट्रीय स्तरावरील संगीत महोत्सव, स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उल्लेखनीय यश मिळविले आहे.

## वर्षावास निमित्त गृह भेट उपक्रम

**पनवेल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळावतीने वर्षावासनिमित्त धम्म बांधवांची गृह भेट हा उपक्रम उत्साहात पार पडला. तथागत बुद्धांच्या पहिल्या उपदेश दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास धम्म बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित बांधवांच्या स्वागताने झाली. त्यानंतर कुटुंबाचा परिचय करून देण्यात आला.

## शेतकरी बोनसच्या प्रतीक्षेत

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात शेतकरी भात लागवड केली जाते. या भात उत्पादनातुन शेतकरी आपला उदारनिर्वाह चालवत असतो. यंदाच्या हंगामात विविध पिकांचे उत्पादन घेतलेल्या तालुक्यातील २२०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना बोनस न मिळाल्याने शेतकरी बोनस जाहीर होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. राज्य शासनाकडून अद्याप याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. यंदा शेतकऱ्यांना बोनस मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तालुक्यात एकूण ३ भातविक्री केंद्र असून, खार आंबोली, बोर्ली-मांडला व तळेखार येथे भात हमीभाव केंद्र उघडण्यात आले आहेत. वाढता उत्पादन खर्च, बाजारातील चढ-उतार आणि आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर बोनसची रक्कम शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरू शकते. तरी शासनाकडे लवकरात लवकर निर्णय घेऊन बोनस जाहीर करावा अशी मागणी केली आहे.

